जुलै २०१५ / पाने ७६ / किंमत ₹ १०/-

# लोकराज्य

विशेषांक




नाशिक त्र्यंबकेश्वर

सिंहस्थ कुंभमेळा

२०१५ - २०१६

## पर्वणी श्रद्धेची, भक्तीची अन् पर्यटनाची...



# मुंबईकरांची आणखी एक स्वप्नपूर्ती

## कोस्टल रोडला पर्यावरण विभागाची मंजुरी !

**मा. नरेंद्रजी मोदी,**
पंतप्रधान

**मा. प्रकाशजी जावडेकर,**
केंद्रीय राज्यमंत्री, पर्यावरण (स्वतंत्र कार्यभार)

## महाराष्ट्र आपला आभारी आहे !

प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- सागरी मार्गाचे अंतर ३४ किलोमीटर
- नरिमन पॉइंट ते कांदिवली भागातून जाणार सागरी मार्ग
- हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी १० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित
- येत्या पाच ते सहा वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्धारित
- या प्रकल्पाद्वारे ९१ हेक्टरवर हरित क्षेत्र निर्मितीस वाव
- गर्दीच्या ठिकाणी होणारी गैरसोय टाळण्याकरिता सागरी मार्गात २ ठिकाणी आंतरसमुद्री बोगदे तयार करण्यात येतील
- या प्रकल्पातंर्गत उद्यान, हरित क्षेत्र, खेळाचे मैदान तयार करण्यात येणार
- पश्चिम एक्सप्रेस वेवरील वाहतुकीचा ताण कमी होणार



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

वर्ष ६७ वे | अंक १ | जुलै २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक देवेंद्र भुजबळ
- संपादक सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक प्रवीण टाके
- उपसंपादक प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी विलास बोडके
- साहाय्य संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट शैलेश कदम
- मुद्रण एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग




## कुंभमेळ्यासाठी महाराष्ट्र सज्ज

नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील सिंहस्थ महाकुंभाच्या निमित्ताने आपल्या संस्कृतीला उजाळा मिळणार आहे. या आयोजनासाठी शासन आपले काम चोख बजावत आहे. हा अद्भुत धर्मसंगम अनुभवण्यासाठी देशविदेशातून भाविक येत असतात. नाशिक-त्र्यंबकेश्वर नगरी या उत्सवासाठी सज्ज झाली आहे. ६

## परिपूर्ण तयारी, उत्कृष्ट सुविधा

सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. विकासकामांमुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहरांचे रूप पालटू लागले आहे. चकाकणारे विस्तारित रस्ते, रंगीत घाट, पथदीप, साइनबोर्डस् यामुळे सौंदर्यात भर पडली आहे. १४







## कुंभमेळ्याचे पौराणिक महत्त्व

देव-दानव युद्धादरम्यान बारा वेळा अमृतकुंभ खाली पडला आणि त्यातील काही अमृतथेंब सांडले. सूर्य, चंद्र, शनी आणि गुरु यांनी प्रत्येक वेळी कुंभाचे रक्षण केले. ज्या बारा ठिकाणी हे थेंब पडले त्यापैकी चार ठिकाणे पृथ्वीवरील आहेत. १६

## तपोभूमी नाशिक

हिंदू धर्मग्रंथानुसार नाशिकचे नाव पद्मनगर म्हणजे कामकाजाचे नगर असे होते. कृतयुगात या ठिकाणी ब्रह्मदेवाने पद्मासन घालून तपश्चर्या केली, असे मानले जाते. त्यावरून हे ठिकाण पद्मनगर असेही ओळखले गेले. १८





## शाश्वत पाण्यासाठीची लोकचळवळ

पाण्याच्या साठ्यांचे पुनरूज्जीवन होणे ही उद्दिष्टे जलयुक्त शिवार योजनेतून साध्य होत आहेत. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात पाण्यासाठी उभारली गेलेली ही सर्वांत मोठी लोकचळवळ आहे. ३४






## निर्धार स्वच्छतेचा

४६

## महाराष्ट्रच प्रथम क्रमांकावर

उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची विशेष मुलाखत... ४२




## याशिवाय


- योगसाधना
- घडणार आहेत स्मार्ट, समृद्ध शहरे
- **संस्कृती :** पैठणीचे वैभव
- **निरामय :** मुक्ती ताणतणावापासून
- **भ्रमंती:** नाशिकची विकेंड टूर
- **प्रेरणा :** स्वप्नांना जोड परिश्रमाची

### वाचनीय लोकराज्य

लोकराज्यचा जूनचा अंक वाचनीय झाला आहे. मुखपृष्ठ खूपच सुंदर झाले आहे. पावसाळ्यासंदर्भात राज्य सरकारच्या तयारीबाबतचा लेख खूपच छान आहे. भ्रमंती, निरामय ही सदरे नेहमीप्रमाणे संग्रहनीय आहेत.

**– कांचन खरे, नागपूर**




## लोकमान्य लोकराज्य


**एप्रिल २०१५ व मे २०१५ लोकराज्य चे दोन्ही अंक अभ्यासपूर्ण व देशाच्या सर्वांगीण बाजूवर प्रकाश टाकणारे आहेत. आपल्या पुढील अंकासाठी माझ्या शुभेच्छा !**

**– डॉ. गिरीश गांधी, नागपूर**

### संग्राह्य आणि स्वागतार्ह

मे २०१५ चा लोकराज्यचा अंक वाचला. सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवणारे संस्कृती हे नवे सदर स्वागतार्ह आहे. कीर्ती पांडे यांचा मला आणा कोल्हापुरी साज.. हा दागिन्यांबद्दल महत्त्वपूर्ण माहिती देणारा लेख आवडला. विद्यार्थ्यांच्या हितासाठी शुल्क आणि प्रवेश नियंत्रण हा विनोदजी तावडे, शिक्षणमंत्री यांचा लेख माहितीपूर्ण आहे.

**– प्रसाद जगन्नाथ खिळे, अहमदनगर**




### ऑल इन वन

लोकराज्यमधील सर्वच लेख वाचनीय असतात. अनेक विषयांची माहिती मिळते. लोकराज्य म्हणजे ऑल इन वन असे हे महाराष्ट्र राज्याचे अतिशय संग्राह्य मासिक आहे.

**– जी.बी. देशमुख, अमरावती**

### दर्जेदार

मे २०१५ चा अंक मला विशेष आवडला. लोकराज्यचे सर्वच अंक दर्जेदार असतात. शेंद्रा–बिडकीन नव्या वळणावर... हा लेख खूप आवडला. इंडस्ट्रीयल कॉरिडॉर अंतर्गत होणाऱ्या रोजगार निर्मितीमुळे महाराष्ट्रातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यामुळे महाराष्ट्राचे गुंतवणूक व आर्थिक विकासातील स्थान अधिक महत्त्वाचे होणार आहे. मेक इन महाराष्ट्र हा उपक्रम मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली असाच यशस्वीपणे राबवला जावा, यासाठी माझ्या शुभेच्छा !

**– सोमनाथ चव्हाण, मु. खुनेश्वर, ता. माहोळ, जि. सोलापूर**

### दर्जेदार भंडार

लोकराज्यचे अंक नुसते वाचून ठेवण्यासारखे नसतात, तर त्याला कव्हर लावून कायमस्वरूपी संग्राह्य ठेवण्यासारखे असतात. मार्चच्या अंकात मुखपृष्ठापासून ते दुष्काळमुक्तीचा संकल्प, शेतकऱ्याला धीर देण्यासाठी शासनाने दिलेला मदतीचा हात, शेतीला वरदान ठरवणाऱ्या योजना (जलयुक्त शिवार) मा. मंत्रिमहोदयांच्या मुलाखती, ना. गोखले, ज्ञानपीठ विजेते प्रा. नेमाडे आणि प्रेरणा सदरातील यशाचा फॉर्म्युला हे सर्व वाचून अतिशय प्रभावित झालो व त्याचवेळी ओठावर शब्द आले.

थँक यू लोकराज्य

**– संतोष एजंडे, बदापूर, जि. जालना**

### माहितीचा स्रोत

मे चा लोकराज्य अंक वाचनात आला. वाचताना जाणवले शब्दांचे सामर्थ्य तसेच व्यवहारातील दैनंदिन घडणाऱ्या व मंत्रालयातील माहितीचेही अवलोकन यामुळे घरबसल्या करता आले. ही खरोखरच गौरवास्पद व कौतुकास्पद बाब आहे.

**– संजय दत्तात्रय कोळी, मु.पो.ता. शिरोळ, जि. कोल्हापूर**

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

## अतिथी संपादकीय



# पर्वणी भक्तीची, पर्यटनाची

ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा असलेला सिंहस्थ कुंभमेळा १२ वर्षांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे भरत आहे. या कुंभमेळ्याला देशातून आणि जगभरातून येणारे श्रद्धाळू, भाविक आणि पर्यटक यांच्यासाठी उत्तमोत्तम व चांगल्या दर्जाच्या सुविधा राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा कुंभमेळा त्यांच्यासाठी एक संस्मरणीय आणि वेगळा अनुभव देणारा ठरेल.

कुंभमेळ्याच्या तयारीसाठी प्रशासन गेल्या अनेक महिन्यांपासून अथक प्रयत्न करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा करून या कामांना गती दिली, त्यामुळेच आज नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा चेहरा-मोहरा बदललेला आहे. लोकराज्यच्या या अंकात आम्ही कुंभमेळ्याच्या विविध पैलूंची माहिती देणारी विशेष पुरवणी समाविष्ट केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील महिन्यात संपूर्ण महाराष्ट्रात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. जलयुक्त शिवार योजना आता लोकचळवळ होत असून त्यामुळे पाण्याचा शाश्वत साठा निर्माण होण्यास साहाय्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्याच्या अनुषंगाने पुढाकार घेतला. त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त होऊन २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगदिवस सबंध जगात मोठ्या उत्साहात साजरा झाला. नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या पहिल्या योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले होते. योगदिनामुळे नवा उत्साह आणि नवी ऊर्जा सर्वत्र दिसून आली.

मुंबईनंतर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक येथे स्वच्छतेची सप्तपदी कार्यशाळांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या भागातील लोकप्रतिनिधींनी त्यांचा नागरी भाग स्वच्छ करण्याची शपथ घेऊन स्वच्छता अभियानाच्या यशाची मुहूर्तमेढच रोवली असे म्हणावे लागेल.

या विषयांसोबत या अंकात उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची विशेष मुलाखत, नागपूर येथील समाधान शिबीर आणि नियमित सदरे यांचा समावेश आहे.

दिलखुलास, जय महाराष्ट्र, महान्यूज या आमच्या इतर माध्यमांतूनही विविध नव्या विषयांचा परामर्ष सातत्याने घेतला जात असून या माध्यमांच्या लोकप्रियतेमध्ये वाढ होत आहे.

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...


**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# कुंभमेळ्यासाठी महाराष्ट्र सज्ज



**नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील सिंहस्थ महाकुंभाच्या निमित्ताने पुन्हा एकदा आपल्या संस्कृतीला उजाळा मिळणार आहे. मी स्वत: असे मानतो की, या आयोजनासाठी शासन आपले काम चोख बजावत असले तरी या आयोजनाचे खरे वाटेकरी हे साधू आणि महंत आहेत. खऱ्या अर्थाने हे त्यांचे आणि येथे येणाऱ्या कोट्यवधी भाविकांचे आयोजन आहे. हा अद्‌भुत धर्मसंगम अनुभवण्यासाठी देशविदेशातून भाविक येत असतात. नागा साधू असोत की, अत्याधुनिक तंत्रज्ञान लीलया हाताळणारी नवी पिढी असो सारेच या पवित्र उत्सवात सहभागी होतात. नाशिक-त्र्यंबकेश्वर नगरी या उत्सवासाठी सज्ज झाली आहे.**

**कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री गिरीश महाजन**

१२ वर्षांतून एकदा गोदावरीच्या तीरावर होणारा हा सोहळा प्रत्येकाच्या डोळ्याचे पारणे फेडणारा असतो.

कोट्यवधी भाविक या उत्सवात जगभरातून सहभागी होतात. स्वाभाविकच यासाठीची तयारीही तितकीच मोठी असते. हरिद्वारची गंगा, उज्जैनमधील क्षिप्रा, अलाहाबादेतील गंगा-जमुना-सरस्वतीचा संगम आणि नाशिकमधील गोदावरी ही भाविकांसाठी पर्वणीच. विशिष्ट पर्वातील येथील स्नानाला आपल्या संस्कृतीत अपार महत्त्व आहे.

येथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, अलाहाबाद येथे जेव्हा कुंभाचे आयोजन होते, तो घाट हा सुमारे चार हजार एकरएवढा विस्तीर्ण पसरलेला आहे. पण नाशिकमधील हा उत्सव साजरा करण्यासाठी तीनशे एकर जागेची उपलब्धता अतिशय कमी आहे. त्यामुळे कमी जागा हे नियोजन करताना फार आव्हानात्मक ठरते. शाही स्नानासाठी भाविकांच्या सोयींसोबतच त्यांच्या सुरक्षेची अधिक काळजी घ्यावी लागते. कोणतीही शक्यता प्रशासनाला नाकारून चालत नाही.

## देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री

### सुयोग्य नियोजन

प्रशासन अतिशय वेगाने हे काम करत आहे. सुमारे २५०० कोटी रुपये आम्ही या कामासाठी खर्च करीत आहोत. यानिमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचे चित्र पालटण्याचा प्रयत्न होत आहे. अर्थात काही सोयी या कायमस्वरूपी होत आहेत.

अलाहाबाद आणि उज्जैनच्या महाकुंभदरम्यान थंडीचे वातावरण असते. पण नाशिकच्या या आयोजनाच्या काळात पावसाळा असल्याने नियोजनावर ताण येतो. प्रशासनाने त्या दृष्टीने पुरेपूर काळजी घेतली आहे. राज्य सरकार, स्थानिक प्रशासन आणि महापालिका यांच्या मदतीने अगदी सूक्ष्म पातळीवर जावून नियोजनाचा एक आराखडा तयार करण्यात आला. रेल्वे, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, पर्यावरण असे निरनिराळे २२ विभाग या नियोजनाच्या अंतिम टप्प्यात अहोरात्र झटत आहेत.

या सर्व उपायांसोबतच अतिरिक्त रेल्वे प्लॅटफॉर्म, सातत्याने धावणाऱ्या ३००० बसेस, शहराबाहेरून येणाऱ्या १००० बसेस, या वाहनांचे पार्किंग, वाहतूक कोंडी न होण्यासाठी उपाययोजना, हे सर्व होत असताना स्थानिक नागरिकांची गैरसोय होणार नाही, याचीही काळजी घेण्यात आली आहे.

नाशिककरांना दररोज लागणारे पिण्याचे पाणी आणि महाकुंभ काळात लागणारे पाणी याचेही नियोजन करण्यात आले आहे. सांडपाण्याची व्यवस्था, या काळात अखंडित वीजपुरवठ्याची सोय करण्यासाठी दोन उपकेंद्र, ट्रान्सफॉर्मर काही काळाने बंद झालेच तर त्याला पर्यायी बॅकअप, स्नानाच्या घाटांवर पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे.

पाणी, रस्ते, वीज, वाहतूक, अन्य पायाभूत सुविधा जवळजवळ पूर्ण झाल्या आहेत. या मुख्य आयोजनाच्या काळात १६ विविध प्रकारच्या गतिविधींचा समन्वय ते विभाग राखणार असून, या व्यवस्थेची उपकेंद्रेसुद्धा तयार करण्यात आली आहेत. गोदावरीच्या पाण्याच्या पातळीवर सातत्याने देखरेख ठेवण्याची जबाबदारी जलसंपदा खात्याकडे देण्यात आली आहे.

## साधुग्रामांची निर्मिती

अनेक ठिकाणी साधुग्राम तयार करण्यात आले असून, नाशिकमध्ये जवळजवळ तीन लाख तर त्र्यंबकेश्वर येथे दहा हजार साधू निवास करू शकतील, अशी यंत्रणा उभारण्यात आली आहे. या पायाभूत सुविधांतून नाशिकला रस्त्यांचे अतिरिक्त जाळे प्राप्त झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन सुयोग्य पद्धतीने होईल, याचीही खबरदारी घेण्यात येत आहे. आरोग्याच्याही सर्व सोयी येथे उपलब्ध असणार आहेत.

**भाविकांची कुठेही गैरसोय होऊ नये यासाठी आम्ही अतिरिक्त अशी १२०० मीटर जमीन नाशिक येथे तर २०० मीटर जमीन त्र्यंबकेश्वर येथे अधिसूचित केली आहे. तीन नवीन घाटही या निमित्ताने तयार करण्यात आले आहेत. जेणेकरून गर्दीच्या व्यवस्थापना बरोबरच भाविकांचे शाही स्नान सुकर होईल.**

कायमस्वरूपी पायाभूत सुविधा उभारणी, तात्पुरती सेवा आणि त्याची देखभाल-दुरुस्ती अशा तीन टप्प्यात या मेळाव्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. यात सहभागी होणाऱ्या साधूंसाठी साधुग्राम तयार करण्यात आले आहे. यात नाशिक येथे सुमारे तीन लाख तर त्र्यंबकेश्वर येथे सुमारे दहा हजार भाविकांची सोय होऊ शकेल.

## वाहतूक सुविधा

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ४५ कि.मी रोड, नाशिक महानगरपालिकेमार्फत १०५ कि.मी., राष्ट्रीय महामार्ग ५४ कि.मी. आणि त्र्यंबकेश्वर नगरपालिकेतर्फे १७ कि.मी. रस्त्याचे बांधकाम झाले आहे. याशिवाय शहराला १०५ कि.मी. रिंग रोड आणि त्र्यंबकेश्वला चारपदरी रस्ता कायमस्वरूपी तयार झाला आहे. या पायाभूत सुविधांतून नाशिकला रस्त्यांचे अतिरिक्त जाळे प्राप्त झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन सुयोग्य पद्धतीने होईल, याचीही खबरदारी घेण्यात येत आहे. आरोग्याच्याही सर्व सोयी येथे उपलब्ध असणार आहेत.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियानाची साक्ष या मेळाव्याच्या ठिकाणीही आपल्याला मिळणार आहे. नाशिक सिंहस्थ कुंभ मेळाव्यात 'हरित कुंभ' ही संकल्पना राबवली जाणार आहे.

पर्यावरणाचे नुकसान होणार नाही यासाठी स्थानिक पातळीवर विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या काळात प्लास्टिकचा वापर अजिबात होणार नाही, याची काळजी पर्यावरण कार्यकर्ते घेणार आहेत. अनेक राज्यातून लोक येणार असल्याने २८ ठिकाणी कम्युनिटी किचन्स असणार आहेत. इथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाची योग्य व्यवस्था व्हावी यासाठी प्रशासन सज्ज झालेले आहे.

## चोख बंदोबस्त

अपार श्रद्धेपोटी येणारा भाविक हा पूजा, पवित्र स्नान आणि मंदीर भेटीनंतर आपल्या गावी परततो. दूरवरून येणाऱ्यांसाठी रेल्वे व्यवस्थापनाशीही सविस्तर चर्चा झालेली असून रेल्वेची वारंवारिताही वाढविण्यात आली आहे. सुरक्षेसंदर्भातील सर्व संभाव्य धोके लक्षात घेऊन सुरक्षेचाही चोख बंदोबस्त या काळात असणार आहे. २० हजार पोलिस, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन चमू, फोर्सवन अशा सर्व यंत्रणा एकाचवेळी कार्यान्वित असणार आहेत. सुमारे ६०० सीसीटीव्ही कॅमेरे या संपूर्ण गर्दीवर आणि व्यवस्थेवर देखरेख ठेवणार आहेत.

या पावन पर्वासाठी मी सर्वांना शुभेच्छा देतो आणि सहकार्याचे आवाहनही करतो. शेवटी हे आयोजन साधू, महंत आणि सर्व भाविकांचे आहे. आपण सारे मिळून हे आयोजन यशस्वी करू या! ❐❐



**कुंभमेळ्याच्या कामाबाबतची माहिती घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री गिरीश महाजन**

# तयारी पूर्ण, स्वागतासाठी सज्ज...



नाशिकचा उल्लेख 'यंत्रभूमी' आणि 'मंत्रभूमी' असा केला जातो. औद्योगिक विकासाकडे झेप घेताना परंपरा आणि संस्कृतीचे जतन या भूमीने केले आहे. येथील सांस्कृतिक वैभवाचा मानबिंदू म्हणून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनाकडे पाहता येईल. नाशिक-त्र्यंबकेश्वरची ओळख जागतिक स्तरावर पोहोचवणारा हा सोहळा आध्यात्माबरोबरच एकात्मता आणि वैश्विक शांततेचा संदेश देणारा आहे.

प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी म्हणून नाशिकचे महत्त्व आहे. तर गोदावरीचे उगमस्थान आणि बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून त्र्यंबकेश्वरचा परिचय आहे. संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराजांनी याच ठिकाणी समाधी घेतली. वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पावन असलेल्या ठिकाणी होणारा कुंभमेळ्याच्या आयोजनात एखादी भूमिका अदा करणे हा जीवनातील आनंदाचा क्षण आहे. त्या दृष्टीने कुंभमेळामंत्री म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी कुंभमेळ्यात येणारे साधू-महंत आणि भाविकांच्या सेवेची संधी मला देणे हे जसे मोठे आव्हान आहे तेवढाच तो सन्मानाचा भागही आहे.

**गिरीश महाजन**
(पालकमंत्री नाशिक तथा कुंभमेळामंत्री)

नाशिक-त्र्यंबकेश्वरला १४ जुलैपासून सुरू होणारा हा सोहळा ११ ऑगस्ट २०१६ पर्यंत चालणार आहे. या महापर्वातील 'शाही स्नान' हा महत्त्वाचा भाग आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील प्रमुख तीन पर्वणींच्या दिवशी शाही स्नान होणार आहे. यानिमित्ताने येणारे साधू-महंत आणि भाविकांच्या सोईसाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. विविध विकासकामांवर २३७८ कोटी खर्च करण्यात आले आहेत. कुंभमेळा आध्यात्माची आणि श्रद्धेची पर्वणी तर आहेच मात्र त्यानिमित्ताने अनेक कायमस्वरूपी विकासकामे होत असल्याने ती नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाची पर्वणी ठरली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

### सुविधांचा विकास

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्त अनेक सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. नाशिक येथे ३२५ एकर क्षेत्रात आणि त्र्यंबकेश्वर येथे १७ एकर क्षेत्रात साधुग्राम विकसित करण्यात आले आहे. साधू-महंतांशी समन्वय साधत तेथील कामे चांगल्या पद्धतीने करण्यात येत आहेत. नाशिक येथे ७ तर त्र्यंबेश्वर येथे ३ घाटांची नव्याने बांधणी करण्यात आल्याने भाविकांना चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. साधुग्रामबरोबरच भाविकग्राम म्हणून निवारा शेडची उभारणी हे यावेळचे वैशिष्ट्य आहे. भाविकांना पुरेशा प्रमाणात पाणी, वाहतूक आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होतील याची विशेष काळजी घेण्यात येत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही आणि 'सेन्ट्रलाइज्ड पब्लिक अॅड्रेस सिस्टीम' बसवण्यात येत आहे. 'हरितकुंभ' उपक्रम हे यंदाच्या कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य आहे. यानिमित्त जागतिक स्तरावर नाशिक जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण होणार आहे. या उपक्रमांतर्गत नदी प्रदूषण रोखणे, प्लास्टिक बंदी, परिसर स्वच्छता आदी बाबींवर विशेष लक्ष देण्यात येत आहे.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या जनतेने उत्स्फूर्तपणे गोदावरी स्वच्छता मोहीम राबवून ३७५ टन कचरा काही तासात बाजूला केला. शासकीय कार्यालये, विविध सेवाभावी संस्था आणि नागरिकांचा यात सहभाग होता. अशा उपक्रमांच्या माध्यमातून नाशिकचे स्वच्छ व सुंदर रूप जगभरातील भाविकांना दिसून पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वदूर जाईल. कुंभमेळा ही भक्तीची पर्वणी आहे, तशी ती पर्यटनाची पर्वणी आहे. भव्यदिव्य सोहळा 'याची देही याची डोळा' अनुभवण्यासाठी देश-विदेशातील नागरिक येथे येतात.

### पर्यटनास चालना

नाशिक जिल्ह्यात अनेक धार्मिक, ऐतिहासिक आणि निसर्ग पर्यटनस्थळे आहेत. या स्थळांची माहिती पर्यटकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्नदेखील करण्यात येत आहेत. त्यामुळे इथल्या पर्यटन क्षेत्राला आणि परिणामत: आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. हे लक्षात घेऊनच केवळ शासन किंवा प्रशासनच नव्हे तर जिल्ह्याची जनता भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांची संख्या सातत्याने वाढते आहे. सर्वांच्या सहकार्याने हे 'शिवधनुष्य' पेलण्यात यश येईल आणि स्मरणीय सोहळ्याचे आपण सर्व साक्षीदार होऊ, असा विश्वास मला वाटतो. ❐❐

# सिंहस्थासाठी दर्जेदार सुविधा



**सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासंदर्भात आढावा बैठक घेतल्यानंतर सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी समाधान व्यक्त केले. राज्यशासनातर्फे व्यापक प्रमाणात उपाययोजना सुरू असून हा कुंभमेळा यशस्वीपणे पार पाडला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.**

अध्यात्म, ज्ञान आणि भारतीय संस्कृतीचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा यंदा नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होत आहे. दर बारा वर्षांनी होणाऱ्या या सोहळ्यासाठी येणाऱ्या साधू-महंत आणि भाविकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

**दादाजी भुसे**
(सहकार राज्यमंत्री)

महाराष्ट्र शासनामार्फत रस्ते, पाणी, आरोग्य, साधुग्राम, भाविकग्राम, घाटांची बांधणी व सुशोभीकरण, विद्युतीकरण, सार्वजनिक वाहतुकीचे व्यवस्थापन आदी कामांसाठी २३७८ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात झालेली कायमस्वरूपी उपयोगी येणारी विकासकामे आणि यावेळच्या कुंभमेळ्यात प्रथमच मांडलेली 'हरितकुंभ' संकल्पना हे या कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत सामान्य नाशिककरांचे ३९ हजार हात पुढे सरसावले आणि तब्बल पावणेचारशे टन कचरा गोळा करून गोदावरी, कपिला, वाघाडी, नासर्डी या नदीपात्रांची स्वच्छता केली गेली. ही मोहीम राबवून नाशिककरांनी येथे येणाऱ्या साधू-महंत आणि भाविकांचे आणि सिंहस्थ कुंभमेळ्याचे उत्साहाने स्वागत केले आहे. नाशिककरांनी स्वयंस्फूर्तीने राबवलेल्या या उपक्रमाने एक आदर्श उभा केला आहे. या उपक्रमासाठी येथील प्रशासनाने जो पुढाकार घेतला तोदेखील कौतुकास्पद आहे. मध्यंतरी त्र्यंबकेश्वरनगरीत साधू-महंत आणि प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनीदेखील स्वच्छता मोहीम राबवून शहर स्वच्छ केले, हा उपक्रमदेखील अतिशय प्रशंसनीय आहे.

प्रशासनाने केलेले सूक्ष्म नियोजन आणि त्याप्रमाणे होणारी अंमलबजावणी पाहता सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे साधू-महंत, भाविक निश्चितच सुखावतील, असा मला विश्वास वाटतो. जिल्ह्यातील एक जबाबदार लोकप्रतिनिधी आणि राज्यमंत्रिमंडळातील एक सदस्य म्हणून सिंहस्थ कुंभमेळ्याचे यशस्वी आयोजन होणे ही समाधानाची बाब आहे. त्यासाठी शासन आणि प्रशासनातील सर्व घटक प्रयत्नशील आहेत. हा महासोहळा निश्चितच यशस्वी करून दाखवू, अशी ग्वाही मी यानिमित्ताने देतो.

### अन्य तीर्थक्षेत्रांचाही विकास

सिंहस्थ कुंभमेळा हा नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होत असला तरी यानिमित्ताने येथे येणारे भाविक जिल्ह्यातील सप्तशृंगीगड, इगतपुरी, कावनई, टाकेद आदी तीर्थक्षेत्रांनादेखील भेटी देतात. त्या ठिकाणी देखील पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत असून रस्ते, आरोग्य, पाणी आदी व्यवस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

❑ ❑





# गतिमान प्रशासन आणि सुसज्जता

**नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वितेसाठी नाशिकच्या जिल्हा प्रशासनाबरोबर एकूण संपूर्ण राज्य प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधील कामांची पाहणी करून प्रशासनाच्या सज्जतेबद्दल सांगताहेत राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय...**

दर बारा वर्षांनी भरणारा कुंभमेळा हा प्रत्येक भाविकासाठी मोठी आनंदपर्वणीच असतो. पारंपरिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या कुंभमेळ्यासाठी नाशिक सज्ज झाले आहे. कुंभमेळ्यानिमित्त जगभरातील श्रद्धाळू नाशिक आणि त्र्यंबकेश्वरला भेट देतात. त्यामुळे आगामी तीन ते चार महिने नाशिक आणि संपूर्ण महाराष्ट्रावर जगाचे लक्ष असणार आहे.

मंत्रालयस्तरावर नियमितपणे सिंहस्थ कुंभमेळाविषयक आढावा बैठका घेण्यात येतात. त्यातून तेथील कामांची प्रगती मी जाणून घेत असतो. मात्र कुंभमेळ्याच्या सोहळ्याची तयारी कशी सुरू आहे याचा प्रशासकीयदृष्ट्या आढावा घेण्यासाठी मी नुकतीच त्र्यंबकेश्वर आणि नाशिकला भेट दिली.

### समाधानकारक प्रगती

सिंहस्थाच्या कामाची प्रगती समाधानकारक आहे, मात्र प्रशासनाला अधिक सतर्क राहून वेळेत ही कामे पूर्ण करावयाची आहेत. त्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणा समन्वयाने ही जबाबदारी पार पाडताना दिसत आहे. कुंभमेळ्याला धार्मिक महत्त्व आहेच त्यासाठी जगभरातून श्रद्धाळू येत असतात. त्यामुळे राज्याच्या पर्यटन विकासासाठी कुंभमेळा पर्वणीच ठरणार आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणांनी नियोजन करावे, अशी सूचना मी दिली आहे. माझ्या दोन दिवसाच्या नाशिक जिल्ह्याच्या भेटीत मी आधी त्र्यंबकेश्वर येथील कामांची पाहणी केली. कुशावर्त परिसरात करण्यात आलेल्या अंडरग्राऊंड केबलिंगमुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण शहरात चांगला प्रकाश राहील याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. प्रत्येक रस्त्यावर पुरेशा प्रमाणात पथदिवे लावण्यात आले आहेत. विशेषत: मंदिर आणि कुशावर्त परिसरात चांगली प्रकाश व्यवस्था व भाविकांना फिरताना त्रास होणार नाही या दृष्टीने मार्गांची रचना करण्यात यावी, तसेच नव्याने तयार करण्यात आलेल्या घाटांची माहिती विविध माध्यमांद्वारे भाविकांपर्यंत पोहोचवण्यात यावी अशा सूचना मी जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

### साधुग्राममधील सोईसुविधा

साधुग्राममधील काम समाधानकारक झाले आहे. देशभरातून साधु-महंत कुंभमेळ्यासाठी येत असतात त्यांना साधुग्राममध्ये आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या ठिकाणी वीज, पाणी, रस्ते तसेच आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्यात मोठ्या प्रमाणात भाविक येणार असल्याने अनुमानित संख्येनुसार भाविकांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळावे यासाठी योग्य नियोजन तसेच वीजपुरवठा, गर्दीचे नियोजन करणे आवश्यक आहे. याबाबतही मी जिल्हा



प्रशासनाला सूचना केल्या आहेत. त्र्यंबकेश्वर येथील अहिल्या घाट हा निसर्गरम्य परिसरात आहे, या घाटाला पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याची गरज आहे. या घाटाचे काम चांगले झाले आहे. पर्वणीच्या दिवशी घाटावरील पाण्याची आवश्यक पातळी कायम राहील याची दक्षता घेण्यात येईल. घाटाला जोडणाऱ्या रस्त्यांचे काम लवकर पूर्ण करण्यात येईल. कन्नमवार घाटाजवळील उताराच्या भागात भाविकांना त्रास होणार नाही या दृष्टीने मार्गाची रचना करण्यात येणार आहे. नदी पात्राच्या स्वच्छतेकडे महानगरपालिका विशेष लक्ष पुरवणार आहे.

### नव्या घाटांचा स्नानासाठी लाभ

नव्या घाटांमुळे भाविकांना पवित्र स्नानासाठी चांगली सोय उपलब्ध झाली असून या घाटांची माहिती राज्याबाहेरील भाविकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

प्रशासनाने चांगले सूक्ष्म नियोजन केले असल्याने कुंभमेळ्यात त्याचा चांगला फायदा होईल. या नियोजनाला स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरची जोड दिल्यास अधिक चांगल्या पद्धतीने आपत्ती व्यवस्थापनाची तयारी करणे व अचानक आलेल्या आपत्तीला सक्षमपणे सामोरे जाणे शक्य होईल. आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिक करताना एनडीआरएफला सहभागी करून घेण्याच्या सूचना मी दिल्या आहेत. कुंभमेळ्यादरम्यानदेखील त्यांचे सहकार्य घेण्यात येईल. कुंभमेळ्यात स्वयंसेवकांना ओळखपत्र देण्यात येऊन त्यांना प्रशिक्षण दिल्यास वाहतूक नियोजन चांगले होऊन गर्दीवर नियंत्रण करणे सोईचे होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांना घाटावर जाताना अडचण येऊ नये यासाठी विविध पर्यायांवर विचार करण्यात येईल. नुकतीच नाशिककरांनी एकत्र येऊन स्वच्छता मोहीम राबवली आहे. हा एक चांगला उपक्रम आहे. स्वच्छता ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे हजारो नाशिककरांनी एकत्र येऊन केलेली स्वच्छता ही शहराच्या सौंदर्यात भर घालणारी आहे. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या श्रद्धाळूंच्या स्वागतासाठी आम्ही सज्ज आहोत हा संदेश देणारी ठरली आहे.

## भव्यदिव्य सोहळा

**ध्वज पर्व**
मंगळवार १४ जुलै २०१५

**शाही स्नान**
**नाशिक**
**पहिले** – शनिवार, २९ ऑगस्ट २०१५
**दुसरे** – रविवार, १३ सप्टेंबर २०१५
**तिसरे** – शुक्रवार, १८ सप्टेंबर २०१५

**त्र्यंबकेश्वर**
**पहिले** – शनिवार, २९ ऑगस्ट २०१५
**दुसरे** – रविवार, १३ सप्टेंबर २०१५
**तिसरे** – शुक्रवार, २५ सप्टेंबर २०१५

### नव्या कल्पना, नवे तंत्रज्ञान

जिल्हा प्रशासनाने कुंभमेळ्याचे नियोजन करतांना नव्या कल्पनांचा चांगल्या प्रकारे वापर केला आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोगही स्तुत्य आहे. कुंभमेळ्यासाठी कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली चांगली चमू तयार झाली असून अधिकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास दिसून येत आहे.

**शब्दांकन : अजय जाधव**




**नाशिक येथे कुंभमेळ्याच्या कामाची पाहणी करताना मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय**

# सिंहस्थासाठी प्रशासन सज्ज



**देशपरदेशातून येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी नाशिक सज्ज होत असून शासनाच्या विविध यंत्रणा नियोजनबद्ध तयारी करत आहेत. श्रद्धा आणि भक्तींचा हा महासोहळा येणाऱ्या प्रत्येकासाठी सुखद अनुभव ठरेल असा प्रयत्न या कामातून दिसत आहे व त्यावर नजर टाकली असता या कार्याचा आवाका किती मोठा आहे, याची प्रचिती येते.**

किरण वाघ

सिंहस्थ कुंभमेळा पर्वणीच्या कालावधीत नाशिक येथे १ कोटींच्या जवळपास तर त्र्यंबकेश्वर येथे ३० लाख भाविक भेट देतील असा अंदाज आहे.

या ठिकाणांची सध्याची लोकसंख्या पाहता दोन्ही ठिकाणी इतक्या प्रचंड संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी मोठ्या प्रमाणात सोईसुविधा निर्माण करण्याचे काम शासनाने हाती घेतले. तसेच भाविकग्राम, बाह्य व अंतर्गत वाहनतळ, स्नानाचे घाट, रस्ते, भोजन-निवासाच्या सोई निर्माण करतानाच शहरात आरोग्य, वाहतूक, पाण्याच्या टाक्या, कायदा सुरक्षा व्यवस्थेच्या सुविधांची कामे, माहिती फलक, कायमस्वरूपी व तात्पुरती रुग्णालये अशा सेवा सुविधांचा यात समावेश आहे. त्यासाठी होणाऱ्या कामांमध्ये शासनाच्या अनेक विभागांचा सहभाग आहे.

### बाह्य व अंतर्गत वाहनतळे

देशाच्या कानोकोपऱ्यांतून व राज्याच्या विविध रस्त्यांनी येणाऱ्या भाविकांसाठी कायमस्वरूपी करण्यात येणाऱ्या कामांबरोबरच खास पर्वणी कालावधीत भाविकांना तात्पुरत्या सुविधा देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. पुणे, मुंबई, धुळे, औरंगाबाद, गंगापूररोड आदी मार्गांनी जास्त भाविक नाशिक येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन या ठिकाणी सर्व सुविधा असणारे तात्पुरते बाह्य वाहनतळ निर्माण करण्यात येत आहेत.

### निवारा व सामुदायिक भोजनगृहे

भाविकांना शहरात व घाटांवर जाण्यापूर्वी विश्रांतीसाठी येथील निवारा शेड उपयोगी ठरतील. या ठिकाणी पिण्याचे पाणी व खाद्यपदार्थांचे स्टॉल्सदेखील असणार आहेत. तसेच शहराची, रस्ते, घाट, बसव्यवस्थेची अधिकृत माहिती देण्यासाठी माहिती केंद्र असणार आहे. शहरातील सुव्यवस्थेच्या सद्य:स्थितीची अद्ययावत माहिती देणाऱ्या संपर्क व्यवस्थेबरोबरच पिण्याचे पाणी, वैद्यकीय व्यवस्था, मदत केंद्र, पोलीस चौकी, शौचालये आणि घाटांवर जाण्यासाठी बसव्यवस्था येथे उपलब्ध असणार आहे.

प्रत्येकाची गरज व सवय लक्षात घेऊन अन्न व भोजनाच्या सोयीसाठी सवलतीच्या दरात अन्नधान्य तसेच केरोसीन किंवा गॅससिलेंडर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. याच वेळी 'सामुदायिक भोजनगृहे' सारखी नावीन्यपूर्ण संकल्पना यावेळी राबवण्यात येत आहे. पेट्रोलियम कंपन्यांच्या सहकार्याने बाह्य वाहनतळांवर १९० बर्नर, तर दोन्ही साधुग्राम येथे ९० बर्नरची सोय करण्यात येणार आहे. यावेळी ७ लाख लिटर केरोसिन व २५ हजार सिलेंडरचा पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आहे. तसेच २१०० टन गहू, १४०० टन तांदूळ, ३५० टन साखर सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### बसव्यवस्था

खाजगी व सार्वजनिक वाहनांनी आलेल्या भाविकांना आपली वाहने बाह्य वाहनतळांवर ठेवून घाटांकडे व अंतर्गत वाहनतळांकडे जाण्यासाठी येथून बसची व्यवस्था असणार आहे. यासाठी एका दिवसात नाशिक शहरात बाह्य वाहनतळ व अंतर्गत वाहनतळादरम्यान ५८ हजार बस फेऱ्या करतील. त्यातून ४० लाख भाविकांना वाहून नेतील असा अंदाज आहे. यासाठी राज्य परिवहन महामंडळाने बसचे मार्ग, अंतर, प्रवासाला लागणारा वेळ यांचे बारकाईने नियोजन केले आहे. तीन हजार अतिरिक्त

## नाशिक येथील महत्त्वाचे संपर्क क्रमांक

पोलीस नियंत्रण कक्ष नाशिक
१००/२५७०३३३/३४
पोलीस आयुक्तालय
२५७०१८३/२३५२१२२
पोलीस मुख्यालय
२५७०४४८

**अग्निशामक केंद्र**
मुख्य अग्निशमन केंद्र
२५९०८७१
पंचवटी अग्निशमन केंद्र
२५१२९१९
नाशिक रोड अग्निशमन केंद्र
२५६१३७९
सातपूर अग्निशमन केंद्र
२३५०५००
सिडको अग्निशमन केंद्र
२३९३९३१
जिल्हा सामान्य रुग्णालय
०२५६३-
२५७३९३६/२५७६१०६
त्र्यंबकेश्वर ग्रामीण रुग्णालय
०२५९४-
२३३०६५/२३३०२९

**रुग्णवाहिका**
१०८

**बसस्थानक**
नवीन मध्यवर्ती बसस्थानक
२३०९३०८
जुने मध्यवर्ती बसस्थानक
(सीबीएस)
२३०९३१०,२३०९३०६
निमाणी (पंचवटी) बसस्थानक
२६२९६९५
नाशिकरोड बसस्थानक
२४६५३०४
त्र्यंबकेश्वर बसस्थानक
०२५९४-२३३१२६

**रेल्वे स्थानक**
रेल्वे चौकशी- नाशिकरोड
१३१, १३९, ०२५३-
२४६१२७४
रेल्वे आरक्षण
१३७, ०२५३-२४६०१५२
देवळाली रेल्वे स्थानक
०२५३-२५४१२२९
महानगरपालिका हेल्पलाईन
०२५३-
६४२३००/८३९०३००३००
आपत्ती व्यवस्थापन संपर्क
१०७७

## भाविकांसाठी ई-सेवा

- **संकेतस्थळ-** kumbhmela2015.maharashtra.gov.in
- **फेसबूक-** facebook.com/simhasthakumbhmela2015
- **ॲप-** Nashik Trimbak Kumbh 2015 App
- **कॉलसेंटर-** महानगरपालिकेच्या कॉलसेंटरची माध्यमातून 24 x 7 सेवा उपलब्ध

### नाशिकला कसे पोहोचाल?
### रस्तामार्गे

विविध शहरांपासून नाशिकचे अंतर

- मुंबई ते नाशिक-१६८ कि.मी.
- पुणे ते नाशिक- २१० कि.मी.
- औरंगाबाद ते नाशिक-१८२ कि.मी.
- शिर्डी ते नाशिक-८८ कि.मी.
- धुळे ते नाशिक-१५८ कि.मी.
- इंदौर ते नाशिक- ४२० कि.मी.
- दमण-दीव ते नाशिक- १५६ कि.मी.
- सुरत ते नाशिक-२३४ कि.मी.

बसेसची व्यवस्था पर्वणी काळात करण्यात येणार आहे.

### भाविकांच्या स्नानासाठी नवीन घाट

गोदावरीच्या तीरावर नव्याने घाटांची कामे करण्यात येत आहे. त्यामुळे नवीन रामघाट सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उपलब्ध होईल. ही कामे वेगाने पूर्ण होत आली असून नव्याने होत असलेल्या रामघाटांमध्ये प्रामुख्याने टाळकुटेश्वर ते कन्नमवार पूल घाट, कन्नमवार


साधुग्राम परिसर

पूल ते लक्ष्मी नारायण मंदिर घाट, लक्ष्मी नारायण मंदिर ते कपिल संगम घाट, राम घाट टाकळी, दसक पंचकचा राम घाट यांच्या बरोबरच कन्नमवार पूल ते लक्ष्मी नारायण मंदिर घाटांचे सुशोभीकरण व विकास करण्यात आला आहेत. जलसंपदा विभागामार्फत ३ घाटांची कामे होत आहे.

### वैद्यकीय सुविधा

सिंहस्थाच्या कालावधीत नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्यांना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. रुग्णसेवेसाठी २१ शासकीय रुग्णालयांबरोबर २८ खाजगी रुग्णालयांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यामध्ये शासनाच्या ९ व खाजगी १५ मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल्सचा समावेश आहे. आंतररुग्णांसाठी ५४९९ बेड्स क्षमतेची तयारी आहे. या कालावधीत ८६ फिरती वैद्यकीय पथके विविध ठिकाणी असणार असून १७८ रुग्णवाहिका सेवेसाठी असणार आहेत.

सिंहस्थाच्या पर्वणी काळात श्रद्धेने येणाऱ्या भाविकांना सोहळ्याचा आनंद मिळावा यासाठी शासनयंत्रणा प्रयत्नशील आहे.

मोबाइल ॲपस, स्वतंत्र संकेतस्थळ, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, अतिरिक्त मोबाइल टॉवरची उभारणी यासह प्रदूषणविरहित कुंभमेळ्यासाठी 'हरितकुंभ' उपक्रमांचे आयोजन करून भाविकांसाठी ही पर्वणी अधिक आनंद देणारी ठरावी असेच प्रशासनाचे प्रयत्न आहेत.

त्यासाठी अहोरात्र झटत असलेल्या शासन यंत्रणेतील प्रत्येक घटकाच्या कामाचे सुफळ प्रत्यक्ष सिंहस्थाच्या वेळी येणाऱ्याला चाखायला मिळेल हे नक्की!



# परिपूर्ण तयारी, उत्कृष्ट सुविधा

**सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. विकासकामांमुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहरांचे रूप पालटू लागले आहे. चकाकणारे विस्तारित रस्ते, रंगीत घाट, पथदीप, साइनबोर्डस् यामुळे सौंदर्यात भर पडते आहे. या महापर्वानिमित्त अनेक पायाभूत सुविधांचा विकास होत असल्याने दोन्ही शहरवासीयांसाठी याचे महत्त्व अधिक आहे.**

डॉ. किरण मोघे

कुंभमेळ्यात शाही स्नानाला वेगळे महत्त्व आहे. यानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यांतून साधू-महंत येत असतात. त्यांची व्यवस्था स्थानिक आखाडे आणि साधुग्राममध्ये केली जाते. नाशिकमध्ये जागा कमी असली तरी नियोजन चांगले असते अशी साधू-महंतांची प्रतिक्रिया अनेक बैठकांमधून ऐकायला मिळते. नियोजनाची हीच परंपरा अधिक चांगल्या पद्धतीने पुढे नेत शासनातर्फे या परिसरात मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यात प्रामुख्याने टॉयलेट्स, आरोग्य सुविधा, बाथरूम, नळ जोडणी, पथदीप, अग्निशमन आदी सुविधांचा समावेश आहे. नाशिकमध्ये ३२५ एकरावर तर त्र्यंबकेश्वर येथे १७ एकरावर साधुग्राम वसविण्यात आले आहे. गतवर्षीच्या तुलनेत हे क्षेत्र १२७ एकराने अधिक आहे.

### वाहतूक

कुंभमेळ्यात एकाच दिवशी मोठ्या संख्येने भाविक शहरात येतात. भाविकांना घाटाकडे जाणे अधिक सुलभ व्हावे तसेच शहराकडे येणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होऊ नये यासाठी रस्ते रुंदीकरण आणि नूतनीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ४०५ किमी, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या हद्दीतील २० किमी, मनपा हद्दीतील १०५ आणि त्र्यंबकेश्वर नगर परिषदेच्या १७ किमी रस्त्यांचे काम करण्यात आले आहे. या रस्त्यांवर ३८ ठिकाणी लहान आणि तेवढ्याच संख्येने मोठे पूल बांधण्यात आले आहेत. वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने शहराला मिळालेली ही महत्त्वाची भेट म्हणावी लागेल.

रेल्वे सुविधेचा विकास करताना ओढा आणि नाशिकरोड रेल्वे स्टेशनवर तात्पुरत्या सुविधा पुरवणे, नाशिकरोड रेल्वे स्थान, उड्डाणपूल विस्तार, पार्किंग विकास, अतिरिक्त फलाट ४ चे बांधकाम यासाठी २५ कोटी खर्च करण्यात येत आहेत. देवळाली येथे देखील फलाटाची लांबी वाढविण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळातर्फे पर्वणी काळात लांबच्या वाहतुकीसाठी एक हजार आणि अंतर्गत वाहतुकीसाठी ३००० बसेस चालवण्यात येणार आहेत. नाशिक बसस्थानकावर सीसीटीव्ही बसविणे, त्र्यंबकेश्वर बसस्थानकाचे डांबरीकरण, देवळाली आगाराचे बांधकाम आदी कामे करून एसटी भाविकांच्या सेवेसाठी सज्ज झाली आहे. नाशिक विमानतळ टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. नाशिक येथून कुंभमेळ्यापूर्वी विमान सेवा सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

### पवित्र स्नानासाठी आता विस्तीर्ण घाट

**यापूर्वी भाविकांना पवित्र स्नानासाठी केवळ रामकुंड उपलब्ध होते. यंदाच्या कुंभमेळ्यासाठी नवे घाट बांधण्यात आले आहे. नाशिकमध्ये २७०० मीटरचे सात आणि त्र्यंबकेश्वर येथे ७५० मीटर लांबीचे तीन नवे घाट आता उपलब्ध झाले आहेत. नव्याने होत असलेल्या राम घाटांमध्ये प्रामुख्याने टाळकुटेश्वर ते कन्नमवार पूल घाट, कन्नमवार पूल ते लक्ष्मीनारायण मंदिर घाट, लक्ष्मीनारायण मंदिर ते कपिल संगम घाट, रामघाट टाकळी, दसक पंचकचा रामघाट यांचा समावेश आहे. प्रत्येक घाटाला जोडणारे रस्तेदेखील विकसित करण्यात आल्याने भाविकांसाठी ते सुविधाजनक होणार आहे. घाटांना रंग देण्यात येत असून परिसराचे सुशोभीकरण करण्यात येत आहे.**












## विद्युत व्यवस्था

महावितरणतर्फे नव्याने आवश्यक २५ मे.वॅ.ची अधिक क्षमता निर्माण करण्यासाठी ६२ नवी रोहित्रे बसवण्यात आली असून ४६ रोहित्रांची क्षमतावाढ करण्यात आली आहे. कुंभमेळा कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहावा यासाठी २ नवी उपकेंद्रे आणि ३३ केव्हीचे तीन बे उभारण्यात आले आहे. ५१ किमीच्या उपरी आणि भूमिगत विद्युतवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. शाही मार्ग परिसरातील विद्युतवाहिन्या सुरक्षेच्या दृष्टीने भूमिगत करण्यात आल्या आहेत. पर्यायी केंद्रावरून वीज देण्याची व्यवस्थादेखील केली आहे.

## पाणी पुरवठा

कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन नाशिकध्ये १३६ द.ल.लि. आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २.६० द.ल.लि. क्षमतेचे नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प क्रियान्वित करण्यात आले आहेत. नाशिक येथे १३ तर त्र्यंबकेश्वर येथे २ जलकुंभ नव्याने उभारण्यात येत आहेत. त्र्यंबकेश्वर येथील गौतकी-गोदावरी पाणी पुरवठा योजना ही नागरिकांसाठी कायमस्वरूपी मोठी उपलब्धी आहे. २७ कोटी खर्चाच्या या योजनेद्वारे २१ किमी वाहिनीच्या माध्यमातून गावाला आणि ९ किमी वाहिनीच्या माध्यमातून आखाड्यांना पाणी पुरवठा होणार आहे.



## आरोग्य सुविधा

जिल्हा रुग्णालय परिसरात २०० खाटांची नवी इमारत उभारण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर ग्रामीण रुग्णालयाची क्षमतावृद्धी करून ७० खाटांची क्षमता वाढविण्यात आली आहे. परिसरातील नागरिकांच्या दृष्टीने ही सुधारणा महत्त्वाची ठरणार आहे. रुग्णालयाच्या बळकटीकरणांतर्गत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या सर्व सुविधांशिवाय मलनि:स्सारण, सांडपाणी व्यवस्थापन, कुशावर्त येथील जलशुद्धीकरण प्रकल्प, स्वच्छता व्यवस्था आदी अनेक कामे करण्यात आली असल्याने शहराच्या दृष्टीने ती कायमस्वरूपी जमेची बाजू ठरणार आहे.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील पुरातन मंदिराच्या रासायनिक जतनाचे काम यानिमित्ताने करण्यात येत आहे. हा सांस्कृतिक ठेवा पर्यटकांना आकर्षित करणारा असल्याने पर्यटनवृद्धीसाठी त्याचा लाभ होणार आहे.

❒ ❒



### साधुग्राममधील सुविधा

जागेची व्याप्ती
३०० चौमी.
अंतर्गत रस्ते - ९मी. रुंद
सेवा पथ - ६ मी. रुंद
पथदिवे - प्रत्येकी ३० मीटर वर एक

### प्लॉटनिहाय सुविधा

- शौचालये- ४ (१ कमोड)
- स्नानघर- ५
- पाणी पुरवठा- २४ X ७
- विद्युत पुरवठा- (२.५ किवॅ )

# कुंभमेळ्याचे पौराणिक महत्त्व

**प्रत्येक भूभागाची स्वत:ची अशी एक विशिष्ट संस्कृती असते. तिथल्या लोकांच्या श्रद्धा चालीरीती, जीवनशैली या रूपात ही संस्कृती व्यक्त होत असते. या संस्कृतीची जडणघडण होण्यात त्या भूभागाचा इतिहास, तिथली भौगोलिक वैशिष्ट्ये, त्या प्रदेशात फुललेले तत्त्वज्ञान यांचा मोठा वाटा असतो. एखाद्या श्रद्धेमागील किंवा प्रथेमागील कार्यकारणभाव प्रत्येक वेळी आपल्याला समजतोच असे नाही. पण, प्रादेशिक इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान यांचा मागोवा घेतला म्हणजे हळूहळू उलगडा होऊ लागतो. श्रद्धेची मुळे दिसू लागतात. भारतीय संस्कृतीमध्ये तर अशा श्रद्धा आणि प्रथा आणि त्यानिमित्त साजरे होणारे उत्सव अमाप. तेव्हा त्यांच्या मुळाशी पोहोचायचा प्रयत्न आपण करायला हवा. २०१५ हे साल भारतासाठी आणि विशेषत: महाराष्ट्रासाठी उत्सवी संवत्सर आहे. कारण यंदाचे कुंभपर्व हे गोदावरी तीरावरील त्र्यंबकेश्वर - नाशिक येथे जुलै महिन्यापासून मुख्यत: सप्टेंबरपर्यंत साजरे होणार आहे.**

अवघ्या देशभरातून लाखो भाविक, संतमहंत भक्तिभावाने या पर्वात सहभागी होण्यासाठी नाशिकला पोहोचतील. परदेशी पर्यटकदेखील उत्सुकतेपोटी येथे येण्यासाठी कुंभपर्वाचा योग साधतील. गोदावरीत डुबकी मारण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक नेमके आत्ताच का जमणार आहेत? कुंभपर्व म्हणजे नेमके आहे तरी काय? याचे उत्तर आपला इतिहास, तत्त्वज्ञान यांचा धांडोळा घेतला म्हणजे सापडते.

प्रा. प्रसाद भिडे

### अमृताचे थेंब सांडिले कुंभातुनी पदतळी

कुंभपर्व का साजरे होते याबद्दलची पुराणातील कथा थोडक्यात अशी सांगितली जाते. देव आणि दानवांनी मिळून समुद्रमंथन केले. समुद्रातून चौदा रत्ने बाहेर आली. त्यापैकी एक रत्न अमृत हे होते. धन्वंतरी हा चौदा रत्नांपैकीच एक असलेला देवांचा वैद्य अमृतकुंभ घेऊन समुद्रातून वर आला. हा अमृतकुंभ पाहून देवांच्या मनात आले की दानवांनी जर हे अमृत पिऊन ते अमर झाले तर आपल्यावर मोठी आपत्ती ओढवेल. दानवांना हे अमृत मिळू नये म्हणून इंद्राचा पुत्र तो अमृतकुंभ घेऊन पळाला. त्यानंतर अमृतकुंभावर ताबा मिळवण्यासाठी देव आणि दानवांचे बारा दिवस आणि बारा रात्री युद्ध झाले. युद्धादरम्यान बारा वेळा अमृतकुंभ खाली पडला आणि त्यातील काही थेंब सांडले. सूर्य, चंद्र, शनी आणि गुरू यांनी प्रत्येक वेळी कुंभाचे रक्षण केले. ज्या बारा ठिकाणी हा कुंभ पडला त्यापैकी चार ठिकाणे पृथ्वीवर होती. हरिद्वार, प्रयाग, उज्जयिनी आणि त्र्यंबकेश्वर ही ती चार ठिकाणे होत. याच चार ठिकाणी क्रमाक्रमाने कुंभमेळा साजरा होतो. एका ठिकाणी कुंभपर्व झाले म्हणजे त्यानंतर बारा वर्षांनी पुन्हा तेथेच पर्व होते. कारण देवांचा एक दिवस म्हणजे मानवाचे एक वर्ष असे एक गृहीतक आहे. असे मानतात की ज्या दिवशी जेथे थेंब पडला तिथे त्याच दिवशी सर्व देव संतमहंताच्या रूपात अवतरतात आणि अमृतपानाने आणि स्नानाने अमरत्वाचे वरदान मिळवतात. कुंभपर्व नेमके कुठे होणार हे सूर्य, चंद्र, शनी आणि गुरूच्या स्थितीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, गुरू सिंह राशीत असतो तेव्हा नाशिक इथे कुंभपर्व साजरे होते. भूतलावर पडलेल्या अमृतकुंभाचे रक्षण याच ग्रहांनी केले, हा कथेतील संदर्भ या ग्रहस्थितीमागे आहे. तर अशा प्रकारे अमृतकुंभातील अमृत



भूमीवर सांडले म्हणून हा कुंभमेळा होतो. आता या मिथकाचा अर्थ लावला म्हणजे कुंभपर्वामागील भूमिका आपल्याला कळते. अमृताचा उल्लेख अगदी वेदांपासूनच्या वाड.मयात आढळतो. अमृत म्हणजे नेमके काय द्रव्य हे सांगता येत नाही. पण एक उल्लेख जो सर्वत्र आढळतो तो म्हणजे ते प्यायल्याने अमरत्त्व येते. अमरत्व म्हणजे जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होणे. मोक्ष ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होणे म्हणजेच मोक्ष होय. मोक्षप्राप्तीची कामना ही कुंभपर्वातील अमृतस्नानामागील प्रेरणा असते. दक्षिण भारतातील कावेरी नदीच्या तीरावरील कुंभकोणम् येथेदेखील दर बारा वर्षांनीच यात्रा भरते आणि येथील कुंभेश्वर मंदिराबाबतही अमृतकुंभातून सांडलेल्या अमृताचाच संदर्भ आहे. त्यामुळे अमरत्वाची, मोक्षाची प्रेरणा हे तत्त्व

येथेही दिसतेच.

### नदीमाय धुवे सारी सारी पापे

कुंभपर्वाच्या उत्सवाचा आणखी एक कंगोरादेखील आहे. भारताचा भूगोल त्यासाठी लक्षात घ्यायला हवा. भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे नद्यांना आपल्याकडे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यातही स्वर्गातून अवतरलेली गंगा ही तर पौराणिकदृष्ट्या अधिकच महत्त्वाची आहे. कुंभपर्व ज्या ठिकाणी साजरे होते त्यापैकी प्रयाग, हरिद्वार ही दोन ठिकाणे गंगेच्या काठावरचीच आहेत आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर जिच्या काठावर आहे ती गोदावरीसुद्धा दक्षिण गंगा म्हणूनच प्रसिद्ध आहे, नव्हे ती गंगाच आहे. याबाबतची पौराणिक



कथा मजेशीर आहे. ब्रम्हागिरी पर्वताच्या परिसरात गौतम ऋषींचा आश्रम होता. एकदा दक्षिण देशात (म्हणजे गंगेच्या दक्षिणेकडील भागात) दुष्काळ पडला. तेव्हा सर्व लोक गौतम ऋषींच्या आश्रयाला गेले. कारण त्यांची भातशेती उत्तम होती आणि त्यांच्या प्रदेशात दुष्काळ नव्हता. थोडक्यात गौतम ऋषी हे पाण्याचे नियोजन करणारे एक हुशार शेतकरी होते. याच वेळी कैलासावर पार्वतीच्या मनात गंगेविषयी मत्सर उत्पन्न झाला. गंगेचे शिवाच्या सहवासात असणे तिला सहन होत नव्हते. म्हणून तिची दासी जया आणि गणपती यांनी मिळून एक युक्ती केली. गणपती गणेशपंडित असे रूप घेऊन गौतम ऋषींच्या आश्रमात निवास करू लागला. जया एका गाईचे रूप घेऊन आश्रमात गेली आणि शेत खाऊ लागली. गौतमाने जेव्हा तिला हाकलवायचा प्रयत्न केला तेव्हा ठरवल्याप्रमाणे ती तत्काळ गतप्राण झाली. त्यामुळे गौतमाला गोहत्येचे पातक लागले. या पापातून मुक्त होण्यासाठी गंगा पृथ्वीवर आणावी असा सल्ला गणेशपंडिताने दिला.

गौतमाने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले आणि गुरू सिंह राशीत गेला असताना माघ शुद्ध दशमीस गंगा ब्रह्मगिरी पर्वतावर अवतरली. तिचा प्रवाह गाईवरून गेला आणि गाय जिवंत झाली.

अजाणतेपणी हातून घडलेल्या पापातून गौतम मुक्त झाला. ही गंगा म्हणजेच गौतमी गंगा किंवा गोदावरी होय. म्हणून गुरू सिंह राशीत गेला असतानाच गोदावरी तीरी कुंभपर्व साजरे होते.

***तीर्थनि नद्यश्च तथा समुद्राए क्षेत्राण्यरण्यनि तथाश्रामाश्च***
***वसन्ति सर्वाणि च वर्षमेकं गोदातटे सिंहगते सुरेज्ये***

कुंभपर्वात नदीस्नान केल्याने पापक्षालन होते अशी श्रद्धा आहे. त्यामागे गौतमाच्या पापक्षालनाचा संदर्भ आहे. नदी सगळी पाप धुऊन काढते या श्रद्धेच्या मुळाशी नदीविषयीची आदराची भावना आहे. आपल्याकडे नदी ही माय असते. ती लेकराचे सगळे अपराध पोटात घालते. त्यामुळे तिच्याबद्दल अपरंपार प्रेम आणि आदर लोकांच्या मनात असतो. नदीकाठी साजरा होणारा हा उत्सव नदीविषयीच्या भक्तिभावाचेच प्रतीक असतो.नदीबद्दलची ही आदराची भावना ऋग्वेदातील विश्वामित्र नदी संवादातदेखील दिसते. अशा प्रकारे एकीकडे अधिभौतिक स्तरावर मोक्षाची कामना आणि भौतिक स्तरावर नदीविषयीचा आदर व्यक्त करणे हा कुंभपर्वामागील कार्यकारणभाव आहे.

### वर्तमान औचित्य

उत्सव म्हटला की, त्याचे विस्तृत आणि शास्त्रोक्त असे एक कर्मकांड आलेच. त्यात शिरणे हा या लेखाचा हेतू नाही. या उत्सवाचे वर्तमान औचित्य काय याचा विचार केला तर सर्वप्रथम समोर येते ते त्यामागील अर्थशास्त्र. शासकीय स्तरावर कुंभपर्वाच्या आयोजनासाठी म्हणून कोट्यवधी खर्च केला जातो. हा खर्च मुख्यत: पायाभूत सुविधा निर्मितीसाठी होत आहे. इतक्या मोठ्या संख्येने लोक जमणार म्हटल्यावर नव्याने पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे आवश्यक ठरते. जसे एशियाड किंवा ऑलिम्पिकनिमित्त संबंधित प्रदेशाचा कायापालट होऊन जातो आणि दीर्घकालीन उपयुक्त ठरतील अशा पायाभूत सुविधा निर्माण होतात, तसेच कुंभमेळ्याबाबत होत आहे. त्या दृष्टीने हा कुंभमेळा नाशिक आणि आसपासच्या प्रदेशासाठी उपकारक आहे. मेळ्याच्या कालावधीत होणारी आर्थिक उलाढाल प्रचंड असते. कुंभमेळ्यातील कल्पवासाद्वारे ज्ञानयज्ञ होणे अपेक्षित असते. त्यात सर्व भौतिक सुखांपासून काही काळ दूर राहून अंतरात्म्याशी संवाद साधणे अपेक्षित आहे. कुंभमेळ्यात स्नानासाठी जातिभेद नाही. त्यामागे आईला आपली सगळी लेकरे सारखी हा भाव आहे.

(लेखक हे के. जे. सोमय्या महाविद्यालयात
संस्कृत विषयाचे प्राध्यापक आहेत.)
**संपर्क :** ०९०२९१५०००१



# तपोभूमी नाशिक

**महाराष्ट्राच्या पश्चिम भागात वसलेले नाशिक शहर ऐतिहासिक आहे. विविध कालखंडात धार्मिक क्षेत्र म्हणून नाशिकचे महत्त्व संपूर्ण भारतात मानले गेले आहे. नाशिक या नावाविषयी वेगवेगळ्या आख्यायिका आहेत. हिंदू धर्मग्रंथानुसार नाशिकचे नाव पद्मनगर म्हणजे कामकाजाचे नगर असे होते. कृतयुगात या ठिकाणी ब्रह्मदेवाने पद्मासन घालून तपश्चर्या केली, असे मानले जाते. त्यावरून हे ठिकाण पद्मनगर असेही ओळखले गेले. त्रेता युगात खर, दूषण व त्रिशिर या महाबलाढ्य राक्षसांनी जनतेला त्रास देण्यास सुरुवात केली. ऋषीमुनींच्या यज्ञकार्यात व्यत्यय आणला यावरून हा परिसर त्रिकंटक म्हणून ओळखला गेला. त्रेतायुगात प्रभू रामचंद्राच्या वास्तव्याच्या काळात हा परिसर जनस्थान म्हणून ओळखला जात होता. हे नगर गोदावरी नदीकाठी नवशिखरावर म्हणजे नऊ टेकड्यांवर वसले गेले यावरून या ठिकाणाला नाशिका नाव पडले. आजतागायत हेच नाव रूढ झाले आहे.**

डॉ. सरल धारणकर

गोदावरी नदीकाठी प्रागैतिहासिक काळात वस्ती होती हे सापडलेल्या अवशेषावरून दिसून येते. १९५० मध्ये नाशिक मधील उत्खननात कुंभारवाडा नवी गढी (गाडगेबुवा धर्मशाळेची पूर्व बाजू) या ठिकाणी प्रागैतिहासिक काळातील बरेचसे अवशेष सापडले त्यावरून मानवाच्या विकासाची स्थित्यंतरे दिसून येतात. वसाहतीला अनुकूल परिस्थिती असल्यामुळे येथील वस्ती वाढत गेली.

इसवीसनपूर्व १२५ ते १०० या काळातील नाशिकचा उल्लेख पांडवलेण्यातील लेणे क्रमांक १८ व १९ मध्ये सापडतो त्यात लेणे क्रमांक १९ मध्ये सातवाहन राजा कृष्ण श्रमण महामात्याने नाशिकची लेणी कोरली यावरून इसवीसनपूर्व १२५ ते १०० या काळात नाशिक एक राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठिकाण होते, असा निष्कर्ष निघतो. मौर्यकाळापासून बौद्ध धर्माच्या प्रसाराकरिता आलेल्या भिक्षूंसाठी महाराष्ट्रात जी लेणी कोरली गेली, त्यापैकीच ही नाशिकमधील पांडव लेणी आहेत.

इसवीसनाच्या ११ व्या आणि १२ व्या शतकामध्ये जैन धर्माचा मोठा प्रभाव होता हे चामर लेण्यांवरून दिसून येते. १४ व्या शतकाच्या सुरुवातीला जैनमुनी व लेखक जीन प्रभासुरी यांनी नाशिकचे वर्णन एक 'तीर्थक्षेत्र' अशा शब्दात केलेले आहे.

नाशिक परिसरातील उत्खननात तांबड्या झिलईची रोमन बनावटीची मृत्तिकापात्रे व रोमन पद्धतीचे काचेचे १६० मणी मिळाले. यावरून नाशिकचा व्यापारी संबंध केवळ भारतातील नगराशीच नव्हता तर भारतबाहेरील देशांबरोबर होता, हे दिसून येते. मध्ययुगात १३१३ पासून १३४७ पर्यंत यादवांच्या वर्चस्वानंतर मलिक काफूरच्या वर्चस्वाखाली



नाशिक होते त्यानंतर १४८७ पर्यंत बहामनी राजाचा ताबा नाशिकवर होता. १४८७ ते १६३७ या काळात अहमदनगरच्या निजामाच्या वर्चस्वाखाली नाशिक होते. १६३७ मध्ये ही निजामशाही संपुष्टात आल्यानंतर नाशिक मोगल साम्राज्यात समाविष्ट झाले.

### मराठ्यांच्या अमलाखालील नाशिक

मोगल अमलाखाली नाशिक आल्यानंतर मुस्लिमांची वस्ती प्रामुख्याने जुनी गढी, दिल्ली दरवाजा, काझीपुरा, जामा मशीद या भागातच होती. काही मशिदी या काळात बांधल्या गेल्या.

१६८४ ते १७१३ या कालखंडात नाशिकवर ताबा मिळविण्यासाठी मोगल व मराठे यांच्यात वारंवार चकमकी होत होत्या. पहिले बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दीत नाशिकमध्ये पेशव्यांचे महत्त्व वाढत गेले. मोगल काळात नाशिकचे नाव 'गुलशनाबाद' गुलाबांचे शहर असे ठेवले होते. हे नाव पेशवाईत बदलून पुन्हा 'नाशिक' हेच नाव रूढ झाले.

### नाशिकमधील बांधकामे

मराठाकाळात मराठे सरदार नाशिकमध्ये राहण्यास आले. त्यांनी त्यांच्या सोयीसाठी येथे वाडे बांधले या वाड्यांमध्ये खडकाळी येथे नारोशंकर यांचा वाडा होता. ही इमारत नाशिकमधली सर्वात मोठी जुनी इमारत होती. त्याचबरोबर 'पुलावरचा वाडा' होता हा वाडा नंतरच्या काळात 'सरकारवाडा' म्हणून ओळखला गेला. या काळात नदीकाठावरील जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला, काही नवीन मंदिरे बांधली गेली.



पांडवलेणी



या काळातील नाशिकमधील मंदिरांची संख्या ६० होती. १७९० मध्ये गणपतराव दीक्षित पटवर्धन यांनी भद्रकाली मंदिर बांधले, रामकुंडाचे बांधकाम १६९६ मध्ये साताराचे चित्राव यांनी केले, तर खंडोबाचे कुंड १७६१–१७७२ मध्ये सरदार व्यंकटराव पेठे यांनी बांधले, अहिल्याबाई होळकर यांनी १७९५ मध्ये 'अहिल्याबाई कुंड' बांधले याच काळात नाशिकच्या पश्चिमेकडे रघुनाथराव व त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी चावडस येथे वाडा बांधला. आज हे ठिकाण 'आनंदवल्ली' या नाव्याने ओळखले जाते. या काळात बाहेरून येणाऱ्या यात्रेकरूंसाठी धर्मशाळा बांधल्या गेल्या. पेशवेकालीन नाशिकचे वैभव त्या स्थापत्यातून दिसते.

### संस्कृती तीर्थस्थानाचा आधुनिक काळ

नाशिक हे धर्मस्थळ असल्यामुळे अनेक लोक येथे धार्मिक विधी करण्यासाठी येत. या कारणाने अनेक लोक येथे स्थायिक होत गेले. त्याचबरोबर भाविकांच्या गरजा पूर्ण करणारे निरनिराळे व्यवसाय वाढीस लागले. आसपासच्या गावाशी दळणवळण वाढत गेले, तशी वाहनांच्या संख्येत वाढ झाली. शिक्षणप्रसार, त्यासाठी समाजसुधारकांचे प्रयत्न, पाश्चात्त्य संस्कृतीशी आलेला संबंध यातून समाजाच्या हिताच्या दृष्टीने विचार वाढीस लागला. अनेक सामाजिक संस्था उदयाला आल्या. जातिभेदविरोधी प्रयत्न होत होते. त्यादृष्टीने १९३० पासून काळाराम मंदिर प्रवेश चळवळ सुरू झाली. मंदिर प्रवेशाने दलितांचे सर्व प्रश्न सुटतील असे नाही परंतु आपल्या प्रश्नांचे स्वरूप व्यापक आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मंदिर प्रवेशासंबंधीचे मत होते.

नाशिकमधील ट्राममाडी ही या नगराचे वैशिष्ट्य ठरले होते. १८९१ मध्ये नाशिक रेल्वे स्टेशनपासून घोड्याने ओढणारी, रुळावरून धावणारी गाडी होती. नंतर त्याला बाष्पयंत्राची जोड देण्यात आली होती. या यंत्रामुळे नाशिकची मंत्रभूमीतून यंत्रांकडे, तंत्रभूमीकडे वाटचाल सुरू झाली. नाशिकमधील एक आकर्षण ठरलेले स्मारक म्हणजे दादासाहेब फाळके स्मारक होय. स्वातंत्र्यपूर्व काळात नाशिक हेच चित्रपट निर्मितीचे महत्त्वाचे केंद्र होते. दादासाहेब फाळके यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून (१९७०) भारत सरकारतर्फे चित्रसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल ज्येष्ठ कलावंताला व तंत्रज्ञानाला दादासाहेब फाळके हा पुरस्कार दिला जातो.

### देशभक्तीची परंपरा

नाशिकच्या देशभक्तीची परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रकर्षाने जाणवते. या काळात मोठी साहित्यनिर्मिती होत गेली. मित्रमेळ्याच्या कार्यात व प्रकाशनात स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर व कवी गोविंद यांचे साहित्य महत्त्वाचे ठरते. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर नाशिक भूषण म्हणून ओळखले गेले. ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेल्या या थोर कवींच्या स्मरणार्थ नाशिक शहरात स्मारक उभारलेले आहे. येथील यात्रा उत्सवात सहभागी होताना येथील शिल्प, स्थापत्य याकडेही विशेष लक्ष वेधले जाते. ऐतिहासिक नाशिकचा मागोवा घेताना त्याची महती आपल्याला जाणवते, तशीच परदेशी पाहुण्यांनाही ती आकर्षित करणारी आहे, याचा अनुभव 'सिंहस्थ' काळात अनेकांनी घेतला आहे, तो आता २०१५ च्या सिंहस्थामध्येही घेता येईल.

(लेखिका या इतिहासकार आहेत.)
**संपर्क :** ०९९७००५४१५६

पांडवलेणी



# ।। त्र्यंबक गौतमी तटे ।।

कमलाकर अकोलकर

गौतम ऋषींनी आपल्या तपस्येने शंकराच्या जटेतील गंगेला भूतलावर येण्यास भाग पाडले. गोहत्येचे पातक नष्ट होण्यासाठी त्यांनी हा सारा खटाटोप केल्याचे धार्मिक संदर्भ आहेत.

गौतमऋषींच्या कालावधीत त्र्यंबकेश्वरचा भूभाग सर्वदृष्ट्या प्रगत होता. अनेक वर्ष दुष्काळ पडल्यामुळे या भागाची दुर्दशा गौतम ऋषींना पाहवली नसल्याने त्यांनी ही गंगा तपश्चर्येने पृथ्वीवर आणली म्हणून ही नदी गौतमी गंगा म्हणून प्रसिद्ध पावली. आपापसातल्या वर्चस्वाच्या लढाईत गौतमांना प्रायश्चित घ्यावे लागल्याची ही एक कथा आहे. शंकराच्या जटेत असणारी गंगा पृथ्वीतलावर येण्यास उत्सुक नव्हती. गंगेला पृथ्वीतलावर येण्यास भाग पाडले गेले. शंकराने जटा आपटल्याने ती ब्रह्मगिरी पर्वतावर औंदुबर वृक्षाच्या मुळाशी पडली. तेथून गुप्त होऊन शेजारी गंगाद्वार येथे प्रगटली. गोहत्येचे पातक नष्ट होण्यासाठी गौतमांना स्नान करणे आवश्यक असल्याने शोध सुरूच होता. ती पर्वत पायथ्याशी दिसल्यावर गौतम ऋषींनी दर्भाचे आवरण केले ते कुशावर्त तीर्थ होय. कुश म्हणजे दर्भ. कुशावर्तात गोदावरीस अडवून स्नान केले. स्नान करत असताना त्यांनी प्रथम प्रार्थना केली.

***नमामि गंगे तव पाद् पंकजम् ।***
***सुरासुरे वंदिती दिव्य रुपम्।।***

सुर व असूर असे सगळेच तुझ्या सेवेत असून तू भवताचे त्रास दूर करणारी वत्सल माता असून

***पापोहं पाप कर्माह पापात्मा,***
***पापसंभवा माही मां कृपयात ।***

गोदे सर्व पाप रोग, दु:खाचे हरण कर अशी प्रार्थना केली. ती प्रार्थना आजही केली जाते. गौतम ऋषींचे गोहत्येचे पातक स्नानाने नाहीसे झाले असले तरी या गोदावरीमुळे दीडहजार किमी चा परिसर सुजलाम् सुफलाम् झाला. या भागाची तहान भागविण्याचे काम गोदावरीमूळेच झाले. नदीची ब्रह्मगिरी येथे उत्पत्ती, नांदेड नाभीस्थान व राजमहेंद्री येथे ती बंगालच्या उपसागरात विलीन होते.

गोदावरी ज्या भागातून गेली त्या त्या भागात विद्येची केंद्रे होती. हा सगळा भाग सुबत्तेचा होण्यास कारणीभूत गोदावरीचे सर्वच ऋण मानतात. आंध्रापर्यंतचे भाविक गोदावरी प्रदक्षिणेसाठी येतात शंकराच्या जटेतून नाइलाजाने पृथ्वीवर आल्यावर गोदावरीने शंकराकडे वर मागितला तुम्ही माझ्यासमवेत येथे राहाल त्यानुरूप प्रत्यक्ष शंकर येथे राहिले व शंकराच्या निवासामुळे ब्रह्मा, विष्णू यांनीही त्यांच्यासमवेत रहाण्याचे निश्चित केल्याने त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग म्हणूनही शंकराला ओळखले जाते.

तिन्ही देवतांचा निवास, गोदावरी पापहरिणी यामुळे भक्तांच्या सर्व



बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबके

मनोकामना पूर्व करण्याच्या शक्ती या केंद्री असल्याने जगातून भाविक येथे मोठ्या संख्येने येतात. निसर्ग सान्निध्यामुळे हा भूभाग मनाला आल्हाद देणारा असा आहे. भाविक स्नान व पूजेसाठी कायम त्र्यंबकेश्वरी येण्याचे पुरातन दाखले आहेत.

गोदावरीच्या तटावर सर्वत्र ऋषिमुनींचे आश्रम व वेदविद्येसह इतरही विद्या देण्याच्या सुविधा त्या वेळी उपलब्ध होत्या. परिसरात विविध श्वापदांसह वन्य जातींच्या औषधी वृक्षवेलींची कमतरता नव्हती.

ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वराच्या निवासामुळे प्रख्यात झाले. यादव राजांच्या कालावधीत येथे भरभराटीचा काळ असल्याचे दाखले आहेत.

**मंदिराचा जीर्णोद्धार**

पेशव्यांच्या कालावधीत मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला व या

मंदिराची व देवाची सदैव पूजाअर्चा चालू राहावी याची तजवीज पेशव्यांनी करून ठेवली. त्र्यंबकेश्वर ही देवता काही भाविकांची कुलदेवता असून त्यांनी काही जमिनी त्र्यंबकेश्वरास दान दिल्या आहेत.



केश्वर येथील प्रसिद्ध शिवमंदिर

गोदावरी (गंगेची) पूजा व त्र्यंबकेश्वरास अभिषेक, लघुरुद्र, महारुद्र, महामृत्युंजय जप इ. पूजा दशपुत्रे, शुक्ल व तेलंग घराण्यांकडे चालत आली असून ती सेवास्वरूपात केली जाते. त्र्यंबकेश्वर मंदिरालगत हेमाडपंथी गायत्री मंदिर असून त्रिकालसंध्या क्षेत्र म्हणून या क्षेत्रास मान्यता आहे.

त्र्यंबकेश्वर हा आदिनाथ असून त्यांनी नवनाथांना घडविले म्हणूनही या शंकरास अनन्यसाधारण महत्त्व आहे. तांत्रिक शाबरी विद्यानाथांना येथेच मिळाली. गहिनिनाथांनी निवृत्तिनाथांना अनुग्रह दिला, त्यांनी ज्ञानेश्वर घडविला, ही तीच भूमी होय. श्रीदत्त चक्रधर स्वामी नवनाथ इ. सह देवता व ऋषीमुनींच्या तप साधनेसाठीच ही भूमी प्रसिद्ध आहे. येथे निलांबिका म्हणजे स्वयंभू पार्वतीमातेचे मंदिर, संत निवृत्तिनाथ समाधी मंदिर, गोरक्ष मठ (नाथ अखाडा) यांच्यासह साधूचे दहा आखाडे, नवदुर्गा मंदिरे आहेत. कुशावर्तालगत गोदावरी मंदिर, इंद्रालेश्वर मंदिरासह इतरही देवतांच्या मंदिरांची श्रृंखला आहे.

### हनुमान जन्मस्थान

लगतच अंजनेरी मंदिर व पर्वत आहे. या ठिकाणी तपस्वी राहत. हनुमान जन्मस्थान म्हणून हे स्थान प्रसिद्ध आहे. देव व दानव यांच्या युद्धात व समुद्रमंथनातून जो अमृतकलश मिळाला त्या अमृताचे काही थेंब त्र्यंबकेश्वरक्षेत्री सांडल्याच्या आख्यायिका असून दर बारा वर्षांनी या क्षेत्री कुंभमेळा संपन्न होतो.

दशनामी संन्याशी या कालावधीत शाही स्नानासाठी येतात त्या कालावधीत लाखो भाविक हा सोहळा पाहण्यासाठी व देवदर्शनासाठी उपस्थित राहतात. यासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार विविध सुविधा उपलब्ध करून देतात. दर बारा वर्षांनी कुंभमेळा गोदावरीच्या मूळस्थानी भरत असल्याचे लेखी संदर्भ असून सन १६९० मध्ये शैव-वैष्णव यांच्यात स्नानावरून तंटे झाल्याने व अनेक जण मारले गेल्याने शैव-त्र्यंबकेश्वर येथे आणि वैष्णव नासिक येथे स्नान करतील असा पेशव्यांचा निवाडा आहे. ब्रिटिशांनी १८७२ मध्ये नागासाधूंच्या स्नानावर बंदी घातली. १९३२ मध्ये अर्जविनंत्यांवरून पुन्हा त्यांच्या स्नानास परवानगी देण्यात आली.

**त्र्यंबकेश्वर मंदिर धार्मिक व पौराणिक महत्त्वाचे केंद्र असून इतिहासात याच्या नोंदी विशेषत्वाने आहेत. इतिहास काळात ब्रह्मगिरी अभेद्य किल्ला होता. समुद्र सपाटीपासून त्याची उंची ४ हजार २५० फूट आहे. देवगिरीचा राजा यादव याच्या कालावधीत हा भाग भरभराटीचा होता. अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणात येथे मोठी नासधूस झाली. शहाजहानने १६२९ मध्ये आठ हजार सैन्य त्र्यंबक जिंकण्यासाठी पाठविले होते. १६३३ पर्यंत निजामांच्या ताब्यात हा भाग होता. १६८० पर्यंत त्र्यंबकेश्वर संगमनेरचा उपभाग होता. १७३० मध्ये कोळी राजांनी जम बसविला व १७६२ मध्ये पेशव्यांच्या आधिपत्याखाली हा प्रदेश आला त्या कालावधीत या परिसराची भरभराट झाली. सलग ३१ वर्षे खर्चून त्र्यंबकेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार पेशव्यांनी केला.**

(लेखक हे दै. सकाळचे त्र्यंबकेश्वर येथील प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९४२२२७११६५

# महापर्वातील शाही स्नान



विशिष्ट ग्रह-मुहूर्त-योग यांच्या एकत्र येण्यातून येथे कुंभमेळे भरतात. वैदिक संस्कृतीतील ऋग्वेद, अथर्ववेद, पुराणे यात तीर्थांची महती कथन केली आहे. या तीर्थांची स्थाने पर्वतशिखरांवर वा त्यांच्या पायथ्यांशी आणि प्रवाही नद्या आणि त्यांच्या संगमावर आहेत. जल हे अत्यंत पवित्र, देवतास्वरूप, जीवन देणारे असे पंचमहाभूतातील प्रमुख तत्त्व आहे. त्यातूनच सृष्टीची निर्मिती झाली आहे. या तत्त्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ऋग्वेदात एक प्रार्थना येते : ज्या उदकधारा आकाशातून पाझरतात, भूमीतून प्रकटतात, ज्या स्वत: स्वच्छ राहून इतरांना पवित्र करतात आणि शेवटी सागराला मिळतात अशी जलदेवता माझे रक्षण करो. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, सिंधू आणि कावेरी या माझ्यात निवास करोत, अशी प्रार्थना करण्याची प्रथा आहे.

संपूर्ण विश्व स्थल (Space) आणि कालाने (Time) बांधलेले आहे, असे आजचे पदार्थविज्ञान सांगते. धर्म आणि अध्यात्मशास्त्र त्याचेच प्रतिपादन करतात. सूर्य आणि चंद्र यांच्या कला व गतींवर मानवी जीवनाचा व्यवहार चालतो. भारतीय संस्कृतीने हाच विचार पंचांगाद्वारे केला आहे. प्रत्येक दिवस, वार, नक्षत्र, योग आणि करण यांचा मानवी जीवनावर प्रभाव पडत असतो. दर बारा वर्षांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर- नाशिक क्षेत्री सूर्य, चंद्र, गुरू आणि सिंह रास यांची युती वा संयोग होऊन गोदावरीचे जल निर्मळ होते, अशी मान्यता आहे.

**वैदिक संस्कृतीने नेहमीच सर्वांना सामावून घेणारा, व्यापक विचार केला आहे. कुठल्याही धर्माची सैद्धांतिक बैठक स्थिर असते. मात्र आचारमार्गात देश, काल आणि परिस्थितीनुसार बदल होत असतात. समाजधारणेची क्षमता असलेले आचार जेव्हा क्षीण होऊ लागतात तेव्हा ती क्षमता पुन्हा निर्माण करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करण्यासाठी वैदिक काळापासून, समाजातील श्रेष्ठ विचारपुरुष तीर्थक्षेत्री एकत्र येत असत, आजही येतात. आपल्या देशातील प्रयाग, हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन ही चार तीर्थक्षेत्रे अशा विचारमंथनाची क्षेत्रे आहेत.**

अरुण खोंडे

### अमृतसिंचन

पौराणिक कथेनुसार याच काळात गोदावरीत अमृतसिंचन झाले. गंगा-गोदावरी अवतरणाच्या वेळी तिने शिव आणि ब्रम्हदेवाला केलेल्या प्रार्थनेचा सन्मान करीत ब्रह्मा, विष्णू आणि महेश या स्वर्गदेवता, इंद्र-वरुण-अग्नी इत्यादी देवगण, विष्णूचे दहा अवतार, सप्तऋषींसह सर्व ऋषी, पितृलोकातील सर्व देवता, सर्व पवित्र नद्या, सप्तसागर, आकाशस्थ ग्रह, सर्व पौराणिक देवता गोदावरी नदीत १३ महिने वास्तव्य करतात अशी श्रद्धा आहे. असे पवित्र जल आपल्यालाही पावन करो, अशी प्रार्थना करीत भरतखंडातील सिद्ध, महात्मे, आचार्य, महंत, साधू आणि त्यांचे सर्व भक्त नाशिकला गोदेकाठी जमतात. येथील भूमीच्या अदभुत प्रभावाने, पवित्र जलाने, तेजाच्या प्रभावाने, संत-महात्म्यांच्या तप-साधनेने या क्षणी जनसामान्य एकत्र येतो. मग उपासना आणि सत्संग घडतो, त्यातून सद्विचारांचे चिंतन होते, त्याचे रूपांतर सदाचारात होते आणि सर्वांचा परिणाम म्हणून जीवन शुद्ध होते.

आपल्या संकल्पनांच्या पूर्ततेसाठी साधू-महंत एकांतात निवास करतात. मात्र आपले एकांतातील चिंतन जनसामान्यांना वितरित करण्यासाठी ते चारही कुंभक्षेत्री एकत्र येतात. या क्षेत्री अनुष्ठान, उपासना, अन्नदान, विचारयज्ञ होतातच मात्र आकाशीय आणि आध्यात्मिक ऊर्जेचा निवास असलेल्या महापर्व स्नानाला (आखाडा परंपरेत यालाच शाही स्नान म्हणतात) अनन्यमहत्त्व आहे. आपल्या जीवनातही नदीचे प्रवाहित्व यावे, लवचीकता यावी, समता प्रस्थापित होऊन शुद्धीचे सामर्थ्य यावे, चांगले-वाईट असे सारे सामावून घेण्याची आणि तरीही तटस्थ राहण्याची वृत्ती यावी यासाठी केलेली ही सामुदायिक तपश्चर्या आहे.

### शाही स्नान

कुंभमेळ्यातील या महापर्व स्नानांना शाही स्नान का म्हणतात याचा उलगडा होण्यासाठी थोडे इतिहासात डोकवावे लागेल. देशातील प्रजा आणि विरक्त झालेले साधू यांना राजाचे (शासनाचे) संरक्षण असेल तेव्हाच प्रजेच्या विकासाची आणि शांतीची शक्यता असते. हे कार्य करण्यास शासन कमी पडत असेल तेव्हा आपल्या धर्मप्रजेचे रक्षण

करण्यासाठी साधुमहंतांना आपले शास्त्रचिंतन बाजूला ठेवून शस्त्रे हाती घ्यावी लागली. अकराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत अनेक परकीय आक्रमणे झाली. या आक्रमणात केवळ भौतिक संपत्ती लुटली



गेली नाही तर भारतातील मंदिरे, मठ आणि आश्रमांवर हल्ले झाले. संस्कृतीवरील हे हल्ले परतवून लावून धर्माची घडी पुन्हा बसवण्याचे कार्य या साधूंनी केले.

### मिरवणूक आणि आखाडे

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरला पहाटे ३ ते ३:३० ला शाही मिरवणुका निघतात. पहिल्या मिरवणुकीत श्रीशंभु पंचदशनाम जुना आखाडा (भैरव आखाडा), श्रीशंभु पंचदशनाम आवाहन आखाडा आणि श्री पंच अग्नी आखाडा यांचा समावेश असतो. मिरवणुकीच्या अग्रभागी नगारा वाजविणारे नागा साधू, निशाण, धर्मध्वज असतात. धर्मरक्षणासाठी वापरलेली शस्त्रे आणि रणवाद्ये घेऊन आजही नागा साधू त्यात असतात. त्यांच्या मागे चांदीच्या स्वतंत्र पालख्यांमध्ये तीनही आखाड्यांच्या देवता अनुक्रमे भगवान श्री दत्तात्रेय, भगवान सिध्द गणेश आणि भगवती गायत्रीची प्रतिमा ठेवलेली असते. त्याबरोबर १२ फुटापर्यंत उंची असलेला भाला (यालाच निशाण देवता म्हणतात) असतो. एक साधू तो भाला खांद्यावर घेऊन वाटचाल करीत असतो.

### जुना आखाडा

जुना आखाड्याच्या भाल्याचे नाव 'भैरव प्रकाश' तर आवाहन आखाड्याच्या भाला निशाणाला 'अरुण प्रकाश' संबोधले जाते. या पालखीमागे आखाड्यांचे आचार्य महामंडलेश्वर, मंडलेश्वर, श्रीमहंत, महंत, साधू आणि भक्त वाटचाल करीत असतात. निशाण देवतांच्या पादुकास्थानी आखाड्याचे नियुक्त पुरोहित रुद्रांचा मंत्राभिषेक करीत असतात. दुसऱ्या मिरवणुकीत श्री पंच शंभु दशनाम आनंद आखाड्यांचा समावेश असतो. यांच्या मिरवणुकीत त्यांच्या इष्टदेवता अनुक्रमे भगवान कार्तिकस्वामी आणि भगवान सूर्यनारायणाची मूर्ती असते. निरंजनीची निशाण देवता सूर्यप्रकाश आणि चंद्रप्रकाश आहे. नागा साधू आपल्या खांद्यावर त्यांना धारण करतात.

### श्री पंचायती आखाडा

त्र्यंबकेश्वरच्या तिसऱ्या मिरवणुकीत श्री पंचायती आखाडा महानिर्वाणी आणि श्री शंभु दशनाम अटल आखाड्यांचा समावेश असतो. त्यांच्या इष्टदेवता अनुक्रमे भगवान कपिल महामुनी आणि आदी गणेशाची मूर्ती सजवलेल्या पालखीत विराजमान असते. त्यापाठोपाठ आखाडा परंपरेतील सर्वोच्च पद धारण करणारे आचार्य महामंडलेश्वर आणि श्री महंत, नागा साधू वाटचाल करीत असतात. श्रीपंचायती आखाडा बडा उदासीन, श्री पंचायती उदासीन नया आखाडा आणि श्री पंचायती निर्मल आखाडा यांच्या क्रमबद्ध मिरवणुकीने शाही कुशावर्त क्षेत्री पोहोचतात. या आखाडा मिरवणुकीत अनुक्रमे श्री चंद्र भगवान, विष्णू आणि गुरू ग्रंथसाहेब यांच्या पालख्या असतात.

### शाही स्नानाचे विधीविधान

कुशावर्त क्षेत्री आल्यानंतर शाही स्नानाचे विधिविधान शेकडो वर्षांपासून निश्चित करण्यात आले आहे. इष्टदेवतेची पूजा कुशावर्ताच्या कोणत्या काठावर करावी, आखाड्यांच्या साधूंनी कोठे उभे रहावे, स्नानासाठी वेळ हे सारे निश्चित आहे. प्रत्येक कुंभमेळ्यात आखाड्यांच्या 'रमता पंच' यांनी नियुक्त केलेल्या महात्म्यांनाच इष्ट देव पूजेचा अधिकार असतो. निशाण देवता आणि इष्ट देवतेची काठावर स्थापना केल्यानंतर पुरोहितांच्या मंत्रोच्चारात षोडषोपचार पूजा केली जाते. नियुक्त महात्मे देवतांना घेऊन तीर्थात प्रवेश करतात.

देवतेचे स्नान झाले की उर्वरित पूजा होऊन 'नम: पार्वतीपते हर हर महादेव'चा घोष होतो आणि तीर्थभेटीला व्याकूळ झालेले साधू-महंत तीर्थस्नान करतात. देवतेची पूजा संपन्न होईपर्यंत कोणीही कुशावर्तात प्रवेश करायचा नाही असा संकेत आहे. मिरवणुकीत ज्या क्रमाने आखाडे येतात, त्याच क्रमाने पर्वस्नान आटोपून ज्योतिर्लिंग श्री त्र्यंबकराजाच्या दर्शनाला मार्गस्थ होतात. प्रत्येक आखाड्यांच्या देवतेला ज्योतीर्लिंगासमीप घेऊन जातात तर निशाण देवतेचा अग्रभाग त्र्यंबकराजाच्या स्पर्शाने ऊर्जायमान केला जातो. साधारणपणे दुपारी ११ ते १२ पर्यंत ही पर्वस्नाने संपन्न झाल्यानंतर कुशावर्त भाविकांसाठी खुले केले जाते. श्रीक्षेत्र नाशिकला तपोवनातून शाही मिरवणुका निघतात. वैष्णव साधु आणि त्यांच्या परमहंस जगद्‌गुरूंची संख्या मोठी असल्याने आणि नाशिकचे एकूणच आयोजन भव्य-दिव्य असल्याने येथील शाही मिरवणूक व पर्व स्नानाचा आनंद वेगळाच असतो.

(लेखक हे मुक्त पत्रकार आहेत.)
**संपर्क :** ०९९२१८९१२३४

# आखाडे आणि खालसे



कुंभमेळा ही सहस्रवर्षांपासून चालत आलेली परंपरा असल्याचे उल्लेखही इतिहासात आढळतात. ज्ञानेश्वरी व तुकाराम महाराजांच्या गाथेतही सिंहस्थाचे उल्लेख आढळतात. इ.स. ५ व्या शतकात भारतावर परकीय आक्रमणे वाढली होती. ही आक्रमणे थोपविण्यासाठी नेहमी धार्मिक कार्यात मग्न असलेल्या साधुंना हातात शस्त्र घ्यावी लागली होती. या काळात धर्म वाचविण्यासाठी देशभरातील साधू एकत्र आले अन् आखाडे निर्माण झाले. आखाड्यांनी धर्माच्या संरक्षणाची जबाबदारी वाटून घेतली. सम्राट हर्षवर्धनच्या राज्यात प्रयाग येथे हिंदूंचा अशा प्रकारचा मेळा भरविला जात असल्याचा उल्लेख सापडतो. मात्र, हिंदूंच्या या धार्मिक उत्सवाला खऱ्या अर्थाने वैदिक रूप देऊन प्रतिष्ठा मिळवून देण्यात आदि शंकराचार्यांचे कार्य मोठे आहे. त्यांनी कुंभमेळ्यात विविध साधुसंतांना व निरनिराळे धर्म आणि संप्रदाय यांच्या साधुसंतांना भाग घेण्यास प्रवृत्त केले. त्यांच्याच प्रेरणेने प्रयाग येथील कुंभमेळ्यात भारतातील निरनिराळे धर्म आणि संप्रदायांतील साधुसंतांनी भाग घेण्यास प्रारंभ केला. दर चार वर्षांनी कुंभमेळ्याच्यानिमित्ताने आखाडे विचारमंथनासाठी एकत्र येऊ लागले. यासाठी भारताच्या चार दिशांना त्यांनी चार मठ स्थापन केले. ज्योतिर्मठ, श्रृंगेरीमठ, गोवर्धनमठ, शारदामठ अशी या मठांची नावे आहेत. साधूंसाठीही त्यांनी दशनामी नियम तयार केले आणि त्यातून साधूंच्या दहा विभागांची निर्मिती झाली. सरस्वती, पुरी, बना, त्रिथा, गिरी, पार्वता, भारती, अरण्य, आश्रम व सागर असे हे साधूंचे दहा विभाग आहेत.

**पृथ्वीवरचा श्रद्धेचा सगळ्यात मोठा दृश्य सोहळा म्हणजे कुंभमेळा. बारा वर्षांतून एकदाच नाशिक आणि त्र्यंबकक्षेत्री भरणारा सिंहस्थ कुंभमेळा धार्मिक सोहळा राहिलेला नाही, तर तो आंतरराष्ट्रीय इव्हेन्ट झाला आहे. मात्र, कुंभमेळ्याची संस्कृती काही निराळीच आहे. संस्कृती नेहमी इतिहासाचा समृद्ध वारसा घेऊन वाटचाल करीत असते. विचारमंथनातून ती विकसित होत जाते. या मंथनात काळाशी अनुरूप ते स्वीकारले जाते अन् नको त्याचा त्याग केला जातो. कुंभमेळा संकल्पनाही अशा विचारातून अवतरली अन् रुजली.**

चिनी यात्री ह्युएनत्संग याने इ.स. ६२९ मधील भारतयात्रेचे वर्णन या पुस्तकात कुंभमेळ्याचे वर्णन केले आहे. नाशिकबाबत पुराणात अथवा प्राचीन काळापासून कुंभमेळा नेमका कोठे भरत होता याचे पुरावे मिळत नाहीत. १७७० नंतरच्या नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे पुरावे मिळतात. त्यापूर्वीच्या सिंहस्थाचे कोणतेच पुरावे नाहीत. त्यामुळे त्यापूर्वी नाशिक व त्र्यंबकेश्वरमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत होता का? हा प्रश्न आहे. प्राचीन काळापासून कपिलधारा व चक्रतीर्थावर सिंहस्थ कुंभमेळा भरत असावा, असाही एक विचारप्रवाह आहे. याचे काही पुरावेही मिळतात. १७४६ मध्ये सिंहस्थ काळात चक्रतीर्थावर स्नानावरून वाद



झाले. पण हे वाद नाशिकच्या रामकुंडावरील स्नानामुळे झाले की चक्रतीर्थावरील वादातून झाले याचा स्पष्ट उल्लेख पेशव्यानी दिलेल्या निकालातही नाही.

हे युद्ध झाले तेव्हा माधवराव पेशवे गादीवर होते. या आखाड्यांचे स्नानासाठी तंटे पेशव्यांनी सोडविले. त्यामुळे १७५८ पासून शैवपंथातील जुना, निरंजनी, आनंद अटल, आवाहन, अग्नि, महानिर्वाण, बडा उदासिन, नया उदासीन आणि निर्मल आखाड्याचे साधू-संत त्र्यंबकेश्वरी कुशावर्तावर, इतर वैष्णव संप्रदायातील महानिर्वाण आणि दिगंबर पंथातील साधुसंत नाशिकच्या रामकुंडावर शाही स्नान करू लागले. पेशव्यांनी साधूंची गर्दी लहानशा कपिलधारा व चक्रतीर्थावर होऊन पुन्हा वाद होऊ नये म्हणून त्यांची विभागाणी त्र्यंबक येथील कुशावर्त व नाशिकचे रामकुंडावर केली का? अथवा रामकुंडावर होणारा सिंहस्थ त्यांनी दोन भागात केला? याबाबत अधिक संशोधन होण्याची गरज आहे. मात्र यातून कपिलधारा व चक्रतीर्थाचे सिंहस्थ म्हणून असलेले महत्त्व कमी झालेले नाही. अजूनही सिंहस्थाचा प्राचीन इतिहास माहीत असलेले आखाडे व साधू पर्वण्यांसाठी या दोन्ही तीर्थांवर स्नानासाठी सिंहस्थादरम्यान येतात.

रमेश पडवळ
अनिल पवार

## साधूंच्या विचारमंथनाचे केंद्र

कुंभमेळ्यात साधू नेमके काय करतात अन् त्यांची कुंभमेळ्यात सहभागी होण्यामागची भूमिका काय असते, कोणत्या उद्देशाने जगभरातील साधू गोदाकाठावर जमतात, अशी अनेक कोडी पडतात. साधूंनी कुंभमेळा का सुरू केला ही संकल्पनाही गमतीशीर आहे. या संकल्पना समजून घेतल्यावर साधूंबद्दल मतपरिवर्तन व्हायला मदत होते. असे म्हटले जाते की,यातून कुंभमेळ्यांचे स्वरूप अधिक व्यापक होत गेले. प्रत्येक आखाड्यात तत्त्वज्ञान, संख्याशास्त्र, अध्यात्म, धर्म अशा शाखांचे गाढे अभ्यासक पूर्वी असायचे. संस्कृती, संस्कार, भक्ती, प्रार्थना, जगण्याच्या पद्धती अन् सेवावृत्तीवर कुंभमेळ्यात चर्चा, विचारविनिमय व अभ्यास करून धर्मकारण आणि समाजकारणाचे धोरण ठरविले जात असे. त्याकाळी एक विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले हे साधू क्रांतिकारकच होते. मात्र, खरे स्वरूप काही प्रकरणात उद्देशाअभावी हरवल्यासारखे वाटते. अनेक आखाडे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कामांच्या माध्यमातून समाजासाठी झटण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सिंहस्थातही गोदावरी प्रदूषणाचा प्रश्न, धार्मिक स्थळांची स्वच्छता व प्राचीन मंदिरांना वाचवण्यासाठी प्रयत्न होण्याच्या दृष्टीने व्यापक चर्चा अपेक्षित आहे. तरच सिंहस्थ कुंभमेळा मानवाच्या उत्क्रांतीचा नवा पैलू ठरेल.

## नाशिकच्या आखाड्यांची रचना

आखाडा म्हणजे साधूंची निवासाची आणि भोजनाची सोय. या आखाड्यांमध्ये महंत व साधूंचे म्हणून काही अधिकार असतात. आखाडे म्हणजे अखंड भावनेतून सनातन धर्माचा प्रचार आणि प्रसार करणारी संस्था. प्रत्येक आखाड्याकडे वेगवेगळी जबाबदारी देण्यात आलेली असते. जसे दिगंबर आखाड्याकडे शस्त्रधारी साधू असतात. तर अनेक इतर आखाड्यांकडे धर्मप्रसार, शिक्षण व प्रशिक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली. नाशिकमधील आखाडे हे वैष्णवपंथीय आहेत. पंचवटी व तपोवन परिसरात तीन वैष्णवपंथीय साधूंचे आखाडे आहेत. यात दिगंबर आखाडा, निर्वाणी आखाडा, निर्मोही आखाडा यांचा समावेश होतो. यातील दिगंबर आखाड्यांची बैठक नाशिकमध्ये आहे. तर निर्वाणी व निर्मोही या आखाड्याची बैठक काशी व हरिद्वार येथे आहे. नाशिक सिंहस्थात स्नानासाठी येणाऱ्या दिगंबर, निर्वाणी, निर्मोही या तीन आखाड्यांचे (अनी) १८ उपआखाडे आहेत. दिगंबरचे दोन आखाडे, निर्वाणीचे ९ आखाडे, निर्मोहीचे ७ आखाडे आहेत. निर्वाणी आखाड्याची एक अनी म्हणजे एक उपआखाडा नाशिकमध्ये आहे. त्याला खाकी आखाडा म्हटले जाते. तर हे सर्व आखाडे चार संप्रदायांचे आहेत. वैष्णवपंथीय साधूंचेही चार संप्रदाय असतात. रामानंदी, नि:मार्ग, विष्णुस्वामी, गौदिया असे चार संप्रदाय आहेत. याला रामानंद, नि:मार्ग, गबल्वाचार, रमाध्यगोदेश्वर असेही म्हटले जाते. रामानंदी, नि:मार्ग, विष्णुस्वामी हे तीन संप्रदाय हे कृष्णाचे, तर चौथा गौदिया रामाचा उपासक आहे. कपाळाला साधू जे गंधलेपन करतात त्याच्या प्रकारावरूनही साधू व आखाडे ओळखले जातात. तसेच भस्म लावण्याच्या पद्धतीवरूनही

आखाड्याची आणि संप्रदायाची ओळख निर्माण झालेली आहे. तर यांचे ६५० खालसा स्नानासाठी सिंहस्थात गोदातीरी येतात. यात दिंगबर आखाड्याचे ३५० खालसे आहेत. निर्वाणीचे ७५ तर निर्मोहीचे १७५ खालसे आहेत. प्रत्येक खालशामध्ये किमान शंभर ते दोन हजार साधू असतात. अशाच प्रकारे त्र्यंबकेश्वरच्या आखाड्यांची रचना असते.

### नाशिकमधील आखाडे

- श्री पंच रामनंदीय दिगंबर आखाडा
- निर्वाणी व खाकी आखाडा
- निर्मोही आखाडा

### श्री पंच रामनंदीय दिगंबर आखाडा :

वैष्णवपथीयांचा सर्वांत मोठा आखाडा म्हणून दिगंबर आखाड्याचे वर्णन करता येईल. दिगंबर असे जरी या आखाड्याचे नाव असले, तरी हे साधूवेश परिधान करतात. या आखाड्याला श्री पंच रामनंदीय दिगंबर आखाडा असे म्हटले जाते. या आखाड्याची निर्मिती धर्मरक्षणासाठी आचार्य बालानंदजींनी केली होती. त्यामुळे हा आखाडा शस्त्रधारी आहे. दिगंबर आखाड्यात सुमारे साडेतीनशे खालसे आहेत. एका खालशात २०० पासून दोन हजार साधू असतात. अयोध्या येथे या आखाड्याची मुख्य गादी आहे. दिगंबर आखाड्यातील साधूंचा इष्टदेव हनुमान आहे. तर आखाड्याचा ध्वज काळा, पिवळा, पांढरा, हिरवा व लाल या पाच रंगांचा आहे. पंचरंगी ध्वजातील प्रत्येक रंगाला धर्म, भक्ती, श्रद्धा, रक्षण अन् उपासना असे अर्थ आहेत. या ध्वजाचा वापर खालसाही करतात.



### निर्वाणी व खाकी आखाडा :

निर्वाणी हा आखाडा आठव्या शतकात निर्माण झाल्याचे म्हटले जाते. खाकीचा उच्चार खं- आ- कं असा होतो. खं म्हणजे ब्रह्म, आ म्हणजे स्मरण व कं म्हणजे सुख म्हणून ब्रह्माच्या स्मरणात सुखी असलेला आखाडा म्हणजे खाकी आखाडा असेही म्हटले जाते. तर खाकी म्हणजे लाठी. अंतिम क्षणापर्यंत झुंजणारे साधू अशी खाकी आखाड्याची ख्याती आहे. या आखाड्याची निर्मिती देशाचे व धर्माच्या संरक्षणासाठी झाल्याचे म्हटले जाते. खाकी आखाडा रामाचा उपासक आहे. तर हनुमान हे त्यांचे ध्वजनिशाण आहे. सिंहस्थ शाही स्नानाचा पहिला मान खाकी आखाड्याला मिळाला आहे. या आखाड्याकडे पेशव्यांनी शैवांच्या कुशावर्तावर तर वैष्णवांच्या रामकुंडावर स्नानाबाबत दिलेला निकाल असलेला ताम्रपट आहे.

### निर्मोही आखाडा :

स्वस्य देहानुवर्तिषु पुत्रवित्त गृहादिषु !
मोहोहि निर्गतो यस्मात्स निर्मोह उदाहृत: !!

आपल्या देहात पुत्रप्रेम, धनलोभ, गृहसंसाराचा लोभ अन् मोह असतो. तो ज्याने जातो तो म्हणजे निर्मोही आखाडा होय. या आखाड्याचा ध्वजधर्म म्हणजे निशाणध्वज पिवळ्या रंगाचा आहे. या आखाड्याचे अनेक खालसे आहेत.

### चतु:संप्रदाय आखाडा :

वैष्णवपंथीय साधूंचेही चार संप्रदाय असतात. चार संप्रदायांचा मिळून बनलेला एक आखाडा म्हणून या आखाड्याचे नाव चतु:संप्रदाय आखाडा. यात आचार्य रामानंद, आचार्य नि:मार्ग, आचार्य बल्वाचार, आचार्य माध्यगोदेश्वर या चार संप्रदायांचा समावेश होतो. या आखाड्यात एकूण २१० खालसे आहेत. त्यांचा एक प्रमुख असतो. आखाड्यात खालसे जितके जास्त तितके त्यांचे प्राबल्य जास्त असे मानले जाते.

### त्र्यंबकेश्वरमधील आखाडे



- बडा उदासीन आखाडा
- नया उदासीन आखाडा
- श्री पंचायती अटल आखाडा
- श्री पंचायती निर्मल आखाडा
- श्री शंभू पंचदशनाम आवाहन आखाडा
- श्री शंभू पंचदशनाम जुना आखाडा
- श्री तपोनिधी आनंद आखाडा
- श्री पंचायती आखाडा महानिर्वाणी
- श्री पंचअग्नी आखाडा, श्री तपोनिधी निरंजनी आखाडा



### बडा उदासीन आखाडा :

या आखाड्याची स्थापना श्री उदासीनाचार्य श्रीचंद्र भगवान यांनी केली. बडा उदासीन आखाड्याचा अर्थ उत + आसीन म्हणजे उंची गाठलेला. अर्थात ब्रह्मा आसीन स्थित, तसमाधीस्थ असा आहे. म्हणजे सांसारिक गोष्टींपासून विलिप्त झालेल्या बडा उदासीन आखाड्याची स्थापना १८२५ मध्ये गंगाघाट, टकनखल येथे करण्यात आली. आखाड्याची उपासक देवता गणेश, सूर्य, दुर्गा, विष्णू, महेश आहेत.

### नया उदासीन आखाडा :

नया उदासीन आखाड्याचा मूळ उद्देश हा हिंदू सनातन धर्माची रक्षा करणे हाच आहे. या आखाड्याची स्थापना श्री चंद्राचार्य महाराज यांनी केली. आखाड्याचे मुख्यालय उत्तराखंडमधील कनखल येथे आहे.

### श्री पंचायती अटल आखाडा :

हिंदू संस्कृतीचे रक्षण करणे, प्रचार व प्रसार करणे हे श्री पंचायती अटल आखाड्यांचे मूळ उद्देश आहेत. या आखाड्याची उपासक देवता गणेश आहे. आखाड्याचे मुख्यालय हे काशी, बनारस येथे आहे.

### श्री पंचायती निर्मल आखाडा :

श्री पंचायती निर्मल आखाडा हिंदू धर्म, संस्कृतीचा प्रचार व सनातन धर्माचे रक्षण करण्यासाठी ओळखला जातो. या आखाड्याचे मुख्यालय हरिद्वार येथे आहे.

### श्री शंभू पंचदशनाम आवाहन आखाडा :

या आखाड्याची स्थापना विक्रमी संवत ६०३ ज्येष्ठ कृष्ण नवमी, शुक्रवार इ. स. ५४७ मध्ये करण्यात आली. आखाड्याचे इष्टदेव भगवान सिद्ध गणेशजी आहेत. या आखाड्याची मुख्य शाखा ही वाराणसी येथे आहे.







### श्री शंभू पंचदशनाम जुना आखाडा :

त्र्यंबकेश्वरमधील सर्वात जुना आखाडा म्हणून श्री शंभूपंचदशनाम जुना आखाडा ओळखला जातो. या आखाड्याची स्थापना संवत १२०२ वि. मिती कार्तिक, शुद्ध मंगळवार इ.स. ११५६ या दिवशी उत्तराखंडच्या कर्णप्रयाग येथे झाली. आखाड्याचे इष्टदेव भैरव म्हणजे सूर्य आहे. या आखाड्याचे दुसरे नाव भैरव आखाडा असेदेखील आहे.

### श्री तपोनिधी आनंद आखाडा :

त्र्यंबकेश्वरमध्ये दहा आखाडे असले तरी यातील नऊ आखाड्यांची स्थापना ही विशेषकरून महाराष्ट्राबाहेर झाली आहे. मात्र, श्रीतपोनिधी आनंद आखाड्याची स्थापना ही महाराष्ट्रात संवत ९१२ वि.मिती ज्येष्ठ शुद्ध ४, रविवार इ.स. ८५६ मध्ये बरार देशात झाली. या आखाड्याचे इष्टदेव सूर्यनारायण आहे. तर, याचा भस्म गोल (शंभू) शिवलिंगाकार असतो. आनंद आखाड्याचे प्रमुख कार्यालय काशी वाराणसी येथे आहे.

### श्री पंचायती आखाडा महानिर्वाणी :

श्री पंचायती महानिर्वाणी आखाडा नाशिक-त्र्यंबक रस्त्यावर पहिल्यांदाच लागतो. या आखाड्याचे मुख्यालय हे अलाहाबाद येथे आहे. महानिर्वाणी या शब्दाचा अर्थ म्हणजे मोक्षप्राप्तीची अवस्था. श्री महानिर्वाणी आखाड्याची स्थापना इ.स. ७५९ मध्ये गढ कुंडाच्या मैदानात श्री सिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात झाली. सध्या हा आखाडा श्री पंचायती आखाडा महानिर्वानी या नावाने ओळखला जातो. पूर्वी अटल आणि महानिर्वाणी आखाडा यांचे एकच आचार्य महामंडलेश्वर असत. सध्या प्रत्येकाचे स्वतंत्र आचार्य महामंडलेश्वर आहेत. या आखाड्याचे इष्टदेव हे भगवान विष्णूचे पाचवे अवतार कपिलमुनीजी हे आहेत.

### श्री पंचअग्नी आखाडा :

त्र्यंबकेश्वरमध्ये दहा आखाडे असले तरी श्री पंचअग्नी आखाडा हा इतर आखाड्यांपेक्षा काही बाबतीत वेगळा आहे. श्री पंचअग्नी आखाडा हा ब्रह्मचारींचा आखाडा आहे. या आखाड्याची स्थापना संवत ११९२ वि. आषाढ शुक्ल एकादशी इ. स. ११३६ मध्ये झाली. या आखाड्याच्या ब्रह्मचाऱ्यांना चातुर्नाम्ना असे म्हटले जाते. या आखाड्याची उपासक देवता ही सर्व संहारक अग्निदेव व गायत्री माता आहे.

श्री पंचअग्नी आखाड्याचे मुख्य कार्यालय हे वाराणसी (काशी) येथे आहे. त्र्यंबकेश्वर येथे हा आखाडा? संत निवृत्ती महाराज समाधीस्थळ मार्गावर व गंगासागर तलावाजवळ आहे. पंचअग्नी आखाड्याच्या शाखा या हरिद्वार, नाशिक कबरेली, उज्जैन, जालना, अहमदाबाद, त्र्यंबकेश्वर, जुनागढ आदी ठिकाणी आहेत. जुना आवाहन आखाड्यानंतरचा हा सर्वात जुना आखाडा आहे. गोपालानंद ब्रह्मचारी हे सभापती आहेत. श्रीमहंत दुर्गानंद ब्रह्मचारी हे ठाणापती आहेत.

### श्री तपोनिधी निरंजनी आखाडा :

त्र्यंबकेश्वरमधील श्री तपोनिधी निरंजनी आखाड्याची स्थापना संवत ९६० मिती वद्य ६ सोमवार इ. स. ९०४ मध्ये कच्छमधील मांडवी येथे झाली. श्री तपोनिधी निरंजनी आखाड्याचे इष्टदेव म्हणजे उपासक हे कार्तिकस्वामी आहेत. याचा गोल (शंभू) गोलाकार असतो. निरंजनी आखाड्याचे मुख्य कार्यालय हे अलाहाबाद, हरिद्वार येथे आहे. देशभरात तब्बल १४० ठिकाणी आखाड्याच्या शाखा आहेत.

लेखक रमेश पडवळ (०८३८००९८१०७)
लेखक अनिल पवार (०९७६७६५००६३)
हे दै. महाराष्ट्र टाईम्स नाशिक येथील प्रतिनिधी आहेत.



# देवभूमी नाशिक

**प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली पुण्यभूमी म्हणजे आजचे नाशिक. कळायला लागल्यापासून नाशिकची ओळख अशीच केली जायची आणि आपण किती भाग्यवान असे म्हणून इतरांनी हेवा करावा असे वाटायचे. परंतु नाशिकपर्यंतचा या भूमीचा प्रवास अतीव रमणीय, रोमांचक आणि स्मरावा असाच आहे.**

थेट प्रभू रामचंद्रांच्या काळात गेल्यास नाशिक हा दंडकारण्य म्हणून गणला जाणारा प्रदेश. अर्थात राम वनवासात गेल्यावर त्याचा प्रवास अयोध्या ते शेवट श्रीलंकेपर्यंत जातो तो व्हाया नाशिकच. त्याच्या खुणा अजून सीतागुंफा, लक्ष्मणरेखा मंदिर, तपोवन येथे पाहायला मिळतात. इतकेच काय सीताहरण पण इथेच. मारिचवध नाशिकपासून पूर्वेकडे ५० किमीच्या परिसरात घडला. रामाने मारिचामागे जाण्यापूर्वी सीतेला तपोवनात ठेवली आणि लक्ष्मणाने रेषा ओढली ती इथेच. येथे राहण्याचे मुख्य कारण तपोवन आणि पंचवटी.

**किशोर पाठक**

पाच वडांच्या एकत्रित सहवासात राम, लक्ष्मण, सीता राहिले म्हणून पंचवटी नाव पडले. हनुमानाची भेट नंतर झाली असली तरी नाशिकपासून २५ किलोमीटरवर असलेल्या अंजनेरी पर्वतावर हनुमानाचा जन्म झाल्याचे सांगतात. म्हणून रामायणाच्या युद्धाचे धागे नाशिकशी जुळतात आणि पुराणइतिहास सिद्ध होतो.

इतकेच काय तर भरत जेव्हा रामाला भेटायला चित्रकूट पर्वतावर आला तेव्हा भरताने दशरथ राजाच्या निधनाची वार्ता रामास सांगितली.

नंतर रामाने वडलांना श्रद्धांजली वाहिली ती नाशिक गोदावरी नगरीत. वडलांना पिंडदान करून मुक्ती देण्याचे काम झाले. तेव्हा रामाने जे क्रियाकर्म केले त्यामुळे आजही रामकुंडातील अस्थिविलय तीर्थ प्रसिद्ध आहे. त्यामुळे नाशिकला अजून वेगळे वलय प्राप्त झाले आहे.

रावणाने सीतेला पळवून नेताना त्याला विरोध करणाऱ्या जटायूचे पंख रावणाने छाटले ते ह्याच भूमीत. शूर्पणखेचे नाक कान लक्ष्मणाने कापण्याचा इतिहास ह्याच भूमीत नोंदवला जातो.

### थेंब अमृताचा

इतकेच काय तर देव-दानवांच्या समुद्रमंथनातून निघालेल्या अमृत कुंभाच्या पळवापळवीत जे चार थेंब भारतभूवर सांडले त्यातील एक नाशिकमध्ये पडला. म्हणून बारा वर्षांनी होणारा कुंभमेळा नाशिकमध्ये होतो. यावर्षी नाशिक आणि ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर येथे होणारे शाही स्नान नाशिकचा भारतभूवर परिचय करून देते.

एकदा तपोवन म्हटल्यावर नाशिक ही तपोभूमी आहेच. रामाच्या प्रदीर्घ प्रवासातील आणि वास्तवातील काही दिवस ऋषींच्या सेवेत आणि सहवासात गेले. इथे वसिष्ठ ऋषींचा आश्रम, मंदिर आहे. विश्वामित्र आणि इतर ऋषींचे वास्तव्यस्थान म्हणूनही नाशिक सर्वश्रुत आहे. कावनई क्षेत्राचा इतिहास तर सर्वांना माहीत आहे. येथील पावित्र्याचा अनुभव कुंभमेळ्यात जास्त अनुभवता येतो. हे झाले तपोसामर्थ्याचे काही पौराणिक क्षण.

अलीकडे म्हणजे जेमतेम ४०० वर्षांपूर्वी नारायण सूर्याजी ठोसर नावाचा मुलगा जांब या मराठवाड्यातील गावाहून पळून नाशिकमध्ये आला. १६२० ते १६३२ असे १२ वर्षे तो टाकळी येथे राहिला. गोदा नदीच्या संगमावर त्याने १२ वर्षे तपश्चर्या केली. अखंड रामनामाचा कोटी जप केला. रामचंद्राचे दर्शन, साक्षात्कारी अनुभव याच ठिकाणी त्याला झाला. तोच पुढे समर्थ रामदास झाला. नाशिक येथील वास्तव्यातच त्याने करुणाष्टकांची निर्मिती केली. रामदासांच्या उज्ज्वल आयुष्याचा प्रारंभ नाशिक येथेच झाला.



### भूमी संतांची

हा इतिहास पाहता नाशिक येथे सर्व संत येऊन गेले असे दाखले मिळतात. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान मुक्ताबाईंना घेऊन विठ्ठलपंत त्र्यंबकला आले. ब्रम्हगिरीवर वाघ दिसताच पळापळ झाली. निवृत्ती चुकला गुंफेत गेला. तिथेच त्याला नाथ संप्रदायाची दिक्षा मिळाली. गोरखनाथांची परंपरा निवृत्तीने सांभाळली. ज्ञानोबाचा गुरू झाला. आजही गोदेचा उगम आणि त्याची कथा सर्वांना स्फूर्ती देते. गौतम ऋषींच्या तपश्चर्येने गंगा दक्षिणेत आली. दक्षिण काशी असलेले त्र्यंबक गोदेच्या पवित्र अस्तित्वाने सिद्ध आहे.

**नाशिक भूमी पूर्वी जनस्थान म्हणूनच ओळखली जायची मग त्याची गुलछनाबादपासून नाशिकपर्यंत नावे पडली. नासिकाला नाक-कान कापण्याचा संदर्भ असला तरी नाशिक आता महानगर झाले. तरीही या गावाची तपोभूमी म्हणून असलेली ओळख कुणीही विसरू शकत नाही. तप करणारा तो तपस्वी. केवळ आध्यात्मिक अर्थाने तपोभूमी नाही तर खऱ्या अर्थाने आपापल्या क्षेत्रात कठोर तप करून, परिश्रमांची पराकाष्ठा करून ध्येय साध्य करणारा, देदीप्यमान यश संपादन करणारा कुणीही या तपोभूमीत तपस्व्याचे तेज घेऊनच जातो. मग ते विष्णू दिगंबर पलुस्कर असोत, दादासाहेब फाळके, विनायक दामोदर सावरकर, अनंत कान्हेरे, कवी गोविंद, लक्ष्मीबाई टिळक, काळाराम मंदिर सत्याग्रह करणारी बाबासाहेब ते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि साहित्य, शास्त्र, ज्ञानविज्ञान, मनोरंजन, समाजसेवा, क्रीडा या सर्व क्षेत्रात नाव कमवून नाशिकला तपोवन आणि उपवन करणारे महान व्यक्तिमत्त्वे हे सारे तपस्वीच आहेत.**

### मंत्रभूमी

आज नाशिक यंत्रभूमी असली तरी ती मंत्रभूमी होती, तंत्रभूमी होती. आजही ही भूमी मंत्राचा अर्थ सर्वांना सांगत असते. गोदेच्या पवित्र काठावर संध्याकाळी उभे राहिल्यावर तिच्या झुळझुळत्या पाण्यातून ऐकू येणारा हा मंत्रघोष या तपोभूमीचा साक्षात्कार नक्कीच देतो. बस, मन फक्त इतके स्वच्छ कोवळे आणि शांत हवे. सर्व विकारांचे यथोचित शमन करणारा एक शांत पवित्र स्वर या भूमीत आहे, या तीर्थात आहे. म्हणूनच नाशिक तीर्थक्षेत्रच गणले जाते. येथे जंगल होते. जंगली माणसे होती. त्याचे वन झाले आदिमानवाची उत्क्रांती झाली. वनांचे उपवन झाले, समृद्धी होत राहिली. तपस्वी देवमाणसांची वस्ती वाढली. बघताबघता वनाचे तपोवन झाले आणि नाशिक समृद्ध पुण्यभूमी झाली.

संपर्क: ०९४२२२५६९०२

# नाशिकची समृद्ध संस्कृती

**एखादे नवे नाटक चालते की नाही हे बघायचे असेल तर पहिला प्रयोग नाशिकमध्ये घ्यावा. शास्त्रीय संगीताची मैफल रंगते ती नाशिकच्या पिंपळपारावर. नृत्यसंस्थांचे महोत्सव पूजा करतात ते येथेच. वारली असो वा ओरिगामी असो अशा कलेचे इथे मनापासून पूजन होते... साहित्याची तर दैवते या नाशिकचीच... म्हणूनच कला, साहित्य आणि संस्कृती यात नाशिकचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. किंबहुना आता पुण्याच्या आधी नाशिकचे नाव घेतले जाऊ लागले आहे.**

नाशिकला तसा धार्मिक वारसा. पण ही धार्मिकता जपतानाच नाशिककरांनी जपली ती त्यातील सांस्कृतिकता. धार्मिक कार्यक्रमांमध्ये होणारे सांस्कृतिक कार्यक्रम हे गावोगाव होतातच. पण त्याचा भलामोठा उत्सव होतो तो नाशिकमध्येच. मग काळाराम मंदिरातील वासंतिक नवरात्रोत्सव असो, दिवाळीतील पाडवापहाट असो वा गणेशोत्सवातील कार्यक्रम असो. आपल्या धार्मिक वारशाबरोबर सांस्कृतिक वातावरण नाशिककरांनी आणि विविध संस्थांनी फक्त टिकवूनच ठेवले नाही तर त्याची एक उंची गाठली आहे.

साहित्यातील दैवते स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, कविवर्य कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, कवी गोविंद, वामनदादा कर्डक, बाबुराव बागुल यांच्यापासून आजपर्यंतच्या अनेक साहित्यिकांनी ही भूमी साहित्याने समृद्ध करून ठेवलेली आहे. ती समृद्ध होतेही आहे. साहित्याच्या या समृद्धतेतूनच सांस्कृतिक चळवळही जोमात सुरू आहे. १७५ वर्षे होत असलेले सार्वजनिक वाचनालय, नाशिक हे केवळ आपल्या साहित्यसेवेतच अडकले नाही तर प. सा. नाट्यगृह, लिमये सभागृह उभारून तेथे अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांना त्याने व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.




कुसुमाग्रज प्रतिष्ठान सध्या साहित्य संस्कृतीचे माहेरघरच झाले आहे. येथे उभारलेला समीप रंगमंच आणि इतर अनेक सभागृहांमध्ये छोट्या-छोट्या कार्यक्रमांतून नाशिककर कलाकार आणि रसिकही आपली सांस्कृतिक चळवळ जोमाने पुढे नेत आहेत. आता तर महाराष्ट्र शासनाने कलारंग हा कार्यक्रम सुरू करून ही चळवळ अधिक समृद्ध करण्यासाठी हाती घेतलेला स्ट्रीट प्लेचा उपक्रम नाशिकमध्ये चांगलाच रंगला आहे. मुख्य म्हणजे दर रविवारी शहरात सांस्कृतिक वातावरण असते.

### उत्सुकता नव्याची

पुढील रविवारी काय बघायला मिळणार याची नाशिककरांमध्ये या कार्यक्रमाने उत्सुकता निर्माण केली आहे. नाशिकच्या कलाकारांना कलेचे धडे घेण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद गाठावे लागत होते. आता मात्र त्यांना नाशिकमध्येच सुरू झालेल्या ललित कला केंद्रात हे शिक्षण मिळत असल्याने उत्तमोत्तम कलाकार या ठिकाणी घडत आहेत. मग फक्त अभिनयच नाही तर संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य, नृत्य अशा विविध पातळ्यांवर हे कलाकार शिकून बाहेर पडत नाशिकचे नाव रंगभूमीवरच नाही तर छोट्या पडद्यासह मोठ्या पडद्यावर चांगले कार्य करत आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अनेक शाखा आहेत, पण त्यात नाशिकची शाखा चांगलीच सक्रिय आहे. विविध उपक्रम राबवून कलाकारांना व्यासपीठ देण्याचे चांगले काम यानिमित्ताने होताना दिसते आहे. आता सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी तर सांस्कृतिक खात्याचे विभागीय कार्यालयही नाशिकला देण्याचे जाहीर केल्याने येथील सांस्कृतिक वातावरण अजूनच सकस आणि सुदृढ होईल, यात शंकाच नाही. याबरोबरच चित्रपट महामंडळाच्या कार्यालयाचेही काम आता हाती घेण्यात येणार आहे. चित्रपटाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या दादासाहेब फाळके यांच्या गावात असे कार्यालय नाही वा चित्रपटसृष्टीच नाही ही बाब शासनाच्या लक्षात आल्यानंतर आता महामंडळाचे हे विभागीय कार्यालय आकारास येईल. चित्रपटसृष्टीचेही काम सुरूच आहे. अशा सांस्कृतिक वातावरणातूनच सध्या मालिका, चित्रपटांमध्ये दिसणारे अनिता दाते, नेहा जोशी, अभिजीत खांडकेकर, चिन्मय उदगीरकर, मृणाल दुसानीस, भक्ती देशपांडे, संस्कृती खेर, अंजली पाटील हे आणि यांच्यासारखे कित्येक कलाकार आज नाशिकचे नाव मराठी कलासृष्टीत मोठे करत आहेत.


**पियूष नाशिककर**

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेत यंदा तर नाशिकच्याच 'न हि वैरेन वैराणी' या नाटकाने बाजी मारली.

लोकहितवादी मंडळाने सादर केलेले हे नाटक संपूर्ण राज्यात पहिले आले. केवळ हेच नाटक नाही तर विद्या प्रबोधिनी प्रशाला मराठी माध्यमाने शासनाच्याच बालनाट्य स्पर्धेत सादर केलेल्या 'म्या बी शंकर हाय' या नाटकानेही राज्यस्तरावर आपला झेंडा फडकवला.

### नृत्यकलेचा वारसा

नाशिकला केवळ नाट्यकलेचाच नाही तर नृत्यकलेचाही मोठा वारसा आहे. सध्या अनेक संस्था उत्तम नृत्य शिक्षण देतात. त्यात पं. बिरजू महाराज यांच्या शिष्या असलेल्या विद्या देशपांडे तसेच संजीवनी कुलकर्णी, रेखा नाडगौडा, कीर्ती भवाळकर, संगीता पेठकर या नृत्यांगना शास्त्रीय नृत्याचे उत्तम शिक्षण देऊन आपले शिष्य देशाविदेशात सादरीकरणासाठी पाठवतात. तबलावादन हे देखील नाशिकचे एक वैशिष्ट्य. नितीन पवार, नितीन वारे, भास भामरे अशी अनेक नावे आहेत जे तबलावादक तयार करत आहेत. काही दिवसांपूर्वी तर या सगळ्यांना एकत्र येऊन तब्बल १७५ जणांचे सामुहिक तबलावादन घडवून आणले. बासरीतही तेच. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वर्ल्ड रेकॉर्डच्या निमित्ताने हजारो बासरीवादक नाशिकमध्ये तयार झाले आहेत. गाण्यात आणि संवादिनीत वैरागकरांचे नाव प्राधान्याने घेतले जाते. आता अविराज तायडे आहेत, मंजिरी असनारे-केळकर आहेत, पंडित मारुलकर आहेत यांचे स्वर ते कणाकणाने आपल्या शिष्यांना देऊन आपला वारसा पुढे चालू ठेवत आहेत.



### चित्रकलेचा वारसा

नाशिकला मिळालेला आणखी एक वारसा म्हणजे चित्रकलेचा. वा. गो. कुलकर्णी, शिवाजी तुपे यांनी नाशिकची कला आधीच सातासमुद्रापार पोहोचवली आहेच. आता सावंत बंधू, शिशिर शिंदे आणि असे अनेक कलाकार हाच वारसा जगाच्या पाठिवर घेऊन जात आहेत. नाशिकमध्ये वारली कला शिकणारे आणि शिकविणारे अनेक आहेत. नाशिकच्या ग्रामीण भागातील ही कला आता ग्रामीण भागात जरी कमी होत असली तरी शहरात शिकता येत असल्याने ग्रामीण भागातील मंडळी वारलीच नव्हे तर सर्वच कलांचे शिक्षण घेण्यासाठी नाशिककडे वळू लागली आहे. केवळ विविध कला सादर करणेच नव्हे तर ज्येष्ठ-कनिष्ठांच्या पाठीवर थाप मारण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पुरस्कार, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान हा मानाचा पुरस्कार, सावानाचे विविध पुरस्कार, संस्कृती आणि संस्कृती वैभवचे पुरस्कार अशा पुरस्कारांनी कलासेवकांना जेव्हा गौरविण्यात येते तेव्हा अवघे नाशिक कृतकृत्य होते.

### ढोलपथके

आता तर पुणे-डोंबिवलीच्या धर्तीवर नाशिकमध्ये ढोलपथकेही तयार होत आहेत. तालरुद्र, ब्रह्मनाद अशी ढोलपथके आणि त्यात सर्वत्र प्रसिद्ध झालेला नाशिकढोल आहे.

कोणत्याही धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात ही पथके फक्त वातावरण निर्मिती करते. विशेष कवायतींसह कार्यक्रम करून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. याबरोबरच मग कधी तारपा, आदिवासी, शेतकरी अशा नाशिकच्या आसपासच्या ग्रामीण भागातील लोककलाही नाशिकमध्ये रंगत असतात. येथील सर्वच क्षेत्रातील ज्येष्ठ आणि नवोदित कलाकार एकत्र येऊन काम करत आहेत त्यामुळेच येथील सांस्कृतिक चळवळ उत्साहाने, जोमात सुरू राहील कारण कोणतीही सांस्कृतिक चळवळ म्हणजे या खांद्यावरची पालखी त्या खांद्यावर देणे आलेच. आपण फक्त त्या पालखीचे भोई होणे महत्त्वाचे असते आणि तेच नाशिकमध्ये होते आहे.

(लेखक हे दै. दिव्य मराठीचे नाशिक येथील प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०७७७००५९००९



# रम्य हे नाशिक...

वीकेण्ड टुरिझमसाठी नाशिक हे सर्वोत्तम ठिकाण आहे. या टूरसाठी आवश्यक ते सर्व घटक नाशिक परिसरात आहे, म्हणूनच गेल्या काही वर्षात ‘वीकेण्ड टुरिझम’ ही कल्पना येथे चांगल्या प्रमाणात रुजली आहे. नाशिक हे भौगोलिकदृष्ट्या मुंबई, पुणेकरांसाठी अत्यंत जवळ आहे. राहण्याच्या, जेवणाच्या उत्तम सोयी, आल्हाददायक वातावरण, धार्मिक, पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणे, वाइनयार्डस्



इगतपुरी येथील आंतरराष्ट्रीय विपश्यना अकादमी

**मोठ्या शहरातील रोजचे धावपळीचे जीवन, कामाच्या ठिकाणचे ताणतणाव, आहारातील असमतोल, कुटुंबासोबत वेळ न देता येणे आदी बाबींमुळे हैराण झालेल्या शहरवासीयांना दोन दिवस रिलॅक्स, ताजेतवाने होऊन पुन्हा नवीन जोमाने कामास सुरुवात करण्याच्या गरजेतून ‘वीकेण्ड टूर’ किंवा ‘वीकेण्ड टुरिझम’चा उदय झाला आहे.**

अशा बाबींमुळे ‘वीकेण्ड टुरिझम’बरोबर आता नाशकात मेडिकल टुरिझम, ॲग्रो टुरिझम, वाइन टुरिझम, यासारख्या नवनवीन संकल्पना बहरत आहेत. याशिवाय औद्यागिक क्षेत्राचा विकास, विविध विषयावरील परिषदा, बैठकांमुळे नाशिकला महत्त्व प्राप्त होत आहे. या निमित्ताने नाशिक परिसरात पर्यटनाची संधीदेखील उपलब्ध होते.

दत्ता भालेराव

### निसर्ग पर्यटन

नाशिक जिल्हयात मोठ्या प्रमाणात बागायती शेती केली जाते. इथल्या फळबागा विशेषत: द्राक्षाच्या बागा पर्यटनासाठी उपयुक्त आहेत. नाशिकचा हिरवागार निसर्ग पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करतो. या निसर्गाच्या सान्निध्यात उत्तर महाराष्ट्रातील पारंपरिक ग्रामीण  खाद्य पदार्थांची चव चाखण्याची संधी शहरी पर्यटकांना मिळते. आल्हाददायक वातावरण आणि हिरवीगार पर्वतराजी पर्यटकांना सतत खुणावत असते

### गंगापूर धरण

नाशिक शहराजवळील गंगापूर धरण आणि त्यालगतचा परिसर हा पर्यटनासाठी सर्वोत्तम आहे. नैसर्गिक सान्निध्यात वेळ घालवण्यासाठी हिवाळ्यात हे ठिकाण उत्तम पर्याय आहे. विविध प्रकारचे पक्षी या ठिकाणी येतात. तसेच आजूबाजूचा परिसर हिरवागार असल्याने एक छान ट्रीप होऊ शकते.

### नांदूर मध्यमेश्वर

महाराष्ट्रातील भरतपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या नांदूर मध्यमेश्वर अभयारण्यात सुमारे २५० प्रकारचे पक्षी या ठिकाणी पहावयास मिळतात. देश विदेशातून हजारो पक्षी स्थलांतर करुन येथे येतात. पक्ष्यांच्या सहवासात दिवस घालविणे हा वेगळाच अनुभव असतो. बच्चेकंपनीसाठी तर ही सहल तर अधिक आनंददायी असते

### वायनरीज

आपल्या देशात द्राक्ष उत्पादनात अव्वल स्थानावर असलेले नाशिक अलीकडे वाइन टूरसाठी ओळखले जात आहे. भारतात सर्वाधिक वायनरी नाशिक जिल्ह्यात असून वाइनमूळे नाशिकची जागतिक स्तरावर ओळख आहे. एक दिवसाची वाइन टूर करण्यासाठी मुंबई, पुणे, बंगळुरू, हैदराबाद येथून नियमित पर्यटक वायनरीजला भेटी देण्यासाठी येत असल्याने नाशिकच्या अर्थकारणातही मोठी भर पडत आहे.

### धार्मिक पर्यटन

नाशिक जिल्ह्याला धार्मिक आणि पौराणिक महत्त्व आहे. जिल्ह्यात अनेक प्राचीन मंदिरे आहेत. गोदावरीच्या किनारी असणाऱ्या मंदिरांना पर्यटक वर्षभर भेट देत असतात. गोदावरीचे उगमस्थान आणि प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी

असल्याने देश-विदेशातील भाविक येथे येत असतात.

### त्र्यंबकेश्वर

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वराचे मंदीर प्राचीन आहे. ब्रह्मगिरी पर्वत, दुगारवारी धबधबा यामुळे परिसर समृद्ध आहे. याच बरोबर स्वामी समर्थ गुरुकुल, संत निवृत्तीनाथ मंदीर यामुळे हा परिसर गजबजलेला असतो.

### सप्तश्रृंगगड वणी

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले सप्तश्रृंगीगड वणी हे नासिक येथून केवळ ७३ किलोमिटर असून आता गडावर जाण्यासाठी वाहने नेण्याची सोय झालेली आहे. तसेच एक दिवसाची सहल करावयाची झाल्यास नाशिक येथून जवळ असलेले गुजरात राज्यातील सापुतारा हे थंड हवेचे ठिकाण व वणी गड अशी छान सहल होऊ शकते.

### काळाराम मंदिर

पेशव्यांनी बांधलेल्या काळाराम मंदिराची रचना त्र्यंबकेश्वराच्या मंदिरासारखीच असून नाशिक शहरात आलेले पर्यटक या मंदिरास भेट देतात.

### पंचवटी परिसर

पंचवटी परिसरात सितागूंफा, तपोवन, लक्ष्मीनारायण मंदिर, कपालेश्वर मंदीर, रामघाट, रामकूंड, नारोशंकराचे मंदिर आणि तेथील प्रसिद्ध असलेली भव्य घंटा, गांधी तलावात बोटींग करणे अशा विविध स्थळांमुळे पंचवटी परिसर नेहमी गजबजलेला असतो.

जिल्ह्यात याशिवाय मनमाडचा गुरूद्वार, नाशिकचे बाळ येशुचे मंदिर, बडी दरगाह, मांगीतुंगीचे मंदिर, धर्मचक्र प्रभावतीर्थ विल्होळी, सिन्नर जवळील गोंदेश्वराचे हेमाडपंथी मंदिर, मुक्तीधाम, कपिलधारा तिर्थ, चांदवडचे रेणुका मातामंदिर अशी अनेक धार्मिक स्थळे आहेत.

### ऐतिहासिक पर्यटन

महाराष्ट्रात सर्वाधिक (६२) किल्ले नाशिक जिल्ह्यात आहेत. त्यामुळे ट्रेकर्स मंडळी आणि इतिहासप्रेमींचे नाशिक हे आवडते ठिकाण आहे. सह्याद्रीची हिरवीगार पर्वतराजी आणि त्यात वसलेल्या किल्ल्यांशी जोडला गेलेला इतिहास पर्यटकांना आणि अभ्यासकांना खुणावत असतो.

### रामशेज किल्ला

नाशिक-पेठ रोडवर असलेला रामशेज किल्ला इतिहासाची पाने जाणून घेण्यासाठी उत्तम आहे. किल्ल्याजवळील गजपंथी टेकडीच्या पायथ्याजवळ ११ व्या शतकातील जैन मंदिरांचा समूह आहे.

### अहिल्यादेवी होळकरांचा रंगमहाल

नाशिकपासून सुमारे ६३ कि.मी. अंतरावरील चांदवड येथे पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांचा रंगमहाल प्रसिद्ध आहे.



दूधसागर धबधबा

### सावरकरांची जन्मभूमी भगूर

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची ही जन्मभूमी आहे. भगूर नाशिक शहरापासून सुमारे १५ किमी अंतरावर आहे.

### भारतीय नाणे संशोधन संस्था

नाशिक -त्र्यंबकेश्वर मार्गावर अंजनेरीजवळ भारतीय नाणे संशोधन संस्था आहे. येथे भारताच्या जुन्या संस्कृतीची व इतिहासाची नाण्यांच्या माध्यमातून ओळख होते.

### साल्हेर मुल्हेर किल्ला

हा किल्ला नाशिकपासून ९७ किमी अंतरावर आहे. श्रीसमर्थ रामदास स्वामी मुल्हेर येथे वर्षभर होते. शिवाजी महाराज सुरतेची लूट नेताना येथे थांबले होते. याशिवाय सिन्नरचे गारगोटी संग्रहालय, नाशिकजवळील दादासाहेब फाळके स्मारक व बुद्ध स्मारक, सोमेश्वराचा नयनरम्य परिसर आदी पर्यटनासाठी उत्तम ठिकाणे आहेत. कुंभमेळ्यानिमित्त येणाऱ्या भाविकांसाठी ही पर्यटनाचीदेखील पर्वणी आहे.

संपर्क : ०९४२३९६८८६८

❑ ❑

जलयुक्त शिवार अभियानाचे अंतिम साध्य दुष्काळमुक्ती असले तरी गावोगावी फिरल्यानंतर जो अनुभव येतो आहे, तो त्याहून अधिक फायद्याचा आहे. या योजनेबद्दल गावांतील लोकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. त्यामुळे लोकांनी एकजुटीने या कामात स्वत:ला झोकून दिले. त्याचा परिणाम असा झाला की, लोकसहभाग मोठ्या संख्येने मिळाला. एकट्या बीडचे उदाहरण द्यायचे झाले तर तेथील २८ कामांपैकी १९ कामे ही लोकसहभागातून झाली. लोकसहभाग, त्यातून निरनिराळे विचार एकत्र येणे, शासनाकडून जी कामे कंत्राट काढून झाली असती, ती कामे अत्यल्प दरात होणे, कित्येक वर्षांनी पाण्याच्या साठ्यांचे पुनरुज्जीवन होणे अशी कितीतरी उद्दिष्टे यातून साध्य झाली आहेत. म्हणूनच स्वात्र्यंत्तोतर काळात पाण्यासाठी उभारली गेलेली ही सर्वांत मोठी लोकचळवळ आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतात, ते यासाठीच!



# जलयुक्त शिवार
# शाश्वत पाण्यासाठीची लोकचळवळ

मुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर श्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे पहिले मोठे आव्हान होते, ते शेतकऱ्यांच्या प्रश्नाचेच. हा प्रश्न सोडविण्यासाठी केवळ पॅकेज उपयोगाचे नाहीत, तर त्यासाठी



मुलभूत सोयी-सुविधा त्यांना द्याव्या लागतील, ही भूमिका त्यांनी स्पष्टपणे घेतली आणि ती घोषितसुद्धा केली. दरवर्षी एक नवे पॅकेज हे या समस्येवरचे कायमस्वरूपी समाधान कधीही होऊ शकत नव्हते. शेतीला आवश्यक काय तर पाणी आणि दुष्काळ वारंवार पडणार असेल तर शेतकरी जगूच शकत नाही, हेही तितकेच खरे होते. म्हणूनच राज्यातील २५ हजार दुष्काळी गावांची यादी तयार झाली आणि पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने या गावांना दुष्काळमुक्तीकडे नेण्याचा एक मोठा संकल्प पुढे आला.

**केतन पाठक**

दरवर्षी नवीन कामे हाती घ्यायची आणि जुनी कामे झाकून ठेवायची, ही भूमिका बदलण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. नवीन कामांना झटपट मंजुरी तर देऊच, पण गावोगावी पाण्याचे जे साठे आहेत, त्याचे पुनरुज्जीवन करायचे, त्यासाठी उपलब्ध संसाधनांचा वापर आधी करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. काम मोठे होते, निधीही कमी लागणार होता. पण दांडग्या इच्छाशक्तीची आणि त्या दृष्टीने नियोजनाची गरज होती, ती मुख्यमंत्र्यांनी नेमकी हेरली. जनसहभाग मिळाला तरच काम वेगाने



**विदर्भातील उखाळी येथे जलयुक्त शिवार योजनेच्या कामाची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

होणे शक्य होणार होते. कारण, सरकार येऊन अवघ्या सातव्या महिन्यात पावसाळा होता. पावसाळ्यापूर्वी ही सारी कामे साकारायची होती. मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका वारंवार स्पष्ट केली. शासन एकट्याने हे काम करू शकणार नाही. त्यासाठी लोकांचा सहभाग मला हवा आहे, हे ते वारंवार सांगत होते. स्वत: गावात जाऊन छोट्या-छोट्या गटांशी चर्चा करण्याचा निर्णयसुद्धा मुख्यमंत्र्यांनी घेतला. प्रशासनात खोलवर जाऊन या अभियानाचे महत्त्व त्यांनी बिंबविले आणि मग अपेक्षित प्रतिसाद साधला गेला.

## गावागावांत मुख्यमंत्री

आपल्या अतिशय व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून बहुतेक सारे जिल्हे पिंजून काढण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले. सांगली, सोलापूर, कोल्हापूर, बीड, उस्मानाबाद, अकोला, वाशीम, बुलढाणा, नागपूर, धुळे, औरंगाबाद, लातूर, चंद्रपूर, गडचिरोली आणि इतरही अनेक जिल्ह्यांत मुख्यमंत्र्यांनी स्वत: दौरे केले. सकाळी ८ वाजता दौऱ्यावर निघायचे, सायंकाळी ७ पर्यंत गावांत फिरायचे, तेथून जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आढावा घेऊन प्रशासकीय अडचणी दूर करायच्या, असा हा मुख्यमंत्र्यांचा दिनक्रम सध्या चालू आहे. प्रत्येक गावांतून एकच प्रतिक्रिया ऐकू येते आहे, आजवर एकही मुख्यमंत्री इतक्या कमी काळात इतकी गावे फिरले नाहीत. प्रशासनातील अधिकारीसुद्धा मुख्यमंत्र्यांकडून त्यांना मिळालेल्या वेळेबद्दल समाधान व्यक्त करतात. अनेक गावांमध्ये जे नदी-नाले होते, तेथे अगदी कालपर्यंत रिकामी मैदाने दिसायची, आता त्या जागा पुन्हा नदी-नाल्यांच्या रूपाने दिसू लागल्या आहेत. घरात नवीन मूल जन्माला आल्यानंतर जो आनंद असतो, अगदी तसाच आनंद गावांतल्या या नव्या रूपाकडे पाहुन गावकऱ्यांना होतो आहे. जणू आपल्या घरचे कार्य आहे, असे समजून लहानमोठे, आबालवृद्ध सारेच या योजनेला हातभार लावताना दिसत आहेत.

प्रशासनातील अधिकारी मुख्यमंत्र्यांना जेव्हा सांगतात की, याच कामाची निविदा काढली असती तर हे काम किती लाखांत झाले असते आणि लोकसहभागातून झाले तर किती हजारात झाले, तेव्हा ते अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांच्याही चेहऱ्यावरचे समाधान अवर्णनीय असते. आर्थिक बचतीचेही ध्येय यातून साध्य झाले आहे. स्वत: मुख्यमंत्री जेव्हा भेटी देतात, तेव्हा त्यांचा जनतेत आणि प्रशासनात जाणारा संदेश अतिशय महत्त्वाचा असतो. मुख्यमंत्री पायी चालत नाल्यापर्यंत, बंधाऱ्यापर्यंत येतात, तेव्हा गावकऱ्यांमध्ये तर उत्साह संचारतोच. शिवाय, प्रशासनातही या योजनेचे गांभीर्य पोहोचलेले असते. खऱ्या अर्थाने केवळ जनता, प्रशासन यांचाच नाही, तर राज्याच्या शीर्षस्थ नेतृत्वाचाही तळागाळाशी होत असलेला संवाद या योजनेचे महत्त्व आणि गांभीर्य अधोरेखित करीत असतो.

प्रामाणिक प्रयत्न, नवी क्रांती घडविण्याची उमेद यातून हे स्वप्न साकार होणे आता निश्चित आहे. असे म्हणतात की, प्रामाणिक प्रयत्नांना फळ नेहमीच मिळते. जलयुक्त शिवार योजनेच्या भूमिकेतील भावना व्यापक आहे, राज्यातील जनतेचा घाम त्यात गाळला गेला आहे, प्रशासनापासून ते गावकऱ्यांपर्यंत प्रामाणिक प्रयत्न आहेत, त्यामुळे या योजनेला अपेक्षित यश मिळणार, हेही तितकेच सत्य आहे.

## थोडक्यात अभियानाची माहिती....

शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हे कुठल्याही राज्याच्या समृद्धीसाठी आवश्यक असते. हाच या अभियानाचा गाभा आहे. जलसंधारणाच्या निरनिराळ्या योजना आजवर वेगवेगळ्या पद्धतीने राबवल्या जात होत्या. प्रथमच असे २८ उपचार एकत्रितपणे राबवण्यात येत आहेत. अण्णा हजारे यांचा राळेगण पॅटर्न, शिरपूर पॅटर्न, हिवरेबाजार पॅटर्न इत्यादी विविध पॅटर्नचा अभ्यास करून एकत्रितपणे ही योजना तयार केली गेली आहे. जलसंधारणांतर्गत उपाययोजना एकात्मिक पद्धतीने राबवण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय यात आहे.

प्रशासकीय पातळीवर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांचा परिणामकारक समन्वय, आराखड्यास मान्यता देणे, सनियंत्रण व एकंदरीत कामकाजाचा शासनास अहवाल सादर करण्याकरिता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समन्वय समिती स्थापन करण्यात आली असून गावांची/कामांची निवड करणे त्यांना मान्यता देणे, कृतिआराखडा तयार करणे, व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या

## पूर्ण झालेल्या कामांचा तपशील

| कामाचे स्वरूप | पूर्ण कामांची संख्या/एकूण कामे |
|---|---|
| कंपार्टमेंट बंडिंग | ३०७६८५ हेक्टर/४६०३५७ हेक्टर |
| सलग समतल चर/ खोल सलग समतल चर | १८४६४.५७ हेक्टर/३४५७४.६३ हेक्टर |
| माती नाला बांध | १४३८ एकूण संख्येत/२११८ |
| साखळी सिमेंट नाला बांध | १४९५ एकूण संख्येत/४७६३ |
| सिमेंट नाला बांध दुरुस्ती | ६२६/९६९ |
| केटी वेअर दुरुस्ती | ६७/२१८ |
| पाझर तलाव दुरुस्ती | १०१/५८५ |
| पाझर तलाव | ३३/१३३ |
| केटी वेअर | ४३/१८८ |
| नाला खोलीकरण | ३१२९/४६५३ |
| गाळ काढणे | ३३४६/५५१७ |
| शेततळे | ३४८०/४८७३ |
| विहीर बोअरवेल पुनर्भरण | ८११९/११०३२ |
| रिचार्ज शाफ्ट | ६७९/१०८६ |

अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा व सनियंत्रण समितीदेखील स्थापन करण्यात आली आहे.

या अभियानांतर्गत पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरण व रुंदीकरण अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची दुरुस्ती, त्यांची क्षमता पुनर्स्थापित करणे, मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या क्षमतेचा प्रत्यक्ष वापर करणे, छोटे ओढे-नाले जोड प्रकल्प राबवणे, पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, पाणीवापर संस्था बळकट करणे, इत्यादी कामे हाती घेण्यात आली आहेत.



लातूर जिल्ह्यातील जलयुक्त कामामुळे झालेल्या पाणीसाठ्याचे पूजन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### आर्थिक नियोजन

जलयुक्त शिवार योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही कामे जेथे पाणीभरणाच्या सोयी नाहीत, तेथे नव्याने उभ्या करणे आणि जेथे सोयी आहेत, तेथे गाळ उपसणे अशा दोन्ही टप्प्यांत होत आहेत. विहीर, तलाव दुरुस्तीची कामेसुद्धा मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली आहेत. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडवणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाणीवापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुनरूज्जीवीकरण करणे, भूजल अधिनियम अंमलबजावणी, विकेंद्रित पाणी साठे निर्माण करणे, अस्तित्वात असलेल्या व निकामी झालेल्या जलस्रोतांची क्षमता पुनर्स्थापित करणे, पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जनजागृती करणे याप्रमाणे असून, या अभियानामध्ये शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजकांचा सहभाग मिळतो आहे. या उपक्रमांतर्गत पाच हजार गावे वर्षभरात टंचाईमुक्त करण्याचे ध्येय आहे.

### देखरेख यंत्रणा

या अभियानांतर्गत योजना सुरू असताना कामांचे समवर्ती मूल्यमापन जिल्हाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखालील यंत्रणेकडून करण्यात येत असून कामे पूर्ण झाल्यावर त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कामापूर्वीची व कामानंतरची परिस्थिती, पाणीसाठा याची माहिती आणि छायाचित्रे तसेच कामाच्या ठिकाणाचे अक्षांशरेखांश इत्यादी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे कुठलेही काम निवडून त्या ठिकाणी ते काम झाले आहे की नाही, हे पाहणारी स्वतंत्र यंत्रणा राज्य सरकारने विकसित केली आहे. एका ठिकाणी बसून संपूर्ण राज्यातील कामावर देखरेख ठेवता येईल, अशी यंत्रणा सरकारने निर्माण केलेली असल्याने देखरेख ठेवणे सोपे झाले आहे. सर्व कामांमध्ये चांगली गुणवत्ता व पारदर्शकता राहील यावरही कटाक्ष आहे.

### भावी योजना

या अभियानांतर्गत गाव निवडीच्या निकषानुसार (पाणलोट, कोरडवाहु शेती अभियान, टँकरग्रस्त गावे, अतिशोषित गावे, इत्यादी) यावर्षी (मार्च २०१६ पर्यंत) ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यापैकी किमान निम्या गावांमध्ये विविध कामांचा शुभारंभ दिनांक २६ जानेवारी २०१५ रोजी झाला आहे. याव्यतिरिक्त जलसंधारण विभागाने पुढील काही वर्षांकरिता खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

- विभागामार्फत राबवण्यात आलेल्या व राबवण्यात येत असलेल्या योजनांचे



एमआरएससीद्वारे मॅपिंग करणे/डाटाबेस तयार करणे.
- पूर्ण झालेल्या योजनांचा सिंचनाकरिता पूर्ण क्षमतेने वापर करणे.
- जलसंधारणाच्या अपूर्ण योजना पूर्ण करणे.
- राज्यातील वेगवेगळ्या प्रदेशातील स्थानिक गरजेनुसार आराखडा तयार करून त्यानुसार हे अभियान पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे.

या योजनेसाठी कर्मचारी संख्या अपुरी पडल्यास इंजिनिअरिंग कॉलेजच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची मानधन तत्त्वावर नियुक्ती केली जात आहे. या अभियानासाठी जिल्हा नियोजन समितीतील १० टक्के निधी राखून ठेवण्यासह जलयुक्त शिवार योजनेसाठी कामे घेतलेल्या कंत्राटदारांना पुढील पाच वर्षे त्या प्रकल्पाच्या देखरेखीची जबाबदारी सोपवण्यात येत आहे. तसेच विदर्भ, मराठवाडा येथील दुष्काळग्रस्त भागात एक लाख विहिरी उभारण्यात येतील, असे अनेक उपाय यात योजले आहेत. राज्याच्या जलसंपदेचा इष्टतम, समन्यायी व शाश्वत रीतीने विनियोग करण्यासाठी अद्ययावत तंत्रांचा वापर करण्यावर येणाऱ्या काळात भर देण्यात येणार आहे. जलसिंचन सुविधा पुरवून शेतकऱ्यांना आधार देण्याचा निर्धार शासनाचा आहे. शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, जुन्या प्रकल्पांचे नवीकरण, भूपृष्ठ जल व भूजल याचा संयुक्त वापर इत्यादींसारखी पावले उचलण्यात येत आहेत. जलसिंचन व्यवस्थापनातील शेतकऱ्यांचा सहभाग व सूक्ष्म जलसिंचनाचा वापर यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सूक्ष्म-जलसिंचन हे खात्रीशीर तंत्रज्ञान आहे. सिंचन क्षेत्रात शिस्त आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्या दृष्टीने राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यांतर्गत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य जलपरिषदेची तरतूद होती. २००६ ला कायदा अस्तित्वात आल्यापासून या परिषदेची एकदाही बैठक झालेली नव्हती. मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदा २०१५ मध्ये ही बैठक घेतली. सुमारे ९ वर्षांनी प्रथमच ही बैठक झाली. नदीखोरेनिहाय जलआराखडा तयार करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता आणि विविध घटकांसाठी आवश्यक पाणी या सर्वांचा एकत्रित विचार करून या जलआराखड्यांमुळे त्याचे योग्य नियोजन करणे शक्य होईल.

यातून २४८ कोटी रुपयांची कामे लोकसहभागातून होत आहेत. राज्य सरकारने या अभियानासाठी १००० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. सी. एस. आर. फंडातून होत असलेली कामे याहुन भिन्न आहेत. एल अँड टी, महिंद्रा अँड महिंद्रा, एलयूएल फाऊंडेशन, एशियन पेंट्स, हिंदुस्थान कोकाकोला, भारत फोर्ब्ज, जेएसडब्ल्यू, फोक्सवॅगन इंडिया प्रा.लि. यांच्यामार्फत सुमारे २०० च्या आसपास गावांत कामे सुरू आहेत. अदानी, रिलायन्स फाऊंडेशन, अंबुजा सिमेंट, जैन इरिगेशन, बिसलरी, आरसीएफ, एचएसबीसी, ॲक्सिस बँक फाऊंडेशन हेही या कामात सक्रिय योगदान देणार आहेत. सिद्धिविनायक ट्रस्ट आणि साईबाबा देवस्थान, शिर्डी यांनी प्रत्येकी ३४ कोटी रुपये यापूर्वीच प्रत्येक जिल्ह्यासाठी १-१ कोटीप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा केले आहेत.

❐ ❐

## जलयुक्त शिवार अभियान सद्य:स्थिती (१२ जून २०१५ पर्यंत)

| विभाग | एकूण गावे | एकूण कामे (पूर्ण झालेले/प्रगतिपथावर=एकूण ) | लोकसहभागातून झालेली गावे/कामे |
|---|---|---|---|
| नाशिक | ९४१ | १२५९१ + ७२८५ = १९८७६ | ६८२/७०४ |
| अमरावती | १३९६ | ६२४८ + ३२८६ = ९५३४ | ४६२/९३२ |
| नागपूर | १०७७ | ८४५६ + २७९४ = ११२५० | २८९/३८५ |
| पुणे | ९०३ | १७९०४+९५७५ = २७४७९ | ६३५/१०६४ |
| कोंकण | २०३ | ३४९१ + १३०२ = ४७९३ | ३८/७१ |
| औरंगाबाद | १६८२ | १५५४४ + १०६७८ = २६२२२ | ७३६/१०८१ |
| एकूण | ६२०२ | ६४२३४ + ३४३९० = ९९१५४ | २८४२/४२३७ |

मोबाईल अप्लिकेशनमार्फत प्रत्यक्ष झालेल्या कामांची स्थिती अशी पाहता येईल.....

**http:mrsac.maharashtra.gov.in/jalyukta**

● mapping activities ● select districts ● select tahsil ● select village ● mapped work ● view ● photo





International Day of Yoga
21 June
Yoga for Harmony & Peace

# योगसाधना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योगदिन' जाहीर केला. हा दिवस जगभरात उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातही या दिवशी ठिकठिकाणी योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले. आबालवृद्धांनी या योग शिबिरात सहभागी होऊन सुदृढ आरोग्याच्या दिशेने पाऊल टाकले. भारतीय परंपरेला या दिवशी जगाने जणू मान्यता दिली. महाराष्ट्रासह देशभरात झालेल्या योगदिनाची काही क्षणचित्रे...











नागपूर मध्यवर्ती कारागृह





# योग: मानव आणि निसर्ग यांच्यातील दुवा



भारतवर्षात निसर्गाप्रती आदरभाव व्यक्त करणे हे आमच्या अध्यात्माचे अभिन्न अंग आहे. आम्ही निसर्गकृपेला पवित्र मानतो. आज मी एका विषयावर सर्वांचे लक्ष वेधु की, आपण वातावरण बदलाबाबत बोलतो. सुदृढ आरोग्याच्या चर्चा करतो. मूलभूततेकडे परत वळण्याच्या गोष्टी करतो. त्या संदर्भात मी एक गोष्ट सांगू इच्छितो योग हा आमच्या प्राचीन परंपरेचा ठेवा आहे. योग हा मन आणि शरीर, विचार आणि कर्म, संयम आणि कार्यक्षमतेच्या एकात्मतेचा किंबहुना मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील दुवा आहे. आरोग्य आणि मानवकल्याणाचे हे मूर्त रूप आहे. केवळ व्यायाम म्हणून नव्हे तर विश्व आणि निसर्ग यांच्यात एक समन्वय निर्माण करणारे योग एक माध्यम आहे. आपल्या जीवनशैलीत परिवर्तन आणून आपल्यातील क्षमतांना जागृत करून सध्याच्या हवामान बदलाच्या लढाईस साहाय्य करू शकतो. आपण सर्व मिळून आंतरराष्ट्रीय योगदिवस सुरू करण्याच्या दिशेने काम करू. आपण सर्वजण एका ऐतिहासिक क्षणातून जात आहोत. प्रत्येक युग आपल्या वैशिष्ट्यांनी ओळखले जाते. आपल्यावर आलेल्या संकटाशी आपण कसा सामना केला यावरूनच प्रत्येक पिढी ओळखली जाते. आता आपल्यासमोरील आव्हानांना सामोरे जाण्याची जबाबदारी उचलली पाहिजे. पुढच्या वर्षी संयुक्त राष्ट्रसंघ ७० वर्षांचे होत आहे. आता आपणच आपल्याला विचारायला हवे की आपण ८० किंवा १०० वर्षांचे होईपर्यंत वाट बघायची का? मी हे मानतो की संयुक्त राष्ट्रासाठी पुढचे वर्ष ही एक संधी आहे.


**(संयुक्त राष्ट्रसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणातील संपादित भाग)**

# उपराजधानी बनली योगभूमी

पहाटे-पहाटे ढगाळ वातावरणाने आभाळ भरून आले होते. आता पाऊस धो-धो कोसळतो की काय? अशी परिस्थिती होती. मात्र दुर्दम्य इच्छाशक्ती असली की, प्रतिकूल परिस्थितीही पालटू शकते, हे या दिवशी पाहायला मिळाले. सकाळी पाच-साडेपाच वाजण्याच्या सुमारास योगसाधकांच्या गर्दीने यशवंत स्टेडिअम भरून गेले. भव्यदिव्य व्यासपीठ उभारले गेले होते. बाजुलाच योगाचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी सुरेख असे व्यासपीठ होते. जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह रामभाऊ खांडवे यांची व्यासपीठावरील उपस्थिती सर्वांना स्फूर्ती देत होती. श्रद्धा भारद्वाज यांच्या सूत्रसंचालनामुळे संपूर्ण वातावरण योगमय झाले होते. योगसाधक शिस्तबद्ध पद्धतीने अंतर ठेवून आसनस्थ झाले होते. पाहतापाहता स्टेडिअम फुलून गेले. ढगाने भरून गेलेले नभ हळूहळू सूर्यदर्शनासाठी सज्ज झाले होते. हा अनोखा 'योग' सूर्यदेवालाही का पाहता येऊ नये? असे नभाला वाटले असावे आणि सूर्यदेवानेही त्यास विनवणी केली असावी. नभ स्वच्छ होताच योगसाधकांमध्ये उत्साह संचारला. बरोबर साडेसहा वाजण्याच्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाले.

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू....' या मंत्राने गुरुस्तवन झाले. 'मानव जन्मामध्ये नराचा होण्या नारायण, करा हो नियमित योगासन' या गीताच्या पार्श्वभूमीवर शरीर- संचलनापासून सुरुवात झाली. त्यानंतर योगसाधकांनी ताडासन, वीरासन, उत्कटासन,कटीचक्रसन, गोमुखासन, जानुशिरासन ही योगासने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सादर केली.

**- मोहन राठोड**



### योग ही सांस्कृतिक परंपरा : मुख्यमंत्री

योग ही अशी साधना आहे, जी शरीराला आत्मबल तर देतेच, परंतु तणावमुक्तीही ठेवते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन संयुक्त राष्ट्रसंघाने योगदिन संपूर्ण जगात साजरा करण्याचा निर्णय जाहीर केला. संयुक्त राष्ट्रात योगाचा सन्मान झाल्यामुळे नागपूरकरांची मान उंचावली आहे. कारण जनार्दनस्वामी योगाभ्यास मंडळ गेल्या कित्येक वर्षांपासून योगप्रचाराचे कार्य करीत आहे. योग ही देशाची संस्कृती असून, निरामय मानवी आरोग्यासाठी भारतीय संस्कृतीने दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी यावेळी केले.

# आपली परंपरा आपला योग



**योगासने :** यातील मूळ शब्द योग व आसने. 'योग' हा शब्द मूळ संस्कृत धातू 'युज' म्हणजे जोडणे यापासून तयार झाला आहे. त्यात अनेक संकेत आहेत. जीवात्मा व परमात्मा यांचा योग, हा योग साधण्यासाठी चंचल असलेल्या मनावर विशेष नियंत्रण आणावे लागते; त्यास योग म्हणतात. 'चित्तवृत्तींचा निरोध' अशी योगाची व्याख्या करतात. चित्तवृत्तींच्या पूर्ण निग्रहाने सविकल्पक व निर्विकल्पक समाधी साधता येते. समाधी म्हणजेच योग होय. हे योग्याचे जीवनध्येय असते.



### योग; योगदर्शन

योगसाधनेसाठी शरीराची विशिष्ट प्रकारची स्थिती ठेवणे व त्यात सूख वाटणे म्हणजे विशेष आसन होय. म्हणून'स्थिरसुखं आसनम' (स्थिर व सुखात्मक शरीरस्थिती म्हणजे आसन) अशी आसनाची व्याख्या योगसूत्रात केली आहे. शुद्ध मन नसलेले शरीर, स्थिर बुद्धी नसलेले शरीर कोणतेही महत्त्वाचे कार्य यशस्वी करू शकणार नाही, स्वस्थ व व्याधिमुक्त शरीराशिवाय मनावर नियंत्रण आणता येणार नाही.



योगशास्त्रानुसार शरीर शुद्ध करण्याच्या प्रक्रियेसाठी शरीर ज्या विविध स्थितींमध्ये ठेवले जाते, त्यांना 'योगासने' म्हणतात. योगाची आठ अंगे सांगितली आहेत ती म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी होत. यास अष्टांगयोग म्हणजे आठ अंगे असलेला योग असे म्हणतात. सुखावह स्थिरपणाने (कोणतीही हालचाल न करता) व शांतचित्ताने एखाद्या विशिष्ट स्थितीत दीर्घकाल राहता आले, म्हणजे ते 'आसन' साध्य झाले, असे म्हणता येईल. तसेच कोणत्याही शारीरिक बैठकीत किंवा स्थितीत सुखावह व यातनाविरहित रीतीने मनुष्यास नित्याच्या दैनंदिन कार्यात व्यग्र व एकाग्र राहता येणे, हे आसनांच्या अभ्यासाने साधले पाहिजे. त्याकरिता एकूण शारीरिक स्वास्थ्य टिकून राहणे जरुरीचे आहे. शरीरातील विविध इंद्रिये व संस्था – उदा., श्वसन, रक्ताभिसरण, पचन, उत्सर्जन इ. तसेच स्नायु समूह, ज्ञानतंतू, मन यांसारखे घटक या सर्वांची कार्यक्षमता व परस्परसहनियमन यांचा विकास व्हावा लागतो व तो योगासनांच्या नित्य सरावातून साधता येतो.



योगासनांच्या विविध स्थितींमुळे–हालचालींमुळे पाठीचा कणा (मेरुदंड) आणि त्यातील पृष्ठवंशरज्जू अर्थात मज्जारज्जू–ज्ञानतंतू–मज्जापेशी यांच्यावर इष्ट परिणाम होतो.



योगासने साधारणपणे वयाच्या दहाव्या वर्षापासून मुलामुलींनी करण्यास प्रत्यवाय नाही. योगासने करण्यासाठी प्रातःकाल फार चांगला; तथापि सायंकाळीही ती करण्यास हरकत नाही.

Yoga for Harmony & Peace

योगासनांसाठी जागा शांत, स्वच्छ, हवेशीर व मनास प्रसन्न वाटेल अशीअसावी. आसने अनशापोटी शक्यतो करावीत. अथवा पेय घेतल्यास किमान अर्धा तास तरी जाऊ द्यावा, जेवणानंतर किमान चार तास जाऊ द्यावेत, मात्र आसनांनंतर अर्ध्या तासाने जेवण घेण्यास हरकत नाही. आसने करताना स्वच्छ, हलके, सैलसर व आवश्यक तेवढेच कपडे घालावेत इ. प्रकारचे नियम सर्वसामान्यपणे सांगितले जातात. विशिष्ट प्रकारच्या आजारात, व्याधिग्रस्त व्यक्तींनी,त्या त्या आजारात अपायकारक ठरणारी आसने करू नयेत. आसने करताना किंवा करून झाल्यावर श्वासाचा वेग वाढता कामा नये. घाम येऊ नये व दमल्यासारखे वाटू नये. उलट योगासने करून झाल्यावर व्यक्तीला शांत, प्रसन्न, उत्साही व आनंदी वाटले पाहिजे. योगासनांच्या अभ्यासाच्या प्रारंभी ती सावकाश व संथ गतीने करावीत.विशिष्ट आसन साध्य करण्यासाठी शरीराला झटके वा ताण देऊ नयेत. आसनांची आदर्श स्थिती साधेपर्यंत, विशेषतः लवचीकपणा येईपर्यंत, आसनांच्या मध्यंतरी अथवा प्रत्येक आसनानंतर थोडी थोडी विश्रांतीही घ्यावी. प्रत्येक व्यक्तीने आपल्याला झेपेल,त्याप्रमाणे एकेका आसनस्थितीचा काल व आवर्तन वाढविणे इष्ट व आरोग्यदृष्ट्या हिताचे असते.





**विपरीत शयनस्थितीतील (पोटावर झोपून करावयाची)** आसने

भुजंगासन, शलभासन, धनुरासन, नौकासन



**शयनस्थितीतील आसने :** पाठीवर झोपून ज्या आसनांचा प्रारंभ व शेवट केला जातो, अशांपैकी काही आसने – द्विपाद व उत्तानासन, विपरीत करणी, सर्वांगासान, मत्स्यासन, हलासन, पवनमुक्तासन, शवासन, पद्मासन, आकर्ण धनुरासन, वक्रासन, वज्रासन, पश्चिमोत्तानासन

**दंडस्थितीतील (उभ्या स्थितीतील) आसने**

वृक्षासन, वीरासन, तिकोणासन, शीर्षासन

आज भारतात व जगभरही योगाभ्यासाचे शास्त्रीय स्वरूप जाणण्याचे प्रयत्न चालू आहेत. आसनांची संख्या ८४ पासून ते तीनशे–चारशे पर्यंत सांगितली जाते. पण ती काही मूळ व प्रमुख आसनांचीच विविध उपांगे होत.



**(संदर्भ विश्वकोश)**

# महाराष्ट्रच प्रथम क्रमांकावर



**येणारा काळ हा महाराष्ट्राच्या उद्योगभरारीचा असेल. गेल्या सहा महिन्यांपासून मेक इन महाराष्ट्रासाठी आमची धडपड सुरू आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची गेल्या ५० वर्षांपासून महाराष्ट्र हीच पहिली पसंती राहिली आहे. यापुढेही ही घोडदौड कायम राहील. केंद्राची तसेच उद्योग आणि व्यावसायिक जगाची आम्हाला साथ लाभत आहे, महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्याला आगामी काळात उद्योग, व्यवसायाची संपन्नता अनुभवायला मिळेल. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची विशेष मुलाखत...**

प्रफुल्ल साळुंखे

**मेक इन महाराष्ट्र या सरकारचे ध्येय आहे. मेक इन महाराष्ट्रची वाटचाल कशी सुरू आहे.**

गेल्या सहा महिन्यात महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राने मोठी झेप घेतली आहे. भविष्यातल्या औद्योगिक भरभराटीची आम्ही पूर्वतयारी केली आहे. इतर राज्यांच्या तुलनेत उद्योगांसाठी महाराष्ट्रच योग्य कसा हे आम्ही उद्योगपतींच्या मनावर बिंबवण्यात यशस्वी झालो आहे. पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी अनेक परवाने लागायचे. आता या प्रक्रियेत सुलभता आणली आहे. ७५ परवान्यावरून आम्ही २५ परवाने केले आहेत. या परवान्यांची संख्या अजून कमी कशी करता येईल यावर काम करतोय.

लवकरच मुख्यमंत्री याबाबतची घोषणा करणार आहेत. पंतप्रधानांनी मेक इन इंडियाची घोषणा केली आहे. मेक इन महाराष्ट्राला आणखी गतिमान केल्याशिवाय मेक इन इंडियाचे स्वप्न साकार होणार नाही. त्यामुळे महाराष्ट्राला सर्व विदेश दौऱ्यात, मोठया गुंतवणूक निर्णयात आणि विदेशी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. परदेश दौऱ्यात अनेक मोठ्या कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीची तयारी दाखवली आहे. जर्मनी दौऱ्यात मर्सडीस बेंझच्या प्रकल्पाच्या अनेक तांत्रिक अडचणी आम्ही तत्काळ सोडवल्या आणि त्यांचे उत्पादन सुरू झाले. आयकिया ही जगातली सर्वात मोठी फर्निचर उत्पादक कंपनी महाराष्ट्रात उत्पादन सुरू करत आहे. मार्स अमेरिकन चॉकलेट कंपनी पुण्यातील खेडला येत आहे. यापूर्वी याभागात तीन ते चार मोठ्या चॉकलेट कंपन्या आहेत. पुणे आता चॉकलेट हब बनते आहे. संरक्षण विभागाला लागणारी सामग्री देशातच बनवावी हा निर्णय पंतप्रधानांनी जो घेतला आहे त्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होणार आहे.

**औद्योगिक क्षेत्र मुंबई, पुणे, नाशिकपर्यंतच मर्यादित होऊ नये यासाठी काय प्रयत्न सुरू आहेत?**

हा महत्त्वाचा भाग आहे. आम्ही विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्राच्या सर्व भागांवरही लक्ष केंद्रीत केले आहे. नागपूरच्या मिहान प्रकल्पाने गती घेतली आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात गुंतवणूक व्हावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबई, दिल्ली औद्योगिक कॅरिडोरमध्ये आम्ही आता औरंगाबादजवळील शेंद्रा बिडकीन औद्योगिक क्षेत्र विकसित केले. तेथे मोठे उद्योग येत आहेत. अमरावतीजवळ नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये टेक्सटाइल्स झोन सुरू केले आहे. तेथे मध्यम आणि मोठे असे आठ प्रकल्प आले आहेत. कापूस ते कापड या धोरणातून या ठिकाणी कापूस उत्पादक प्रदेशाला न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र,खान्देश या सर्व भागातील एमआयडीसीमधील अनेक बिनवापराच्या जागा ताब्यात घेऊन नव्या उद्योजकांना त्या ठिकाणी संधी दिली जाणार आहे.

**जगातले मोठे उद्योग महाराष्ट्रात यावेत यासाठी आता अमेरिका दौऱ्यावर जात आहात, या दौऱ्याकडून काय अपेक्षा ठेवता येईल ?**

होय. आमचा अमेरिका दौरा खूप महत्त्वपूर्ण असणार आहे. आम्ही जगातल्या मोठ्या कंपन्याशी चर्चा करणार आहोत. या प्रकल्पांना फक्त भेटी देणे नव्हे तर हे प्रकल्प महाराष्टात गुंतवणूक कशी करतील यावर आमचा भर राहणार आहे. विशेषता बोईंग आणि मायक्रोसॉफ्ट, जनरल इलेक्ट्रॉनिकबरोबर आम्ही बोलणी करणार आहोत. या दौऱ्यातून महाराष्ट्रात मोठया प्रमाणात गुंतवणुकीची अपेक्षा आहे.

मेक इन महाराष्ट्र

**मोठ्या उद्योगांवर भर आहे. पण लहान उद्योगांसाठी काय उपाययोजना केल्या जात आहेत?**

मोठे उद्योग आले तर त्यांना कच्चा माल आणि इतर सुटे भाग पुरवण्यासाठी लहान उद्योग उभे राहणारच आहेत. आम्ही या लहान आणि मध्यम उद्योगांसाठी स्वतंत्र लघुउद्योग संस्था स्थापन करतोय. या माध्यमातून नवीन उद्योजकांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे, उद्योग उभारताना सर्व प्रकारची मदत करणे, कौशल्य विकास, भांडवल उभारणी कशी करावी अशा अनेक बाबींची माहिती प्रशिक्षण आणि उद्योगपतींचा सल्ला या केंद्रामार्फत देण्यात येईल, अशी ही योजना आहे. जेणेकरून उद्योग उभा करताना नवीन उद्योजकांना अडचण येणार नाही. महाराष्ट्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमातून मोठया प्रमाणात उद्योग व्यवसायाचा कल असणारे तरुण बाहेर पडत असून त्यांना मोठ्या प्रमाणात लघुउद्योग सुरू करता यावे असे सरकारचे धोरण आहे.

**उद्योगाबरोबर आयटी उद्योगावर राज्यसरकारने लक्ष केंद्रित केले आहे, याबाबत काय सांगाल?**

होय, आम्ही आयटी उद्योगासाठी नवे आयटी धोरण जाहीर केले आहे. एक लाख कोटींच्या निर्यातीचे ध्येय आहे. दहा लाख तरुणांना या उद्योगामुळे रोजगार मिळणार आहे. आपण अजूनही कॉम्प्युटर हार्डवेअर आयात करतो. महाराष्ट्रात कॉम्प्युटर हार्डवेअर बनवणाऱ्या कंपन्या उभ्या राहाव्यात यासाठी प्रयत्न करतोय. मायोक्रोसॉफ्ट कंपनीशी करार होत आहे. महाराष्ट्रात आयटी क्षेत्राशी निगडित असलेल्या कुशल मनुष्यबळाची कमतरता नाही. मात्र या मुलांना रोजगारासाठी परदेशी जावे लागत आहेत. मात्र राज्यातच जर मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या आल्या तर येथेच रोजगारनिर्मिती होईल आणि राज्यातील मुलांना परराज्यात किंवा परदेशी नोकरीसाठी जावे लागणार नाही. राज्याला डाटा सेंटर करण्याचा आमचा उद्देश असून अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुकता दाखवली आहे.

**जगातल्या उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी यासाठी उद्योगजगाला काय विश्वास द्याल?**

महाराष्ट्राला मोठी औद्योगिक संस्कृती आहे. जमीन, पाणी, वीज यांची मुबलक उपलब्धता आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सुशिक्षित मनुष्यबळ येथे उपलब्ध आहे. तंत्रज्ञ आहेत. उदा. द्यायचे झाले तर महाराष्ट्रात दर वर्षी एक लाख विविध क्षेत्रातील अभियंते उत्तीर्ण होतात. १०० अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. ही ४०० विविध प्रशिक्षण संस्था आहेत. त्यामुळे मोठा प्रशिक्षित मनुष्यबळ महाराष्ट्रात उपलब्ध आहे. इंग्रजी भाषेची उत्तम जाण आणि संवादकौशल्य हे देशात महाराष्ट्रात अधिक आहे. याचा उद्योगांना मोठा फायदा होतो. अनेक ठिकाणी एमआयडीसीच्या जमिनींवर उद्योग उभे राहू शकले नव्हते. त्या जमिनी आम्ही परत घेतो आहे. त्या जमिनी नव्या उद्योगजकांना देतो आहे. महाराष्ट्र देशात उद्योगाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर राहील यासाठी जे जे शक्य आहे ते आम्ही करण्याचा प्रयत्न करतो आहे. आम्हाला निश्चितच यामध्ये यश येईल.



(लेखक हे आयबीएन-लोकमत वृत्तवाहिनीचे वरिष्ठ प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९९३०३६९२१८

एक दिवस मंत्र्यांसोबत



दारव्हा तालुक्यातील लाखखिंड या गावानजीक एका नालाबंधाऱ्याची पाहणी करताना महसूल राज्यमंत्री संजय राठोड

# विकासकामांवर सूक्ष्म नजर

**राज्याचे महसूल राज्यमंत्री संजय राठोड यांनी यवतमाळ जिल्ह्यामध्ये शाश्वत सिंचनासाठी कंबर कसली आहे. सध्या जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात कार्य सुरू असून मंत्र्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी सुरू केली आहे. जिल्ह्यातील त्यांच्या मॅरेथॉन दौऱ्याचा हा एक दिवस.**

मंगेश वरकड

यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल राज्यमंत्री संजय राठोड यांचा लोकराज्यसाठी 'एक दिवस मंत्र्यांसोबत' या सदरात लेख घेण्याचे ठरल्यानंतर आदल्या दिवशी मी त्यांना दूरध्वनीवरून वेळ मागितली. दुसऱ्या दिवशी सायंकाळी मुंबईला जायचे असल्याने त्यांनी सकाळी ८ वाजता कार्यालयात बोलावले. त्यांचे कार्यालय म्हणजे त्यांचे वर्षभरापूर्वीचे राहते घर. नव्या घरात राहायला गेल्यानंतर त्यांनी आपले जुने दोनमजली घर कार्यालय केले. पालकमंत्र्यांना भेटायचे असल्यास त्यांच्या या जुन्या घरी थांबा म्हणजे भेट हमखास होईलच, असा नियमच झाला आहे. कारण यवतमाळ येथे असताना आपल्या दैनंदिन कामकाजाची सुरुवात ते कार्यालयातूनच करतात. त्याचे कारणही तसेच आहे. ग्रामीण भागातील अनेकजण आपल्या समस्या घेऊन येथे आलेले असतात. त्यांना तसेच ताटकळत कसे ठेवायचे, हा त्यांचा यामागचा उद्देश. सामान्य नागरिकही 'भाऊ' भेटतीलच म्हणून थांबलेले असतात.

मी आठला पोहोचलो. कार्यालयात बऱ्यापैकी गर्दी होती. भेटणाऱ्यांची लगबग होती. प्रतीक्षालयात थांबलेल्यांना एक-एक करून आतमध्ये घेतले जात होते. मी पोहोचलो त्यावेळी एक वयोवृद्ध व्यक्ती पालकमंत्र्यांसमोर बसून होती. त्यांनी दिलेले निवेदन वाचतच 'बोला बावाजी काय म्हणता, काय अडचण आहे तुमची' पालकमंत्री विचारत होते. 'सायेब, म्हातारा माणूस मी, मले पेंन्सन भेटली तर लयं बरं होईन. या वयात कुठं फिरू मी, लय उपकार होईन तुमचे....

पालकमंत्र्यांनी त्यांच्या पेन्शनसाठी थेट तहसीलदाराशी जवळजवळ दहा मिनिटे संवाद साधला. बहुदा तो दारव्हा तालुक्यातील असावा. 'जा बावाजी मी तहसीलदाराशी बोललो ते येतील तुमच्याकडे, तुमच्या गावात, काळजी करू नका. काही अडचण असली तर फोन करा इथे यायचा त्रास घेऊ नका'. पालकमंत्र्यांच्या आपुलकीच्या या संभाषणाने चेहऱ्यावर समाधान घेऊन ती वयोवृद्ध व्यक्ती निघून गेली.


दरम्यान पुन्हा दुसरी व्यक्ती पालकमंत्र्यांसमोर येऊन बसली. त्या व्यक्तीने आणलेले निवेदन वाचण्यात पालकमंत्री पुन्हा मग्न झाले. कार्यालयात समस्या घेऊन येणाऱ्या व्यक्तींची गर्दी वाढतच होती.

सकाळी ९ वाजता मंत्रिमहोदय कार्यालयातून बाहेर पडतील, असे सांगितले होते. परंतु भेटणाऱ्यांची गर्दी आणि प्रत्येकाला दिला जात असलेला वेळ पाहता ते अशक्यच वाटत होते. भेटणारे एकामागूनएक कक्षात दाखल होत होते. आपल्या समस्या मांडत होते. पालकमंत्री त्यांचे म्हणणे आत्मीयतेने ऐकत त्यांच्याशी चर्चा करत होते. कधी तहसीलदारास, कधी उपविभागीय अधिकाऱ्यास तर कधी थेट आयुक्तास दूरध्वनी लागत होता. समस्येवर चर्चा होत होती. मार्ग काढला जात होता. एखाद्या मंत्र्यांकडे किंवा लोकप्रतिनिधींकडे नागरिकांची गर्दी का होते याचे गुपित या निमित्ताने कळत होते.

अनेक समस्या, प्रश्न सातत्याने ऐकून घेतल्यानंतर मंत्रिमहोदय दारव्हा तालुक्यातील लाखखिंड या गावाकडे निघाले. कार्यालयाच्या वरच्या मजल्यावरून खाली येतानाही घरात चहूबाजूला ठिकठिकाणी उभे असलेल्या नागरिकांना, कार्यकर्त्यांना नमस्कार करत कसे आहात, काही काम आहे का? लवकर आलो तर आज भेटू, नाही तर परवा या, असा संवाद साधत त्यांनी आपले वाहन गाठले.

यवतमाळपासून जवळपास ४० किलोमीटर अंतरावरील दारव्हा हे तालुक्याचे ठिकाण. गेल्या अनेक वर्षांपासून संजय राठोड यांचे या गावाशी आपुलकीचे संबंध आहेत. याच तालुक्यातील जलयुक्त शिवारच्या कामांची पाहणी करण्यासाठी आजचा दौरा होता. त्यांच्या मागोमाग कार्यालयाच्या वाहनाने मी जात होतो. जलयुक्त शिवारच्या निमित्ताने पालकमंत्र्यांनी शिरपूर पॅटर्नची अनेक कामे शिरपूर परिसरात जाऊन पाहिलेली होती. त्या पॅटर्नप्रमाणे जिल्ह्यात जलसंधारणाची कामे घेतल्यास निश्चितच त्याचा जिल्ह्याला फायदा होऊ शकतो, याची जाणीव त्यांना झाली होती. त्यामुळे तोच दृष्टिकोन समोर ठेवून कामे होत आहेत का? हे पाहण्यासाठी हा दौरा होता.

दारव्हा शहर ओलांडल्यानंतर जवळपास १० किलोमीटर अंतरावर लाखखिंड या गावानजीक एका सिमेंट नालाबंधाऱ्यावर सुरू असलेल्या खोलीकरणाच्या कामापाशी वाहन थांबले. मुख्य रस्त्याच्या बाजूला काही अंतरावर असलेल्या या नाल्याजवळ पूर्वीपासूनच काही कार्यकर्ते हजर होते. उन्हाचा कडाका होता. जिवाची काहिली होत होती. त्यात



कार्यकर्त्यांची गर्दी. येथे काही वेळ जाणार असे वाटत होते. मात्र पालकमंत्र्यांनी वाहनातून बाहेर पडल्यानंतर पायी चालत बंधारा गाठला. उन्हाचा बचाव करण्यासाठी काहीही डोक्यावर न घेता जवळपास अर्धा तास नाल्याचे अवलोकन झाले.

दिग्रस तालुक्यात मोख येथे सुरू असलेल्या कामांची पाहणी करायची होती. मुख्य रस्त्यापासून खूप अंतरावर, शेतांमधून आडवळणाचा रस्ता कापत आम्ही कामाच्या ठिकाणी पोहोचलो. जेसीबीद्वारे युद्धपातळीवर काम सुरू होते. नाल्यातून माती काढून बाजूला टाकली जात होती. या मातीचा मोठा खच बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूस जमा झाला होता. पालकमंत्री त्या मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन उभे राहिले. ढिगाऱ्यावरून खाली पाहिल्यानंतर पालकमंत्री उद्गारले 'वा! छान ! सुंदर काम आहे. असेच काम हवे आहे. आणखी जेसीबी लावा, याच वर्षी हे सर्व काम पूर्ण झाले पाहिजे'. या नाल्यावर पुढे आणखी बंधारे होत होते. तेथेही कामाने वेग पकडला होता. उन्हाची पर्वा न करता पायी चालतच दुसरा बंधारा गाठला आणि त्याचीही पाहणी झाली.

दरम्यान ऊन ओसरायला लागले होते. सायंकाळी पालकमंत्र्यांना रेल्वे गाठायची होती. विठाळा येथे एका शेतात उभारलेल्या छोट्या मंडपात गावकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर पालकमंत्री यवतमाळच्या दिशेने निघाले. सोबत मागच्या सिटवर मी बसलो होतो.



जलयुक्त शिवार अभियान अतिशय महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. यवतमाळ संवेदनशील जिल्हा आहे. या अभियानातून पाणी जमिनीत जिरवल्यास शेतकऱ्यांना एकापेक्षा जास्त पिके घेता येतील, त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. जिल्ह्यावर लागलेला कलंक पुसून काढण्यास मदत होईल, असे पालकमंत्री यावेळी सांगत होते. मी आणि सोबतच्या सहकाऱ्यांसोबत त्यांचे घर कधी आले उमगले नाही. मी उतरलो, त्यांचा निरोप घेतला, त्यांनी पुन्हा या असे सांगितले, मागेच असलेले कार्यालयाचे शासकीय वाहनही लगेच पोहोचले आणि आम्ही कार्यालयाकडे निघालो.

**संपर्क :** ०९४०४१४०६६१

# निर्धार स्वच्छतेचा




**नागपूर येथील स्वच्छतेची सप्तपदी या कार्यशाळेत उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. या वेळी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि नगरविकास विभागाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर उपस्थित होत्या.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारतची हाक दिली आणि त्यांच्या या हाकेला सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'स्वच्छ महाराष्ट्र'ची घोषणा केली. कोणतीही योजना किंवा अभियान राबवायचे अन् यशस्वी करावचे असेल तर प्रशासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आणि लोकसहभाग महत्त्वाचा असतो, हे ओळखून 'स्वच्छ महाराष्ट्र' अभियानाच्या नोडल सचिव मनिषा पाटणकर म्हैसकर यांनी 'सप्तपदी स्वच्छतेची' या कार्यक्रमाची आखणी केली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अगदी नगरपरिषदांच्या पातळीवरील अधिकारी व लोकप्रतिनिधींनाही या अनोख्या उपक्रमात सहभागी करून घेण्यास सुरुवात झाली. राज्यातील प्रत्येक विभागात त्यांनी स्वच्छतेच्या सप्तपदीवर कार्यशाळा घेणे सुरू केले.**

नागपूर येथील चिटणवीस सेंटर येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत नागपूर विभागाचा, स्वच्छतेचा संकल्प ही एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी राज्यातील शहरे स्मार्ट करण्याआगोदर ती शहरे स्वच्छ करण्याचा निर्धार सर्वांनी करावा. त्याचबरोबर स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छतेच्या सप्तपदीचे स्वप्न निश्चितपणे साकारण्यासाठी सर्वांनी संकल्प करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर प्रवीण दटके, नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, नगरपालिका प्रशासनाच्या आयुक्त तथा संचालक मीता राजीव लोचन आदी मान्यवर उपस्थित होते. नागपूर विभागातील महापौर, नगराध्यक्ष, महापालिका आयुक्त, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी यांचीही या कार्यशाळेस उपस्थिती होती. मुख्यमंत्री म्हणाले, शहरांनीही फक्त पायाभूत सुविधांच्या निर्मितीबाबत प्रयत्नशील राहण्यापेक्षा स्वच्छतेबाबत जागरूक राहावे.

स्वच्छता ही बहुआयामी बाब असल्याने त्याबाबतची कार्यवाही

## शपथ स्वच्छतेची (नागपूर)

महाराष्ट्र स्वच्छता अभियानामध्ये नागपूर शहराचा सक्रिय सहभाग राहणार आहे. येत्या पाच आठवड्यांमध्ये शहरातील स्वच्छतेवर अधिक भर देणार असून नागपूर शहर राज्यात आदर्श शहर राहील.

**– प्रवीण दटके, महापौर, नागपूर**

पहिल्यापासूनच स्वच्छतेची आवड आहे. सन २०१२ पासून जनतेची सेवा, समस्यांची सोडवणूक करत आहे. चंद्रपूर शहर संपूर्ण स्वच्छ करण्याचा माझा ध्यास आहे. तसेच स्वच्छ व सुंदर चंद्रपूर होणारच

**– राखी कंचर्लावार, महापौर, चंद्रपूर**

स्वच्छ व सुंदर वर्धा करण्याचा माझा मानस आहे.

**– त्रिवेणी कुत्तरमारे, नगराध्यक्ष, वर्धा**

२०१५ अखेरपर्यंत स्वच्छतेची प्रतिज्ञा करून संपूर्ण शहर स्वच्छ करणार आहे.

**– शोभाताई तडस, नगराध्यक्ष, देवळी**

स्वच्छतेचा संकल्प सुरूच ठेऊन तो पुर्णत्वास नेण्यासाठी संपूर्ण प्रयत्न करण्यात येईल.

**– मंगलाताई आत्राम, नगराध्यक्ष, राजुरा**

घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छ व सुंदर शहराचा संकल्प आहे.

**– रिता उराडे, नगराध्यक्षा, ब्रम्हपुरी**



**स्वच्छतेची शपथ घेताना**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान सप्तपदी स्वच्छतेची

केवळ शासकीय पातळीवर यशस्वी होणार नाही. त्यात लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधींसह सर्वांनी या अभियानाचे नेतृत्व करावयाचे आहे. त्याकरिता शपथ घेऊन स्वच्छतेच्या सप्तपदीचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले.

ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे अभियान एक लोकचळवळ व्हावी, देशात महाराष्ट्र राज्य पहिले कचरामुक्त राज्य व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. याकरिता सर्वांनी पुढाकार घेऊन अभियान यशस्वी करावे, असे सांगितले.

यावेळी महापौर प्रवीण दटके यांनी या अभियानात आपला सक्रिय सहभाग राहणार असून नागपूर शहर राज्यात आदर्श शहर राहील, असा संकल्प केला. नगरपालिका प्रशासनाच्या आयुक्त तथा संचालक मीता राजीव लोचन म्हणाल्या, प्रत्येक नगरपालिकेने आपला महाराष्ट्र, आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडायला हवी.

### कार्यशाळेत स्वच्छतेचा जागर

कार्यशाळेत नगर विकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर–म्हैसकर यांनी या अभियानात सर्वांनी झोकून देऊन कार्य करावे. अभियान यशस्वितेसाठी प्रयत्न, पॅशन आणि आत्मीयता हवी आहे. ती आपणासर्वांमध्ये आहे.

आपल्यातील ऊर्जेला तंत्रज्ञानाची साथ देऊन अभियान यशस्वितेसाठी सर्वांनी पुढे यावे. आपले शहर सुंदर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करून परिश्रम घेणे आवश्यक आहे.

# पुणे विभाग

'एक कदम स्वच्छता की ओर' असे म्हणत केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. केंद्र शासनाच्या प्रत्येक अभियानात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. म्हणूनच स्वच्छ भारत अभियानाच्या आवाहनाला प्रतिसाद देताना राज्यात आम्ही स्वच्छतेची सात पावले म्हणजेच सप्तपदी चालण्याचा निर्धार करत आहोत. असा वसा पुणे विभागीय स्वच्छतेचा संकल्प, सप्तपदी स्वच्छतेची या कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्रत्येकाने घेतला. पुणे विभागातील पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातून आलेल्या ५ महानगरपालिका आणि ४३ नगरपालिकांच्या पदाधिकारी आणि अधिकारी यांच्यासाठी ही कार्यशाळा व्यासपीठ उपलब्ध करून देणारी आणि स्वच्छतेसाठी एक वैचारिक मंथन करणारी ठरली. कचरा ही समस्या न मानता ती एक संधी आहे. आगामी काळात कचरा हा कच्चा माल म्हणून जास्त किमतीने विकला जाईल. त्यामुळे घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने नियोजन करावे, असे कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

नगरविकास राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांनी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधल्यामुळे, त्यांचे विचार ऐकून घेतल्यामुळे विभागातील पाचही जिल्ह्यांतून आलेल्या लोकप्रतिनिधी



**कोल्हापूर येथे स्वच्छता अभियानांतर्गत आयोजित स्वच्छतेची सप्तपदी कार्यशाळेत स्वच्छतेची शपथ घेताना लोकप्रतिनिधी.**

आणि अधिकाऱ्यांना ही कार्यशाळा अधिक भावली. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या रूपाने स्वच्छतेच्या चळवळीत सक्रिय सहभागी व्हा, असे सांगून राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांनी स्वच्छता ही थेट आरोग्याशी आणि आरोग्य हे थेट स्वच्छतेशी संबंधित असते, हे सूत्र मांडले.

'घर तेथे शौचालय' हा प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रत्येकाला स्वतः पासून सुरवात करायची आहे. स्वच्छतेचा केवळ संकल्प न करता त्यामध्ये सातत्य ठेवायचे आहे. तरच २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत संपूर्ण राज्य स्वच्छ करण्याचे हे अभियान यशस्वी होईल याकडे सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी लक्ष वेधले.

कागल नगरपालिकेने राबवलेल्या प्रकल्पांची प्रशंसा करून नगरपालिका प्रशासनाच्या संचालिका आणि आयुक्त श्रीमती मीता राजीव लोचन यांनी नगरपालिकांनी आपल्या कार्यक्षेत्रात पथदर्शी प्रकल्प हाती घेऊन गलिच्छ वस्तीत स्वच्छता मोहीम राबवावी. घंटागाडी दर्शक नकाशे, तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक आदी सुविधा राबवाव्यात. यासाठी मनुष्यबळ किंवा निधीचा प्रश्न नाही तर प्रश्न पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांचा मानसिकतेचा आहे, असे सांगून सर्वांनी नियोजन करून स्वच्छतेचा संकल्प करू या, अशी साद घातली. एकूणच लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी कार्यशाळेतच आपले गाव स्वच्छ करण्याचा संकल्प केल्याने ही कार्यशाळा फलद्रूप ठरली. शाहुमहाराजांच्या या नगरीत स्वच्छ महाराष्ट्र अभियानात पुणे विभाग राज्यात अव्वल करण्याचा वसा घेतल्यामुळे मंत्रिमहोदय आणि नगरविकास विभागाचे अधिकारी यांचा विश्वास सार्थ ठरेल, यात शंका नाही.

# नाशिक विभाग

नाशिक विभागातील कार्यशाळेत विभागातील पाच महानगरपालिकांचे महापौर व आयुक्त आणि ३८ नगरपालिकांचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी सहभागी झाले होते. सर्वांच्या दृष्टीने हा वेगळा अनुभव होता. प्रशासनाचा एखादा उपक्रम राबवताना आपल्याला सहभागी होण्याची संधी मिळते, विचार मांडण्याची संधी मिळते ही कल्पना उत्साह निर्माण करणारी होती. यामध्ये फक्त वक्त्याचे ऐकायचे नव्हते तर या अभियानात सहभागी होण्याचा एक संकल्पही करावयचा होता. त्यामुळे नेहमीच्या कार्यशाळेपेक्षा वेगळे वातावरण यावेळी होते.

पाहिल्या सत्रात नगर विकास विभागाच्या सहसचिव सीमा ढमढेरे यांनी कार्यशाळेच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केल्यानंतर विभागीय आयुक्त एकनाथ डवले यांनी नाशिक विभागात सुरू असलेल्या स्वच्छतेच्या अभियानाची माहिती दिली. या पुढील काळात 'स्वच्छतेच्या सप्तपदी'वर भर देण्याची सूचनाही त्यांनी या वेळी केली.

### थेट संवाद आणि कौतुकाची थाप

'सप्तपदी स्वच्छतेची' या कार्यक्रमाच्या पहिला सत्रानंतर नोडल सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर मॅडम व श्रीमती लोचन मॅडम यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकारी व महापौर यांच्याशी थेट संवाद साधला. अभियान राबवताना सुचलेल्या विविध कल्पना, येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या शंकांचे समाधान करून पुढील कामासाठी प्रोत्साहित केले.

**(मोहन राठोड, अनिल ठाकरे, संप्रदा बिडकर, नंदकुमार वाघमारे)**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

# शपथ स्वच्छतेची (पुणे)

२ ऑक्टोबरपूर्वी शहर स्वच्छ करणार. गावात २२० शौचालये आहेत. शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी अर्जवाटप करत आहोत.

**– मनिषा गावडे, नगराध्यक्षा, शिरूर**

नगरपालिकेच्या माध्यमातून जनतेला कचराकुंडी देण्याची योजना आहे, २०१६ पर्यंत शहर स्वच्छ, सुंदर व हागणदारीमुक्त करण्याचा संकल्प आम्ही करत आहोत.

**– शुभांगी बिरजे, नगराध्यक्षा, इचलकरंजी**

भूमिगत सांडपाणी यंत्रणा शहरात आहे. शहरात ९९.९९ टक्के शौचालये आहेत. एखाद दुसरे शौचालय बांधायची राहिली असतील, तर ते काम पूर्ण करून २ ऑक्टोबरपर्यंत ही मोहीम यशस्वी केली जाईल.

**– उज्वला तोष्णीवाल, नगराध्यक्षा, महाबळेश्वर**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची घोषणा होण्यापूर्वीच मलकापूर नगरपंचायतीने शौचालय बांधणीसाठी १० हजार रुपये अनुदानाची तरतूद केली आहे. ३० सप्टेंबरपूर्वी शहर स्वच्छ करण्याचा मनोदय आहे.

**– मनोहर शिंदे, उपनगराध्यक्ष, मलकापूर**

आष्टा नगरपालिका क्षेत्रात ९००० घरे आहेत. त्यापैकी फक्त ३९९ घरे शौचालय नसलेली आहेत. १५ डिसेंबर अखेर संपूर्ण आष्टा नगरपालिका हागणदारीमुक्त आणि शौचालययुक्त करणार आहे.

**– मंगलादेवी शिंदे, नगराध्यक्षा, आष्टा**

गटशौचालये व वैयक्तिक शौचालयांसाठी प्रयत्न केले जात आहे.  प्रत्येक नागरिकाला १२ हजार व १० हजार रुपये अनुदान देऊ.

**– भूषण गायकवाड, नगराध्यक्ष, वाई**



**नाशिक येथे स्वच्छता अभियानांतर्गत आयोजित स्वच्छतेची सप्तपदी कार्यशाळेत स्वच्छतेची शपथ घेताना लोकप्रतिनिधी.**

# शपथ स्वच्छतेची (नाशिक)

धुळे शहर हे कचरामुक्त व प्लॅस्टिकमुक्त करण्याच्या दिशेने पावले टाकू. शंभर टक्के हगणदारीमुक्तीचा मी निर्धार करत आहे.

**– जयश्री अहिरराव, महापौर, धुळे महानगरपालिका**

पुढील वर्षापर्यंत श्रीरामपूर शहर हगणदारीमुक्त करू. प्रत्येक घरात शौचालय बांधण्याचा व त्याच्या वापरासाठी जनजागृती करू.

**– राजश्री ससाणे, नगराध्यक्ष, श्रीरामपूर**

नंदुरबार शहर हे स्वच्छतेसाठी पुढाकार घेत आहे. या काळात शंभर टक्के शौचालयासाठी निर्धार करत आहे.

**– दीपक कटारिया, उपनगराध्यक्ष, नंदुरबार**

लोकसहभागाच्या जोरावर नाशिक विभागातील पाच महापालिका व ३८ नगरपालिकांमध्ये स्वच्छतेसंदर्भात कामे सुरू आहेत. येत्या काळात कम्युनिटी टॉयलेटच्या (सामुदायिक शौचालय) माध्यमातून विभाग स्वच्छतेत आघाडीवर राहील यासाठी कटिबद्ध राहु.

**– एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानात शासकीय योजनांचा लाभ घेत जास्तीत जास्त लोकांचा सहभाग  वाढवून ही लोकचळवळ करून शहर स्वच्छ ठेवू. आगामी नाशिक कुंभमेळा हा स्वच्छ व निर्मळ करण्याचा शब्द यावेळी देत आहे.

**– डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त, नाशिक महानगरपालिका**

# समाधानाचा सेतू

३० मे २०१५... वेळ सकाळी नऊची... मुंडले हायस्कूलजवळ लोकांची प्रचंड गर्दी. 'समाधान शिबिरा'च्या आगळ्यावेगळ्या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी शहरातील नागरिक मोठ्या संख्येने आले होते. विहित मुदतीत लोकांचे काम करून आपण समाधान का करू शकत नाही? असा मुख्यमंत्र्यांचा सवाल होता. या कल्पनेतूनच हे आयोजन होते. लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या समन्वयाने यशस्वी झालेला हा प्रयोग होता.

**दैनंदिन कामे वेळेत व्हावीत, अशी सर्व सामान्य लोकांची अपेक्षा असते. शासन बदलल्यानंतर ती अपेक्षा अधिक वाढत असते. समाधान शिबीर हा अभिनव उपक्रम स्तुत्य असून अल्प कालावधीत ४६४ तक्रारींचा निपटारा करण्यात आला. या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत असून यापुढे अशा स्वरूपाचे शिबिर नागपूर शहरामधील सहा व ग्रामीण भागातील सहा अशा बारा विधानसभा मतदार संघात येण्यात येणार आहे.**

मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांचे सकाळी ११ वाजता या कार्यक्रमासाठी आगमन झाले. समारंभस्थळी लावलेल्या स्टॉल्सना भेट देत ते व्यासपीठावर आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम होता. साहेब सात वर्षानंतर भूखंडाचे मागणीपत्र मिळाले, वंजारीनगर येथील योगेश जामकर मुख्यमंत्र्यांना सांगत होते. भूखंडाच्या मागणीपत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडे अनेकवेळा चकरा मारल्या, परंतु समाधान शिबिरामुळे चमत्कार झाला. हे सर्व स्वप्नवत वाटत आहे; अशी व्यथा कथन करत असतानाच त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. जामकरजी तुमच्या हितासाठीच हे शासन दारापर्यंत येत आहेत. आता कामे अडणार नाही. कामे वेगाने होतील; असा पाठीवर हात ठेवून मुख्यमंत्र्यांनी त्यांना धीर दिला.



योगेश जामदार हे वंजारीनगर पाण्याच्या टाकीजवळ राहतात. मौजा बाबुलखेडा येथे जयवंत को - ऑपरेटिव्ह सोसायटी येथे भूखंड आहे. २००४ साली त्यांनी तो नियमित करण्यासाठी अर्ज केला होता. २००८ साली अभिन्यास मंजूर केला. तेव्हापासून डिमांडसाठी ते सारखे चकरा मारत होते. समाधान शिबिरात त्यांनी तक्रार अर्ज दाखल केला. त्यांना टोकन मिळाले. कार्यक्रमाच्या दिवशी खुद्द मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांना डिमांड प्रदान करण्यात आले.

**मोहन राठोड**

मधुश्याम हाऊसिंग सोसायटीच्या भूखंडधारकांना १४ वर्षानंतर समाधान शिबिरात मागणीपत्र मिळाले. समाधान शिबीर लागले नसते तर आणखी कांही वर्षे आम्हाला खेटे मारावे लागले असते, मानेवाडा बेसा रोड येथे ही संस्था आहे. १९८५ मध्ये लेआऊट टाकण्यात आले. १९९४-९५ मध्ये नागरिकांना रजिस्ट्री करून मिळाली. २००१ मध्ये देवकाबाई सयाम, मधुकर वैरागडे, किसनाबाई वंजारी यांच्यासह इतरांनी भूखंड नियमित करण्यासाठी अर्ज केला होता. अनेक चकरा मारल्या, परंतु काम झाले नव्हते, अखेर





**नागपूरमधील समाधान शिबिरात सहभागी झालेले नागरिक**

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून आयोजित समाधान शिबिरात आम्हाला न्याय मिळाला, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

प्रशासन आणि जनता यामधील 'सेतू'चे काम हे समाधान शिबिर करील. यापुढे नागपूर शहर व जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदार संघात हे उपक्रम राबवण्यात येतील. जेणेकरून जनतेला न्याय मिळेल, यापुढे कालमर्यादेत काम पूर्ण होईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

## न्याय मिळाला

**माझ्या पतीचे २०११ मध्ये निधन झाले. दोन मुलांचे पालनपोषण कसे करायचे, या विवंचनेत मी होते. त्यावेळी संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अर्थसाहाय्य मिळण्यासाठी अर्ज केला. चार वर्षे झाली तरी मदत मिळत नव्हती. मी निराश झाले होते. पण समाधान शिबिराच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयातून फोन आला. आज मी या ठिकाणी आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धनादेश मिळाला. चार वर्षांचे काम क्षणार्धात झाले, अशी भावना सुधाताई दिलीप फोपटे यांनी व्यक्त केली.**

दैनंदिन गरजांसाठी लागणारी कागदपत्रे आपण वेळीच उपलब्ध करून दिली पाहिजेत. केवळ शिबिरातच नव्हे तर रोजच्या रोज कालमर्यादेत प्रशासनाने काम पूर्ण केले पाहिजे. समाधान शिबिर हे जनता आणि प्रशासनामधील दुवा आहे. यानिमित्त लोकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.



जनतेच्या तक्रारी व समस्यांना प्रशासन आणि शासन जबाबदार असणार आहे. नझूल कायद्याच्या अनुषंगाने विदर्भातील नागपूर व अमरावती हे दोन्ही विभाग नझूल पट्टे नूतनीकरणासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या प्रकियेतून वगळण्यात आले आहेत. पट्टे नूतनीकरणाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. प्रशासनात गतिमानता आणल्याशिवाय लोकांची कामे त्वरित होणार नाहीत. त्यासाठी संगणकीकरणाचा उपयोग कामकाजात आणला पाहिजे, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

समाधान शिबिरासाठी १९ ते २५ मे २०१५ दरम्यान महापालिका, नासुप्र, जिल्हाधिकारी, म्हाडा, भूमी अभिलेख या सर्व विभागांकडून एकूण ४६४ अर्ज प्राप्त झाले. यातील २४४ अर्ज निकाली काढण्यात आले.

प्रचंड उन्हात लोकांचा उदंड प्रतिसाद होता. प्रशासनाने चांगली व्यवस्था केली होती. पिण्याचे पाणी व कूलरही ठिकठिकाणी लावण्यात आले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गर्दी होती. येणाऱ्या प्रत्येक व्यक्तींचे समाधान करण्यात येत होते. एकंदरीत, हा अभिनव उपक्रम यशस्वी झाला, असेच म्हणावे लागेल.

## आपत्ती नियंत्रण कक्षातून...



मुंबई आणि परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे १९ जून रोजी सकाळपासून जनजीवन ठप्प झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित मंत्रालयातील आपत्ती नियंत्रण कक्षात धाव घेतली. कक्षातील अधिकाऱ्यांकडून पावसाची परिस्थिती, मुंबईतील वाहतुकीची माहिती घेतली. नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे व समुद्रकिनारी न जाण्याचे आवाहन केले. याशिवाय त्यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पावसाचा तसेच मंत्रालयात स्थापन करण्यात आलेली वायरलेस यंत्रणा, हॅम, हॉटलाइन याबाबतही आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या.

प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बृहन्मुंबई व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेने प्रवाशांना बस उपलब्ध करून द्याव्यात असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

## मराठी विश्वकोशाचा २० वा खंड प्रकाशित



मराठी विश्वकोशाच्या संहिता खंड २० चे प्रकाशन मुख्यमंत्र्याच्या हस्ते वर्षा निवासस्थानी करण्यात आले. 'महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा ठेवा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून होत आहे,' असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. यावेळी वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार, मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड, मराठी भाषा विभागाचे सचिव भूषण गगराणी उपस्थित होते.

मराठी विश्वकोशाची निर्मीती ही राज्यासाठी सन्मानाची आणि अभिमानाची बाब आहे. आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करण्याचे काम विश्वकोशाच्या माध्यमातून केले जात आहे. बऱ्याच वेळा अशा सांस्कृतिक ठेव्याचे वेळेवर जतन झाले नाही तर तो लुप्त होऊ शकतो. त्यामुळे या ठेव्याचे जतन करून ते भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम विश्वकोशाच्या माध्यमातून केले जात आहे. ही निश्चितच अभिनंदनीय बाब असून हे काम करीत असताना त्यात वेळोवेळी सुधारणादेखील झाल्या पाहिजेत. याकामी राज्य शासनातर्फे आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## तारांकित ★★★★★

### खेळाडू मुख्यमंत्री...



अलिबाग येथे मौजे नेहुली गावात दहा एकर जागेवर उभारण्यात आलेल्या अद्ययावत जिल्हा क्रीडा संकुलाचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नुकतेच झाले. या लोकार्पण सोहळ्याचे औचित्य साधून मुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुलाच्या तसेच पाणीपुरवठा योजनेच्या कोनशिलेचे अनावरण, तरणतलाव, टेनिसमैदानाचे उद्घाटन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी टेनिस खेळण्याचा आनंदही लुटला. यावेळी केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गिते, राज्याचे गृहनिर्माणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश महेता, शिक्षण तसेच क्रीडा व युवक कल्याणमंत्री विनोद तावडे आदी उपस्थित होते. 'महाराष्ट्रातील खेळाडूंमध्ये गुणवत्ता आहे, गरज आहे ती योग्य प्रशिक्षण, अचूक मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची, राज्यातील खेळाडूंची ही गरज राज्य शासन पूर्ण करेल आणि त्यातून ऑलिंपिक पदकविजेते खेळाडू घडतील', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# शाळाप्रवेशाचा आनंद सोहळा



यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शाळेचा पहिला दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक व्हावा यासाठी शालेय शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचे ठरविले होते. त्यानुसार त्यांनी मुंबईतल्या काही शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सकाळी ९ ते १० यावेळेत त्यांनी दादरच्या राजा शिवाजी विद्यालयाला भेट दिली. सकाळी ९ च्या सुमारास शालेय शिक्षणमंत्री दादरच्या शाळेत पोहोचले. शाळेच्या आवारात पोहोचल्यावर श्री. तावडे प्रवेशद्वाराजवळच थांबले. प्रवेशद्वारातून आत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे त्यांनी हसून स्वागत केले. त्यानंतर काही वेळाने ते शाळेतल्या विविध वर्गात गेले. वर्गात गेल्यावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाळांचे मुख्याध्यापक आणि वर्गशिक्षक यांनी मुलांची अभ्यासापलीकडची आवड कोणती आहे हे तपासावे असेही यावेळी सांगितले.

राजा शिवाजी विद्यालयात शालेय शिक्षण मंत्र्यांच्या हस्ते पाचवीतील मुलांना मोफत पुस्तकांचे वितरणही करण्यात आले. शाळेत मुलांचे स्वागत केल्यानंतर शाळेच्या त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळांतील विद्यार्थ्यांशी व्हर्च्युअल क्लासरूमच्या माध्यमातून संवाद साधला.

# १०-१२ वीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा

दहावी व बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्षापासून लगेचच फेरपरीक्षा घेण्यात येईल, असे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी जाहीर केले आहे. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी पुढील वर्षापासून मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात परीक्षा घेतली जाईल. या परीक्षेचा निकाल लगेच जून महिन्यामध्ये जाहीर करण्यात येईल. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षीचा निकाल चांगला लागला असून उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या वाढली आहे. राज्यात एकूण १४ लाख ३७ हजार ९२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून राज्यभरात ११ वीच्या प्रवेशासाठी १५ लाख ६८ हजार ६६४ जागा उपलब्ध आहेत. नापास विद्यार्थ्यांना पुढची दिशा ठरवता यावी यासाठी त्या त्या शाळांनी करिअरविषयक उपक्रम राबवावेत, अशा सूचना शिक्षणमंत्र्यांनी दिल्या आहेत.

## तारांकित ★★★★★

### सन्मान पंजाबचा...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांना संत नामदेव राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र आणि पंजाबमधील परस्परसंबंध अधिक वृद्धिंगत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात हा पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, सरहद संस्थेचे प्रमुख संजय नहार आदी उपस्थित होते. महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यामध्ये एक अतूट भावबंध आहे.



संत नामदेव यांच्या साहित्याने मराठीबरोबरच पंजाबी साहित्यही समृद्ध झाले आहे. त्यांच्या शिकवणीच्या आधारेच आजपर्यंत महाराष्ट्र आणि पंजाबची वाटचाल सुरू असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले. घुमानच्या साहित्य संमेलनामुळे महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील संबंधांना नवे आयाम प्राप्त झाले आहेत. या संबंधांना नवीन उंची प्राप्त करून देण्याचे प्रयत्न यापुढे शासनाच्या वतीने केले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

संत नामदेव यांच्या विचारांच्या पायावरच पंजाबची आजची प्रगती आधारित असल्याचे सांगत घुमान येथे संत नामदेव यांच्या नावे महाविद्यालय स्थापन करण्यात आले असून त्याच्या उद्घाटनाला श्री. फडणवीस यांनी यावे, असे निमंत्रण मुख्यमंत्री बादल यांनी दिले.

# राज्यात रेल्वेमार्ग उभारणीला गती



राज्यभरात रस्ते, पायाभूत सुविधा व रेल्वे जाळे निर्माण करण्यास सुरुवात झाली आहे. केंद्राकडून रेल्वेसाठी जरी तरतूद प्राप्त होत असली तरी महाराष्ट्र राज्यदेखील पुढील पाच वर्षांकरिता दहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. याअंतर्गत मुंबई शहर परिवहन प्रकल्प-३, वडसा-देसाईगंज-गडचिरोली रेल्वेमार्ग, वर्धा-नांदेड रेल्वे मार्ग आणि अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या उभारणी खर्चात ४० ते ५० टक्के निधी मंजुरीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**मुंबई शहर परिवहन प्रकल्प-३**

राज्याचा गतीने विकास होण्यासाठी आवश्यक असणारा मुंबई शहर परिवहन प्रकल्प-३ (MUTP-३) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प निश्चित वेळेत पूर्ण करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाच्या शुभारंभाप्रसंगी केले.

सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या उपस्थितीत जयगड पोर्ट जोडण्यासाठी JSW आणि कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांच्यामध्ये सवलत करारावर हस्ताक्षर तसेच मध्य रेल्वे आणि राज्य सरकारच्या एस.पी.व्ही साठी सामंजस्य करारावर हस्ताक्षर करण्यात आले. त्याचबरोबर मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन (MRVC) मध्ये ई-ऑफिसचा शुभारंभ करण्यात आला. मुंबई शहर परिवहन प्रकल्प-३ (MUTP-३) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची किंमत ११ हजार ४४० कोटी रुपये इतकी आहे. यावेळी परिवहन मंत्री दिवाकर रावते, उद्योगमंत्री सुभाष देसाई, खासदार रामदास आठवले, राजन विचारे, अरविंद सावंत, डॉ. श्रीकांत शिंदे आदी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षा आता पाचवी आणि आठवीत

शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी मध्ये व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये घेण्याचा निर्णय शालेय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी घेतला आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार आता प्राथमिक इ. १ली ते ५ वी, उच्च प्राथमिक इ. ६ वी ते ८ वी आणि माध्यमिक इयत्ता ९ वी ते १० वी असे तीन विभाग करण्यात आले आहेत. त्यानुसार शिष्यवृत्तीची परीक्षा इयत्ता ५ वी व ८ वी मध्ये होणे अपेक्षित आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये जर ही परीक्षा घेतली तर या वर्षीच्या विद्यार्थ्यांनी इ. ४ थी आणि इ. ७ वीची शिष्यवृत्ती परीक्षा यापूर्वीच दिली आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा यंदा परीक्षा द्यावी लागेल, म्हणून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षा घेणे योग्य होईल, असे श्री. तावडे यांनी सांगितले.

## तारांकित

### धावपटू ललिता बाबरचा गौरव

चीनमधील वुहान येथे झालेल्या २१ व्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेस या धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या महाराष्ट्राच्या ललिता बाबरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे.

सातारा जिल्ह्यातील माणसारख्या दुष्काळग्रस्त तालुक्यात जन्मलेल्या ललिताने मध्य रेल्वेत सेवा करतानाच जिद्द



आणि सातत्यपूर्ण तयारीने मिळविलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

वुहानमधील २१ व्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेतील देदीप्यमान कामगिरीमुळे ललिता पुढील वर्षी होणाऱ्या रिओ ऑलिम्पिकसाठी पात्र ठरली आहे. तसेच बीजिंग येथे होणाऱ्या विश्व ॲथलेटिक्स स्पर्धेसाठीही तिने प्रवेश निश्चित केला आहे. भविष्यातील स्पर्धांमध्ये अधिक चांगल्या कामगिरीसाठी मुख्यमंत्र्यांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्राची मानचिन्हे

## राज्यप्राणी शेकरू



शेकरू किंवा शेकरा (मराठी नामभेद: शेखरू; शास्त्रीय नाव: Ratufa indica, रॅटुफा इंडिका; इंग्रजी: Indian giant squirrel, इंडियन जायंट स्क्विअरल) ही खारींची एक प्रजात आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने भिमाशंकर, फणसाड, माहुली, वासोटा, आजोबा डोंगरात शेकरू आढळते. फळे व मधुरस हे त्याचे खाद्य आहे.

## राज्यफळ आंबा



आंबा या वृक्षाला महाराष्ट्र राज्य वृक्ष म्हणून मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील हापूस जातीच्या आंब्यांची जगभरात निर्यात होते. आंबा हे भारत आणि पाकिस्तान या देशाचे राष्ट्रीय फळ आहे, तर बांगलादेशाचे राष्ट्रीय झाड आहे.

## राज्यपक्षी हरोळी



हरियाल किंवा हरोळी (शास्त्रीय नाव: Treron phoenicoptera) या कबूतरवंशीय पक्षास हिरवा होला, हरोळी, यलो फुटेड् ग्रीन पिजन किंवा हिरव्या रंगाचे कबूतर या नावांनीही संबोधले जाते. शास्त्रीय नाव – 'ट्रेरॉन फोनिकॉप्टेरा'.

## राज्यफूल जारूळ



जारूळ (किंवा तामन, जारूळ बोंद्रा / बुंद्रा या नावांनीही परिचित) (शास्त्रीय नाव : Lagerstroemia) हा सपुष्प वृक्ष आहे. याचे फूल महाराष्ट्राचे राज्यपुष्प आहे. जारूळाचे फूल लालसर-जांभळ्या रंगामुळे ओळखले जाते. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात बहर येऊन एप्रिल-जून महिन्यात फुले फुलतात. भरपूर पाणी मिळणाऱ्या ठिकाणी याचे वृक्ष वाढते.

## तारांकित ★★★★★

### 'ब्ल्यू मॉरमॉन' राज्य फुलपाखरू

महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्राचे मानचिन्ह म्हणून राज्य प्राणी शेकरू, राज्य पक्षी हरियाल, राज्य वृक्ष आंबा व राज्य फूल जारूळ यापूर्वीच घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील राज्य फुलपाखरू म्हणून ब्ल्यू मॉरमॉन यास मान्यता देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी घोषित केले आहे. राज्य फुलपाखरू घोषित करणारे



महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दक्षिण भारतात आढळणाऱ्या आकाराने सर्वात मोठ्या असलेल्या सदर्न बर्डविंग या फुलपाखरानंतर महाराष्ट्रातील ब्ल्यू मॉरमॉन हे फुलपाखरू सर्वात मोठे फुलपाखरू आहे. ब्ल्यू मॉरमॉन हे मखमली रंगाचे व पंखावर निळ्या रंगाच्या चमकदार खुणा असलेले फुलपाखरू आहे. हे फुलपाखरू श्रीलंका आणि भारतातील पश्चिम घाट, दक्षिण भारत आणि पूर्व समुद्र किनारपट्टीवर आढळते. या फुलपाखराला महाराष्ट्रात निलपरी म्हणूनही संबोधले जाते. खाण्याचे लिंबू, माकड लिंबू, मेनका अशा वृक्षांच्या पानावर निलपरीची मादी अंडी घालते. हीच पाने खाऊन ही अळी मोठी होते. पावसाळा सुरु झाला की, निलपरी कमी पावसाच्या प्रदेशात स्थानिक स्थलांतर करते.

# घडणार आहेत स्मार्ट,




**नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे कार्यक्रमात स्मार्ट सिटी, अटल शहरी पुनर्निमाण व परिवर्तन (अमृत) आणि सर्वांसाठी घरे (हाऊसिंग फॉर ऑल) या नागरी योजनांचा शुभारंभप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

नागरी विकास, गृहनिर्माण आणि गरिबी निर्मूलन मंत्रालयाच्यावतीने विज्ञान भवनात आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांच्याहस्ते नुकतेच स्मार्ट सिटी, अटल शहरी पुनर्निमाण व परिवर्तन (अमृत) आणि सर्वांसाठी घरे (हाऊसिंग फॉर ऑल) या नागरी योजनांचा शुभारंभ करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही महत्वाकांक्षी योजना असून यामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

विज्ञान भवनात झालेल्या या कार्यक्रमामध्ये राज्यातील २४ महापौर, २६ नगराध्यक्ष, २५ महानगरपालिकांचे आयुक्त तसेच देशातील विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे नगर विकास व गृहनिर्माणमंत्री, एक लाख लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या ५०० शहरांचे महापौर आणि नगराध्यक्ष या कार्यक्रमास उपस्थित होते.

सर्वाधिक नागरीकरण होत असलेले महाराष्ट्र हे राज्य आहे. राज्यातील लोकसंख्या मोठ्या व मध्यम शहरात वस्तीस आहे. त्यामुळे या तीनही योजनांचा लाभ राज्याला होणार आहे. त्यामुळे राज्याच्या दृष्टीने ही बैठक अतिशय महत्त्वाची होती.

या बैठकीला राज्याच्यावतीने गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, गृहनिर्माण राज्यमंत्री रणजीत पाटील, मुख्यमंत्र्यांचे सचिव मिलिंद म्हैसकर व नागरी विकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यावेळी उपस्थित होत्या.

**महाराष्ट्र हे सर्वाधिक नागरीकरणाकडे अग्रेषित असणारे राज्य आहे. त्यामुळे देशातील कोणत्याही प्रमुख नागरी योजनांचा लाभ आणि त्याची प्रत्यक्ष सुरुवात राज्यात झाली नाही तर नवल! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच तीन महत्त्वाकांक्षी योजनांचे लोकार्पण राष्ट्राला केले. यामध्ये स्मार्ट सिटी मिशन, अटल शहरी पुनर्निमाण मिशन (अमृत) आणि सर्वांसाठी घरे या महत्त्वाकांक्षी योजनांचा समावेश आहे. नवी दिल्लीला झालेल्या या कार्यक्रमात पंतप्रधानांसोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील सहभागी झाले होते. या तीन योजनांचा लाभ राज्यातील बहुतेक छोट्या-मोठ्या शहराला आगामी काळात होणार आहे.**

# समृद्ध शहरे

**स्वप्नपूर्तता**

पंतप्रधानांनी या योजनेचे महत्त्व यावेळी मोजक्या शब्दात विशद केले. ते म्हणाले, नागरी भागातील गरिबांना घर देऊन त्यांच्या मनात जीवनाचे स्वप्न पूर्णत्वास आणण्याचा विश्वास सर्वांसाठी घरे या योजनेच्या माध्यमातून मिळणार आहे.

नागरी भागाच्या विकासाकरिता जनतेला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास केंद्र सरकार वचनबद्ध आहे. आता सुरू झालेल्या तीनही महत्त्वाकांक्षी योजनांमुळे नागरी भागांच्या समतोल विकासासाठी आणि नगरांच्या भविष्यातील नियोजनासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे.

शहरी विकासासाठी देशाला समर्पित करण्यात आलेल्या या तीन महत्त्वाकांक्षी योजनांबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. त्यात राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मत महत्त्वपूर्ण मानले जाणार आहे.

**अंमलबजावणीला पूर्ण स्वातंत्र्य**

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या तिन्ही प्रकल्पांची अंमलबजावणी करताना पूर्णपणे स्वातंत्र्य बहाल केले जाणार असून, त्याबाबत लवचीकतेचे धोरण अवलंबले जाईल. केंद्राच्या विशेष मंजुरीची पुर्वापार चालत आलेली परंपरा मोडीत काढण्यात आली आहे. महाराष्ट्रातील १० शहरांची स्मार्ट सिटीसाठी निवड होणार असून यामध्ये कोणत्या शहरांचा समावेश असेल याची घोषणा राज्य शासनाकडून लवकरच करण्यात येणार आहे.

**रोजगाराची मोठी संधी**

स्मार्ट शहरे आणि अमृत योजनेमुळे अनेक मध्यम आणि छोट्या आकाराच्या शहरांचा विकास होणार आहे. रोजगाराची संधी याच शहरात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार असल्यामुळे महानगरांकडे जाणारे लोंढे कमी होण्यास मदत होणार आहे. शिक्षण आणि प्राथमिक गरजांसाठी या शहरांना मोठ्या शहरांवर अवलंबून राहावे लागणार नाही त्यामुळे या छोट्या शहरांचा विकास होईलच, पण मोठ्या शहरांवर येणारा ताणही कमी होईल.

स्मार्ट शहरांच्या विकासात स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधी हे महत्त्वाचे घटक राहणार आहेत. त्यामुळे शहराच्या गरजा आणि मर्यादा ओळखून शहरांचा विकास होणार आहे. शहराची बलस्थाने काय आहेत, कोणत्या क्षेत्रात प्रगती केल्यास शहर नावारूपाला येईल आणि शहरातील अंगभूत गुणांना कसा वाव देता येईल, हे आता ठरवता येणार आहे.

**टीम लोकराज्य**

## अटल मिशन

पुढील पाच वर्षांत ५०० शहरांतील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचवणार

**माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने असणाऱ्या अटल मिशन अमृत योजनेमध्ये पुढील ५ वर्षांत ५०० शहरांतील पायाभूत सुविधांचा दर्जा वाढविण्यात येणार आहे. अत्याधुनिक सोयींनी युक्त या शहरांना आर्थिक विकास करण्याचा या योजनेतून प्रयत्न होणार आहे.**

## स्मार्ट सिटी मिशन

पुढील पाच वर्षांत
१०० स्मार्ट सिटी साकारणार

**स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत पुढील पाच वर्षांत देशात १०० स्मार्ट शहरांची उभारणी केली जाणार आहे. अस्तित्वात असणाऱ्या शहरांचा चेहरामोहरा बदलविला जाईल. नागरिकांना आवश्यक असणाऱ्या सर्व सुखसोई उपलब्ध केल्या जातील. उद्योग, व्यवसाय, वाहतूक, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमधील अद्ययावत बदल यामध्ये अपेक्षित आहे.**



## सर्वांसाठी घरे

पुढील सात वर्षांत झोपडपट्टीवासीय तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासांठी २ कोटी स्वस्त घरे बांधणार

**या योजनेंतर्गत प्रत्येक नागरी कुटुंबास घरे उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील सात वर्षांत झोपडपट्टीवासी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी २ कोटी स्वस्त घरे बांधली जाणार आहेत. सन २०२२ पर्यंत २ कोटी घरांच्या निर्मितीचे उद्दिष्टे योजनेत असून ज्यांचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपये व ३ ते ६ लाख रुपये आहे अशा आर्थिक गटातील नागरिकांना याचा फायदा मिळणार आहे.**

# सुसंवादी समन्वय

**अरबी समुद्राच्या एका टोकाला असलेला राजभवनचा निसर्गरम्य परिसर हा मुंबईकरांसाठी नेहमीच आकर्षणाचा विषय असतो. सुरक्षेच्या कारणांसाठी राजभवनामध्ये विनापरवानगी जाणे नेहमी शक्य होत नसले तरी पूर्व परवानगी घेऊन राजभवन परिसरात जाता येऊ शकते. अशीच एक संधी दि. २३ जून रोजी मिळाली. निमित्त होते राज्यपाल सी विद्यासागर राव यांच्यासोबत मुंबईतील विविध कार्यालयात काम करणाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्यांसमवेतची विशेष बैठक.**



**राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे स्वागत करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक.**

ही बैठक एका अर्थाने ऐतिहासिकच ठरली. कारण अशाप्रकारे राज्यपालांसमवेत पहिल्यांदाच जनसंपर्क अधिकाऱ्यांचा सुसंवाद घडत होता. या सुसंवादासाठी पुढाकार घेतला माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी.

बैठकीचा विषय होता आपत्ती व्यवस्थापन आणि विविध आस्थापनांची त्या अनुषंगाने तयारी. या बैठकीला एक पार्श्वभूमीही लाभली, ती म्हणजे दोन-तीन दिवस सतत कोसळत असलेला पाऊस आणि त्यामुळे मुंबईत ओढवलेली थोडीशी काळजी करण्यासारखी परिस्थिती.

बैठकीच्या प्रारंभी महासंचालक ओक यांनी, जनसंपर्क अधिकारी हे कोणत्याही संस्थेचा चेहरा असतात, असे नमूद करून, योग्य माहिती गतीने आणि वेळेवर पोहचवण्याची जबाबदारी जनसंपर्क अधिकाऱ्यांना प्रभावीरीत्या पार पाडावी लागते याकडे लक्ष वेधले. आपत्कालीन परिस्थितीमध्ये तर सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये सुसंवाद असणे आवश्यक असते व या दृष्टीने महासंचालनालय केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या बैठकीचे पावसाळ्यापूर्वी आयोजन करीत असते, अशी माहिती त्यांनी राज्यपालांना दिली. शासनाच्या विविध योजना, निर्णय, धोरणे यांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आता पारंपरिक माध्यमांसोबत ट्विटर, फेसबूक, व्हॉट्सअप या सारख्या आधुनिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर करत आहे. हा विभाग समाजमाध्यमांवर सक्रिय झाला असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणली.

जनसंपर्क अधिकारी करत असलेल्या कार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक कौतुक राज्यपालांनी केलं. योग्य माहिती पोहचवणेही जनसंपर्क अधिकाऱ्यांची मोठी जबाबदारी असून चुकीची माहिती दिली गेल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो. मुंबईला अतिरेक्यांच्या कारवायांपासून धोका नाकारता येत नाही. अशाप्रसंगी संयमाने चित्रीकरण करावे लागेल. कारण बरेचदा अशा घटनांचे 'लाईव्ह' चित्रीकरण पाहून अतिरेकी आपल्या रणनीती बदलवू शकतात याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे अशा वेळी माहिती देताना खूप सावधगिरी बाळगायला हवी. मुंबईत रेल्वेचे बरेच अपघात होतात. अशावेळी जखमींना तातडीने काही रक्तगटाची आवश्यकता असते. अशा रक्तगटांची माहिती तातडीने दूरचित्रवाणी आणि इतर वाहिन्यांवर दिली जावी या मुद्यावर राज्यपालांनी भर दिला.

राज्यपालांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय असलेल्या स्वच्छतेच्या प्रश्नासही त्यांनी या संवादाच्या वेळी हात घातला. ज्या ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर स्वच्छतेची कार्यवाही होत असेल त्यास व्यापक आणि ठळकरीत्या प्रसिद्धी देण्यात यावी. यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल, ही बाब त्यांनी निदर्शनास आणली.

महाराष्ट्रात काही ठिकाणी विशेषत्वाने दिसून येणारी स्त्रीपुरुष जननदरातील तफावत चिंताजनक असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. या अनुषंगाने माध्यमांनी जाणीवजागृती करण्यास पुढाकार घ्यायला हवा अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. सर्वसामान्य लोकांसाठी अधिकाधिक स्वच्छतागृहे / शौचालये बांधण्याची गरज आहे. अनेक स्वयंसेवी संस्था याकामी पुढाकार

घेण्याससुद्धा तयार आहेत. त्यांना आपण सुयोग्य अशी जागा उपलब्ध करुन द्यायला हवी. यासाठी माध्यमांनी पुढाकार घ्यायला हवा. हे महत्वाचं कार्य माध्यमे करू शकतात असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माध्यमांच्या सकारात्मक सूचना या नेहमीच स्वागतार्ह राहतील असेही त्यांनी सांगितले.

मा.राज्यपालांनी आपल्या छोट्याशा निवेदनात अतिशय महत्त्वाच्या बाबींचा ऊहापोह केला. सामाजिक प्रश्नांवरील त्यांचा अभ्यास आणि आस्था त्यातून दिसून आली.

राज्यपालांसमवेतच्या या सुसंवाद सत्रात मुंबईतील विविध आस्थापनामधील जनसंपर्क अधिकारी सहभागी झाले होते.

या सुसंवादाच्या आधी सर्व जनसंपर्क अधिकाऱ्यांना राजभवन परिसराचा छोटासा 'हेरिटेज टूर' घडवण्यात आला. यासाठी पुढाकार घेतला राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांनी. राजभवन परिसरातील प्रत्येक वास्तूंचा इतिहास, येथे घडलेले ऐतिहासिक प्रसंग आणि इतर महत्त्वाच्या गोष्टी त्यांनी यावेळी सांगितल्या. राजभवनातील देखण्या वास्तू, फर्निचर, पेंटिंग्ज, सजावट, प्राचीन मूर्ती, कलाकुसरीच्या वस्तू यामुळे नेत्राचे पारणे फिटले.

राजभवन परिसरात अनेक ऐतिहासिक इमारती आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा सोहोळा याच परिसरात झाला होता. अनेक राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे शपथविधी येथील दरबार हॉलने अनुभवले आहेत. दोनशे-अडीचशे वर्षे जुन्या असलेल्या येथील वास्तु अनेक महत्त्वाच्या घटनांच्या साक्षिदार ठरल्या आहेत. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह अनेक राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि इतर गणमान्य व्यक्ती राजभवनात येऊन गेले आहेत. अनेक महत्त्वाचे करारमदार इथे झाले आहेत. विद्यमान राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी नव्याने निर्माण केलेल्या 'सूर्योदय गॅलरी'मुळे अरबी समुद्राची भव्यता अनुभवता येते. सुंदर-सुंदर वृक्षराजीनी नटलेला, वेगवेगळ्या पक्षांचे वास्तव्य असलेला आणि समुद्राच्या गुढ-गंभीर गाजेने भारून गेलेला हा परिसर वेगळीच दिव्य अनुभूती देऊन गेला. हा परिसर सोडताना सर्वांची एकमुखी प्रतिक्रिया होती- सुखद चिरंतन स्मृतीत जाऊन बसलेला अविस्मरणीय दिवस.

**टीम लोकराज्य**

❑ ❑

# आपला वारसा – राजभवन महाराष्ट्राचे









# महानगरीचा सागरी पथ

**पायाभूत सुविधा भक्कम असतील तरच विकासाला गती येते. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यास सुरुवात केली आहे. मेट्रो प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, अरबी समुद्रातील शिवस्मारक या प्रकल्पांच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यात त्यांना सकारात्मक यश मिळाले.**

मुंबईतील किनारपट्टी रस्ता अर्थात कोस्टल रोडचा प्रश्न पर्यावरण खात्याच्या परवानगीशिवाय अडून पडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष प्रयत्न केल्याने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने त्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. या रस्त्यामुळे उपनगरीय लोकांचा प्रवास सुखकर होईल.

मुंबईच्या समुद्रकिनारी हा रस्ता हा बहुप्रतीक्षेत होता. या रस्त्यामुळे उपनगरीय वाहतुकीचा प्रश्न सोडवणाऱ्या किनारपट्टी रस्त्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पात सर्वात मोठा अडथळा असलेल्या रिक्लेमेशनवर (समुद्रभराव) अद्याप चर्चा सुरू आहे. किनारपट्टी रस्त्याच्या (कोस्टल रोड) निर्मितीदरम्यान ९१ हेक्टर जागेवर 'हरित पट्टा' उभारण्यात येणार आहे. या जागेचा बांधकाम व्यावसायिकांकडून दुरुपयोग होणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांना दिली आहे. ही जागा केवळ नागरिकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठीच वापरण्यात येणार आहे.

गेल्या तीन वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित होता. या प्रकल्पामुळे मुंबईतील वाहतुकीची समस्या कायमस्वरूपी सुटणार असल्याचा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. या प्रकल्पात १६० हेक्टर समुद्रभराव करावा लागणार आहे. समुद्रभरावामुळे भरती रेषा (हायटाइड लाइन) बदलण्यात येणार नाही.

## कसा असेल कोस्टल रोड?

नरिमन पॉईंट येथील आमदार निवासापासून सुरू होणारा हा ३५ ते ३६ किलोमीटरचा किनारपट्टीला लागून असलेला रस्ता कांदिवलीला जाऊन मिळणार आहे. या रस्त्यासाठी १० हजार कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. यामुळे शहरातील १८ ठिकाणी उपनगरांतील मार्गावर जाण्यासाठी रस्ते तयार होणार आहेत.

खार ते वर्सोवापर्यंत भुयारी रस्ता तयार करण्याचा प्रस्ताव आहे. सागरी सेतूमुळे किनारपट्टीवरील लोकांना सूर्यास्त आणि सूर्योदय पाहण्यास कोणताही अडथळा येणार नाही याचीही काळजी घेण्यात आली आहे. यासाठी समुद्रकिनारी लागून ४० ते ६० फुटांचा भाग हा लोकांना फिरण्यासाठी विकसित केला जाणार आहे. विशेष म्हणजे सागरी सेतूपेक्षा हा प्रकल्प कमी रकमेत होणार आहे.

**टीम लोकराज्य**

# विकास प्रकल्पांचा मार्ग मोकळा



**नरेंद्र मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यावर महाराष्ट्रातील ज्या विभागांचे निर्णय लक्षणीयरीत्या घेतले गेले त्यात केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाचा अग्रक्रम लागतो. गतवर्षी याच काळात मंजुरीच्या प्रतीक्षेत होते असे एकूण ८४ प्रकल्प या मंत्रालयाने मार्गी लावले आहेत. या मंत्रालयाचा विचार करता हा विक्रम मानला जात आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर केरळ व तमिळनाडूपासून जम्मू-काश्मीर व ओरिसा पर्यंत आणि गोव्यापासून बंगाल व ईशान्येकडील राज्यांमधील अनेक प्रकल्पही पर्यावरण मंत्रालयाने मंजुरीच्या जाचातून सोडविल्याचे दिसते. दिल्लीतील जोरबाग रस्त्यावरील पर्यावरण भवनातील अनेक वर्षांचे परवाना राज संपविण्याचा निर्धार करून या मंत्रालयाची सूत्रे स्वीकारलेले केंद्रीय वन व पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी वर्षभरात पहिले ठाम पाऊल टाकले आहे.**

## निवेदिता मदाने-वैशंपायन

केवळ केंद्राची पर्यावरण वा वनखात्याची परवानगी नाही म्हणून गेली अनेक वर्षे रखडलेल्या राज्यातील किमान ३५ प्रकल्पांना या मंत्रालयाने गेल्या वर्षभरातच अंतिम परवानगी दिली आहे. यात अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचा भव्य पुतळा व स्मारक उभारणे, बहुचर्चित कोस्टल रोड अर्थात किनारपट्टी रस्ता, रायगड जिल्ह्यातील पयार्वरण मंजुरीसाठी अडकलेली स्वान योजना, नवी मुंबई विमानतळ तसेच अमरावतीच्या बेलोरा विमानतळाबाबतचे प्रस्ताव मंजूर केले आहेत.

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टपासून जाणाऱ्या रेल्वेमार्गाचे दुपदरीकरण व अभयारण्यांच्या सीमांची निश्चिती यासह पेडर रस्त्यावरील पुल, सोलापूर-येडशी या राष्ट्रीय राजमार्ग-९ चे चौपदरीकरण, राष्ट्रीय राजमार्ग-५० च्या पुण्याजवळील पट्ट्याच्या चौपदरीकरणाला वनविभागाची मंजुरी, तसेच नाशिक-पुणे प्रवास अधिक कमी कालावधीत होण्यासाठी आवश्यक असलेले खेड-सिन्नर रस्त्याचे चौपदरीकरण आदी अनेक प्रकल्पांचा यात समावेश आहे. मंत्रालयाच्या संकेतस्थळावर याची माहिती आहे.

आगामी काळात राज्यातील जे प्रकल्प पर्यावरण खात्याने मंजुरीसाठी अग्रक्रमावर घेतले आहेत त्यात पुणे व गोरेवाडा, नागपूर येथील झूलॉजिकल पार्क व वन्यजीव संशोधन केंद्रांच्या आराखड्यांना मंजुरी, औरंगाबाद महापालिकेचे प्रस्तावित प्राणीसंग्रहालय, जायकवाडी अभयारण्य, उमरेड, पैनगंगा, मेळघाट, सागरेश्वर, कळसूबाई आदी १५ प्रकल्पांचे प्रस्ताव छाननी करून तपासणी करणे आदी प्रकल्पांचा समावेश आहे.

पर्यावरण मंत्रालयाकडून मिळणाऱ्या परवानग्यांची गती वाढल्याची जी प्रतिक्रिया अनेक राज्यांकडून दिल्लीत ऐकायला मिळते त्यामागची ठळक कारणे जावडेकर यांनी सांगितली. ते म्हणतात : पर्यावरण मंत्रालयाने अन्य मंत्रालयाशी व राज्यांशीही चर्चा व विचारविनिमय करूनच पुढे गेले पाहिजे. या मंत्रालयाकडे कळीच्या मुद्द्यांच्या व प्रकल्पांच्या परवानग्या असतात म्हणून त्याचे एक स्वतंत्र संस्थान किंवा बेट होऊ नये या विचाराने आपण विविध प्रस्तावांकडे पाहतो. राज्यातील जे प्रकल्प गेल्या वर्षभरात मंजूर केले गेले त्यातील बहुतांश प्रकल्प १ ते १० वर्षे केवळ वन व पर्यावरण मंत्रालयाच्या परवानगीसाठी रखडले होते. यापूर्वी या मंत्रालयातर्फे राज्यांशी संपर्क कसा होत असे तर चक्क पोस्टाने ही पद्धत मी तडकाफडकी बंद केली नाही. मी अधिकाऱ्यांना सांगितले की, पोस्टाद्वारे तर संपर्क ठेवाच पण ई-मेल व हाताशी असलेल्या दूरध्वनीचाही वापर वाढवा. संबंधितांशी थेट संपर्क साधा. रखडलेल्या परवानग्यांसाठी आमच्या मंत्रालयाने संबंधितांना समोरासमोर बसवून चर्चा सुरू केली त्यातूनही कित्येक अडकलेले पेच सुटले.

(लेखिका या नवी दिल्ली येथे मुक्त पत्रकार आहेत.)
**संपर्क :** ०९९६८४११३९१

# पैठणीचे वैभव

**भारतातील अभिजात हस्तकलेचा उत्तम नमुना आणि महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येवल्याच्या पैठणीचे आकर्षण बदलत्या काळातसुद्धा तसूभरही कमी झालेले नाही. अनेक 'फॅशन ट्रेंड' आले आणि गेले मात्र नवतरुणींपासून ते आजीबाईंपर्यंत सर्वांचेच पैठणीप्रेम आजही कायम आहे. किंबहुना, नव्या फॅशन ट्रेंडमध्ये विविध वस्त्रप्रावरणांच्या महामालिकेत पैठणीचा तोरा अजूनही टिकून आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला हे पैठणीचे माहेरघर. सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त लाखो भाविक देश-विदेशातून नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येतात, त्यातील अनेकजण पैठणीसाठी वाट वाकडी करून हमखास येवल्याला भेट देतात अन् मनपसंत पैठणीची खरेदी करतात.**



किशोर गांगुर्डे

भरजरी वस्त्रकलेचा एक उत्कृष्ट पारंपरिक प्रकार म्हणून पैठणी ओळखली जाते. साधारणपणे १७व्या शतकात पैठण येथील पैठणी विणणाऱ्या काही कुशल कारागिरांना येवल्यातील व्यापाऱ्यांनी येवल्यात आणून त्यांच्याकडून पैठणीचे उत्पादन सुरू केले. तेव्हापासून येवल्यात पैठणीचे उत्पादन सुरू झाले. पैठणी या साडीप्रकाराचे मूळ जरी पैठणमध्ये असले तरी या पैठणीची जोपासना केली ती येवलेकरांनी.

येवल्यात आज अंदाजे साडेतीन हजारच्या आसपास कारागीर आहेत, जे आपल्या हस्तकौशल्याने अप्रतिम, देखण्या अशा पैठणी निर्मितीच्या कामात अहोरात्र व्यस्त असतात. येवल्यातील विणकरांनी आपल्या कलाकुसरीने, कौशल्याने पैठणीला सातासमुद्रापार नेले. आपल्या कलाकुसरीच्या कौशल्यातून या विणकरांनी पैठणीची श्रीमंती आणि उंची वाढवली. इथले पैठणी उत्पादक शांतीलालसा भांडगे यांना गेल्या वर्षी राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या परिवारात उत्कृष्ट पैठणीसाठी केंद्र सरकारकडून प्रदान केलेला हा सलग पाचवा पुरस्कार.

आज पैठणीमध्ये अनेक प्रकार आपल्याला पाहायला मिळतात. सेमी पैठणी, सिंगल पदर, डबलपदर, टिश्यू पदर आणि रिच पदर असे पैठणीचे प्रकार असून त्याशिवाय पदर व काठ यांच्या विशिष्ट नक्षीकामानुसार बॉक्स पैठणी, कडीयल पैठणी, डबल मुनिया, ट्रिपल मुनिया, पोपट ब्रॉकेट, मोर ब्रॉकेट इत्यादी मुनिया ब्रॉकेड व ब्रॉकेड असे वर्गीकरण केलेल्या पैठणींनादेखील मोठी पसंती आहे. पैठणीच्या पदरावरच पैठणीची पसंती बहुतांशी ठरलेली असते. संपूर्ण जरीचा पदर, रुंद काठ आणि त्यावर दोन्ही बाजूंनी एकसारखीच आकर्षक वेलबुटी, नक्षी आणि रंगसंगती पाहिल्यानंतर प्रत्येकीलाच ही पैठणी घेण्याचा मोह झाल्याशिवाय राहवत नाही

पैठणीच्या साड्या साधारणत: चार ते पाच हजारांपासून सुरू होऊन त्यांची किंमत पुढे दोन-तीन लाखांपेक्षा अधिक असू शकते. पैठणी बनविण्यासाठी आवश्यक असलेले रेशीम बंगळुरु येथून तर सोने व चांदीची 'जर' गुजरातमधून मागवली जाते. रंग आणि वैशिष्ट्यपूर्ण नक्षीतूनच आकर्षक पैठणी आकाराला येते. साधारणपणे मूळ रंग आणि दुसरा काठावरचा रंग असे दोन रंग पैठणीचे असतात. तर साधारणपणे पोफळी, लाल, फिकट जांभळा, गडद जांभळा, निळा, किरमिजी तांबडा, मोती अशा विविध रंगात पैठणी विणली जाते. अलीकडे या रंगसंगतीतदेखील विविधता आली असून त्यामुळे पैठणीचे सौंदर्य अधिकच खुलले आहे.

येवला शहरातील पैठणीची बाजारपेठ नेहमीच गजबजलेली दिसते. शहरातील टिळक मैदान आणि कापसे गल्लीसह येवल्यातील



पैठणी पर्यटन केंद्र पैठणीच्या चाहत्यांच्या गर्दीने नेहमीच हाऊसफुल्ल असते. पैठणीच्या विविध प्रकारांतील नक्षीकामासाठी इतकी अप्रतिम कलाकुसर पैठणी उत्पादक नेहमीच तयार करत असून ग्राहकांसाठी ती आवडत आहेत. शिर्डी, सप्तशृंगीगड, नांदूरमध्यमेश्वर किंवा नाशिक-त्र्यंबकेश्वरला येणारे भाविक येवल्यात हमखास येऊन येवल्यात पैठणी खरेदीचा आनंद लुटतात. पैठणीपासून कुर्ता ड्रेस मटेरियल, पर्सेस, ड्रेसेस लवकरच येथे उपलब्ध होणार आहेत. अलीकडच्या काळात दक्षिणेतील पर्यटकांचा येवल्यात ओघ वाढला असून पैठणीशिवाय त्यांना लागणारी इतर वस्त्रप्रावरणेदेखील येवल्यात उपलब्ध होऊ लागली आहेत.

प्रत्येक स्त्रीच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या आणि तिचे रूप खुलविणाऱ्या पैठणीमुळे येवल्याची ख्याती सातासमुद्रापार पोहोचली आहे. कुंभमेळ्याचा आनंद लुटल्यानंतर त्यात भर घालण्यासाठी पैठणीची खरेदी करायला खरेच आता येवल्यात जायलाच हवे.

संपर्क: ०९९८७१७६४००

## ‘पैठणी ते पर्यटन’ : येवला पैठणी पर्यटन केंद्र

येवला येथील पैठणीचे सर्वदूर पसरलेले आकर्षण पाहता पैठणी तयार करण्याच्या पद्धती पर्यटकांना ‘लाइव्ह’ पाहता याव्यात आणि येथील कारागिरांनी तयार केलेल्या दर्जेदार पैठणींचे मार्केटिंग व विक्री करण्यासाठी येवला पैठणी पर्यटन केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. औरंगाबाद-नाशिक महामार्गावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने सुमारे ४८०० चौरस मीटर क्षेत्रात हे भव्य पैठणी पर्यटन केंद्र तयार करण्यात आले आहे. पैठणीचा इतिहास, हातमागावर सूत विणण्यापासून ते पैठणी बाजारात विक्रीस येईपर्यंतचा प्रवास अशा विविध गोष्टींचे प्रदर्शन या केंद्रात मांडण्यात आले आहे.

याच केंद्रांतर्गत विणकर-कारागिरांचा एक उद्योगसमूह (क्लस्टर) तयार करण्यात आला असून त्यात ३७८ उत्पादकांची आणि अडीच हजारांपेक्षा अधिक कारागिरांची नोंदणी करण्यात आली आहे. विणकरांनी तयार केलेल्या पैठणीचे मार्केटिंग आणि विक्री या केंद्रामार्फत करण्यात येत आहे. पर्यटकांचा या केंद्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विणकरांकडून पर्यटन केंद्रात विक्रीसाठी आणलेल्या पैठणींच्या मालाची गुणवत्ता, लांबी-रुंदी, वापरलेल्या साहित्याचा दर्जा आदी तपासून त्याच्या गुणवत्तेची खात्री पटल्यावरच ती विक्रीसाठी येथे ठेवली जाते. केंद्रात विणकरांकडून थेट विक्रीसाठी पैठणी येत असल्याने किंमतीलाही ती परवडण्यासारखी असते, असे या केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. विक्रम गायकवाड यांनी सांगितले.



# अभेद्य आणि दुर्गम

पठार, घाटमाथा आणि कोकण हे महाराष्ट्राचे प्रमुख भौगोलिक भाग असले तरीही या सर्व विभागाचा उल्लेख सह्याद्री म्हणूनच केला जातो. महाराष्ट्राच्या उत्तरेकडील सह्याद्रीच्या विभागात डोंगरी किल्ल्यांची संख्या जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या भागात असलेल्या लांबचलांब डोंगररांगा आणि त्यावरील गिरिशिखरे. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील उत्तुंग किल्ल्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. या परिसरातील किल्ल्यांवर गिरिभ्रमण करणे म्हणजे गिर्यारोहकांच्या दृष्टीने एक मोठे आव्हान असते. महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला साल्हेर हा नाशिक जिल्ह्यातील बागलाण या तालुक्यात आहे. कळसुबाई या सर्वात उंच शिखरानंतर दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर म्हणजे साल्हेर किल्ला. सह्याद्रीची मुख्य रांग ही नाशिक जिल्ह्याच्या वायव्य आणि पश्चिम दिशेला पसरलेली दिसते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून पूर्वेला सह्याद्रीच्याच काही शाखा पसरलेल्या आहेत. सातमाळ डोंगररांग ही ऐतिहासिकदृष्ट्या सर्वात महत्त्वाची आणि मोठी डोंगररांग. नाशिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात सह्याद्रीच्या मुख्य रांगेवरील हातगड या किल्ल्यापासून सुरू होणारी सातमाळ रांग चांदवड या गावापर्यंत अखंड पसरत गेली आहे. सातमाळ रांगेवर पहिला किल्ला हातगड असून पुढे अचला, अहिवंत,

**त्र्यंबकेश्वर परिसरात भास्करगड, अंजनेरी, हर्षगड, त्र्यंबकगड, भंडारदुर्ग, असे शिवपूर्वकालीन दुर्ग वसलेले आहेत. या डोंगररांगेला त्र्यंबकरांग असेच नाव आहे. दुर्गमता हे या किल्ल्यांचे प्रमुख लक्षण मानले जाते. दुर्गमता ही त्या किल्ल्याच्या परिसराची आणि प्रत्यक्ष त्या किल्ल्याचीही आहे. असे दुर्गम किल्ले नाशिक परिसरातील बागलाण व पठारी भागातही पाहायला मिळतात.**

मार्कंड्या, रवळ्या, जवळ्या, धोडप, कांचना, कोळदेहेर, राजदेहेर या सारखे अनेक दुर्ग या रांगेवर उभे आहेत. चांदवड हा सातमाळ रांगेतील सर्वात उंच किल्ला असून इतरही किल्ले हे १००० मी. पेक्षा जास्त उंचीचे आहेत. सातमाळ रांगेलाच समांतर अशा सैलबरी व डोलबारी या दोन रांगा पसरलेल्या असून महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला साल्हेर याच रांगेत आहे. साल्हेर-मुल्हेर, हारगड, सालोटा, चौल्हेर, मांगी-तुंगी, रतनगड हे किल्ले सैलबरी व डोलबारी रांगेत म्हणजे सातमाळ रांगेच्या उत्तरेला आहेत.

## किल्ल्यांची उंची

नाशिक परिसरातील किल्ल्यांची उंची ही कोकणातील व घाटमाथ्यावरील इतर किल्ल्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे या किल्ल्यांवर सहजासहजी पोहोचता येत नाही. हे सर्व किल्ले शिवपूर्व काळापासून अस्तित्वात होते. इ.स. च्या १२ ते १३ व्या शतकापासून या किल्ल्यांचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात पाहायला मिळतात. हे किल्ले नुसतेच उंच नसून किल्ल्यांवर मोठ्या प्रमाणावर बांधकामे केलेली आढळून येतात. यादव काळापासून ते इंग्रजांच्या कालखंडापर्यंत अनेक राजसत्तांनी या किल्ल्यांवर वेगवेगळ्या काळात बांधकामे केली. सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम हे मुल्हेर, हारगड व मोरा या किल्ल्यांचे आहे. हे तीनही किल्ले ज्या मोठ्या पठारावर उभे आहेत त्या पठाराला मध्ययुगीन काळातही मुल्हेर माची असे संबोधले



जात असे. मुल्हेर माची ही मुल्हेर गावापासून ३०० मीटर उंचीवर असून त्याला २.५ किलोमीटर लांब तटबंदी बांधलेली आहे. याच माचीवर तीन उंच शिखरे असून त्यावर देखील तटबंदी, दरवाजे, पाण्याची टाकी बांधलेली आहे. ही तीन शिखरे म्हणजेच मुल्हेर, मोरा व हारगड हे दुर्ग. हारगड या किल्ल्यावर १४ फूट लांबीची बांगडी प्रकारातील तोफ एका बुरुजावर ठेवलेली दिसते. या तोफेचे वजन साधारणत: ११००० किलो एवढे आहे. रवळ्या व जवळ्या या सप्तशृंगीजवळील किल्ल्यांची बांधणी ही मुल्हेर माची सदृश्य पठारावरच केलेली दिसते. फक्त फरक एवढाच आहे की जशी मुल्हेर माचीच्या पठाराला तटबंदी आहे तशी इथे नाही. तीनशे मीटर उंच पठारावरील दोन डोंगरांवर भक्कम दरवाजे आणि तटबंदी बांधून रवळ्या व जवळ्या हे जुळे किल्ले १६व्या शतकात बांधले गेले.

डॉ. सचिन जोशी

## गिर्यारोहकांना खुणावणारे गडकिल्ले

त्र्यंबक रांगेजवळील अप्पर वैतरणा धरणाच्या काठावर हर्षगड किंवा हरिहरगड नावाचा एक बेलाग दुर्ग गिर्यारोहकांना नेहमीच खुणावतो. हा किल्ला पायथ्यापासून २२७ मीटर उंचीवर असून पायवाटेने एक तास चालून झाल्यावर किल्ल्याच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचतो. येथून



**वैभव गडकिल्ल्यांचे**

पुढे गडावर पोहोचणे हे मोठे आव्हान आहे. कातळात खोदलेल्या १००-१२५ अरुंद व चिंचोळ्या पायऱ्या दृष्टीस पडतात. पण या साध्यासुध्या पायऱ्या नसून उभ्या अखंड खडकात जवळ-जवळ ७५ अंश कोनात सरळ खोदलेल्या आहेत. या अवघड पायऱ्या पार करून वर गेल्यावर किल्ल्याचा दरवाजा दिसतो. अहमदनगरच्या निजामशाहीच्या काळात या दरवाज्याची बांधणी झाली होती. येथून पुढे कातळातील अरुंद व अवघड वाटेने गडमाथ्यावर पोहोचता येते. प्रश्न असा पडतो की, मध्युगीन कालखंडातदेखील या गडावर जाण्यासाठी अशीच वाट होती का? तर याचे उत्तर हो असेच द्यावे लागेल कारण या किल्ल्याची उंची जास्त नसल्याने जर अशा प्रकारच्या वाटा तयार केल्या नसत्या तर किल्ला सहज जिंकता आला असता. या कठीण मार्गामुळे शत्रू गडावर सहजासहजी पोहोचू शकत नसे. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या मुख्य रांगेवरील गडकिल्ल्यांचा उपयोग



**नाशिक जिल्ह्यातील मांगी-तुंगी किल्ला**

मध्ययुगीन काळात घाटमार्गावरील हालचालींवर नजर ठेवण्यासाठी तसेच वाटसरूंना संरक्षण देण्यासाठी केला जात असे. भास्करगड, वाघेरा, साल्हेर, रतनगड यासारखे किल्ले ठाणे व गुजरात या भागातून देशावर येणाऱ्या घाटमार्गांवर बांधलेले होते.

### अभेद्य दुर्ग

पुरातत्त्वीय अभ्यासाच्या दृष्टीने मनमाड गावाजवळ अंकाई आणि टंकाई असे दोन अभेद्य दुर्ग अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. या दोनही किल्ल्यांची बांधणी सर्वप्रथम यादवकाळात झाली असण्याची शक्यता आहे. अंकाईवरील काही लेण्या तसेच टंकाई येथील शिवमंदिर यांच्या स्थापत्यावरून ते यादवकालीन असावेत असे वाटते. अंकाई किल्ला ज्या डोंगरावर आहे त्या डोंगराच्या पोटात हिंदू लेण्यांचा समूह आहे. या लेण्यांमधील सर्वात आकर्षक शिल्प म्हणजे 'त्रिमूर्ती' होय. मुंबई जवळील घारापुरीच्या लेण्यात जसे त्रिमूर्ती शिल्प आहे अगदी तसेच पण आकाराने थोडे लहान शिल्प अंकाईच्या डोंगरातील लेण्यात पाहायला मिळते. इ.स. १६६५ साली 'थेवेना' या प्रवाशाने आपल्या प्रवासवर्णनात अंकाई चा उल्लेख केलेला आहे. त्याच्या माहितीनुसार सुरत ते औरंगाबाद या मार्गावरील सर्वात मोठे ठाणे म्हणजे अंकाई होते. अंकाई किल्ल्यावर पोहोचण्यासाठी आजही १० दरवाजे पार करून जावे लागते. या सर्व दरवाज्यांची बांधणी एकाच कालखंडात झालेली नाही. आधी यादव त्यानंतर खिलजी मग बहामनी, निजामशाही सर्वात शेवटी मुघल या सर्वांनी किल्ल्यावर काही न काही बांधकामे केली. दरवाज्याच्या बांधकामातील अंदाजे ३००-४०० वर्षापूर्वीचे लाकूड आजही तेथे पाहता येऊ शकते. बागलाण प्रांताच्या पूर्वेला असलेला एक महत्त्वाचा शिवपूर्वकालीन दुर्ग म्हणजे गाळणा. या किल्ल्याचा नकाशा पाहिला तर आपल्याला दौलताबाद किल्ल्याचीच आठवण होईल. पायथ्याच्या गावाला पूर्ण तटबंदी आणि मागे डोंगरावर गिरिदुर्ग असे वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम या किल्ल्याचे केलेले दिसते. अशा प्रकारच्या किल्ल्यांना 'मिश्रदुर्ग' अशी संज्ञा वापरली जाते. महाराष्ट्रात अशा मिश्रदुर्गांची संख्या अगदी बोटावर मोजण्याइतकीच आहे. गाळणा किल्ल्यावर पोहोचण्यासाठी पाच दरवाजे पार करावे लागतात. सर्व दरवाजे आजही सुस्थितीत उभे आहेत. किल्ल्याची बांधणी १५ व्या शतकाच्या मध्यार्धात झाली असावी. किल्ल्याचा पहिला लिखित उल्लेख इ.स. १४८७ सालातील आहे. शिवाजी महाराजांनी बागलाण व नाशिक

**सय्यद आली यांच्या बुऱ्हान-ए-मासीर या ग्रंथातील माहितीनुसार नाशिक परिसरातील ३४ किल्ले अहमदनगरच्या निजामशहाकडे होते. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये किल्ल्यांची जोडी दिसते उदा. चंदन-वंदन, अंकाई- टंकाई, पुरंदर-वज्रगड, इ. अहमदनगर, नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांच्या सीमेवर अलंग-कुलंग आणि मदन असे किल्ल्यांचे त्रिकूट कळसुबाईच्या डोंगररांगेवर वसलेले दिसते. यापैकी मदन हा किल्ला महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांमध्ये चढाईसाठी सर्वात अवघड समजला जातो. किल्ल्यावर पोहोचण्याचे मार्ग पूर्वीही कधी सोपे नव्हतेच पण इंग्रजांनी इ.स. १८१८ साली तोफा उडवून गडावर जाण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या उद्ध्वस्त केल्या आणि तेव्हापासून वाट जास्तच अवघड झाली.**

परिसरावर सत्ता प्रस्थापित केली. त्यामध्ये त्यांना मोलाची साथ दिली ती येथील अभेद्य दुर्गांनी. गडकिल्ले ही संघर्षाची प्रतीके आहेत हे रामसेज किल्ल्याने आणि तेथील लढवय्यांनी दाखवून दिले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने इ.स. १६८१ ते १६८४ या काळात किल्ला घेण्याचे अथक प्रयत्न केले. पण मूठभर मावळ्यांनिशी रामसेजच्या किल्लेदाराने ३ वर्ष किल्ला लढवला. नाशिक परिसरातील बहुतेक सर्व किल्ले समुद्रसपाटीपासून ८०० मी. पेक्षा जास्त उंचीवर वसलेले आहेत. गिर्यारोहाकांनाच तेथपर्यंत पोहोचण्यासाठी कठीण चढाई करावी लागते. वेळप्रसंगी दोराचादेखील वापर करावा लागतो. नाशिक जिल्ह्यामध्ये ६० पेक्षा जास्त किल्ले आजही अस्तित्वात आहेत. या सर्व किल्ल्यांचे संवर्धन करणे हे एक मोठे आव्हान आहे.

(लेखक डेक्कन महाविद्यालयात
पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)
**संपर्क :** ०९८२२१०९३६२

# मुक्ती ताणतणावापासून

**जगाला भारतीय संस्कृतीने दिलेल्या अनमोल देणग्यांपैकी, संगीत, आयुर्वेद याचबरोबर योगशास्त्र जगभर झपाट्याने पसरत आहे. महागड्या वैद्यकाला सगळेच जग कंटाळलेले आहे. सर्वचजण योग थेरपीचा वापर करून अनुभव घेत आहेत. आपल्याकडे घरोघर योगासनांचे लोण पसरले आहे. माझ्या वाचनातील एका पुस्तकात, योगासने या शब्दाऐवजी आरोग्यासने हा शब्द वापरलेला आहे. सर्वसामान्य जनतेला योगाचे अवडंबर माजवून, शंख प्रक्षालन, धौती, षट्क्रिया या शब्दांनी घाबरवून टाकण्यापेक्षा साधेसोपे, फार तपशिलात्मक नसलेले व्यायामाचे प्रकार सांगता येतील.**

वैद्य प.य.वैद्य खडीवाले



सूर्यनमस्काराचे महत्त्व मी सगळ्यांनाच सांगावयाचे कारण नाही. पण मला अशी खात्री आहे की, योगासनांचा दिवसरात्र उद्घोष करणारे, आपल्या विद्यार्थ्यांना सूर्यनमस्काराचा आग्रह करत नाहीत. सूर्यनमस्कार चांगल्या प्रकारे घातले तर त्यात अनेक आसने केल्याचा शरीराला लाभ होत असतो. मी सगळ्या रुग्णांना किमान सहा सूर्यनमस्कार प्रत्येकी दोन–आई, वडील व देव यांच्या नावे घाला, असे सांगतो. सूर्यनमस्कारामुळे तरुणाई, बाल–बालके व वृद्धांचे शारीरिक आरोग्य तर चांगले राहतेच पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, जीवनातील कमी अधिक संकटाला, ताणतणावाला मानसिक दुबळेपणाला, जबरदस्त आत्मविश्वासामुळे सामोरे जाण्याची हिम्मत येते. हिम्मत ना हार, प्रभुको पुकार वही तेरी नैय्या लगायेंगा पार! हे खूप खूप जुने सिनेगीत वाचकमित्रांना माहीत असेलच. प्रत्येक सूर्यनमस्कारानंतर दोन–चार क्षण श्वास घ्यावा, थोडा अधिक वेळ ठेवून सोडावा. सूर्यनमस्कार सावकाश घालावे, किमान ६ पासून २५ नमस्कारापर्यंत सावकाश पोचावे. सूर्यनमस्कारामुळे मानवी मनाला उत्तम उभारी येते. कोणत्याही कठीण प्रसंगात, लीलया संकटांना सामोरे जाता येते तसेच फुफ्फुसांना पुरेसा प्राणवायू मिळतो.

### प्राणायामे विनियोग

हे संध्येतील वचन जरी आता संपले असले तरी त्यापेक्षा फार मोठ्या संख्येने जगभर योगाभ्यास करणारे प्राणायम या व्यायामाचा मोठा वापर करीत आहेत. प्राणायाममध्ये वायुतत्त्व शुद्ध हवा–ऑक्सिजन, नाक, श्वासनलिका व फुफ्फुसातून खेळवला जातो. नियमितपणे प्राणायामाचा अभ्यास केल्याने आपल्या रोजच्या जगण्यातील अनेक लहानमोठ्या मानसिक व्यथांवर–कोणताही स्ट्रेस सहन करण्यासाठी मनाची उत्तम मशागत होते. ज्यांना प्राणायम नीट करता येत नाही त्यांनी त्यापेक्षा सोपा उपाय, दीर्घ श्वसनाचा वापर करावा. एक नाकपुडी बंद करून दुसरीने श्वास घ्यावा. श्वास घ्यायला जेवढा वेळ लागतो त्यापेक्षा पाच अधिक अंक श्वास ठेवावा. नंतर बंद नाकपुडीने श्वास सावकाश सोडावा. या पद्धतीने श्वास घ्यावा, थोडा अधिक काळ ठेवावा व सावकाश सोडावा. या पद्धतीने आलटून पालटून किमान पाच ते सहा वेळा करावे. या पद्धतीने केल्यावर मग दोन्ही नाकपुड्यांनी श्वास घ्यावा व तोंडाने श्वास सोडावा. या प्रकारे पाच वेळा करावे. या दीर्घ श्वसनाने नाक, कपाळ, फुफ्फुसातील लहान द्राक्षासारखे घोसातील मलिन कफ, अडथळे दूर होतात. ज्यांना फुफ्फुसाची ताकद वाढवायची, छाती रुंदावयाची आहे, त्यांनी मात्र प्राणायाम जरूर अवलंबावा.

### शवासन

शवासन शब्दाला व्यायामाचा प्रकार म्हणणे, म्हणजे 'वदतोव्याघात' आहे. ज्यात हालचाल नाही, व्यायामाचा अभाव आहे. त्याला व्यायाम कसे म्हणावे? आयुर्वेदीय तत्त्वज्ञानानुसार, मानवी जीवनावर, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यासारखी नऊ 'मूळ कारणद्रव्ये' आपापल्या परीने अंमल करत असतात. त्यात एखाद्या गोष्टीचा अभाव हेसुद्धा द्रव्य मानले आहे. ज्या आसनात हालचाल, मग ती शरीरातील सर्व स्नायूंची, ऐच्छिक व अनैच्छिक अशा दोन्ही प्रकारांची होऊ नये अशी अपेक्षा असते, ते शवासन किंवा खडीवाल्यांच्या भाषेत 'मुडदासन' आहे. शवासनात एखाद्या मुडद्यासारखे निर्विकार, बेफिकीर, बिनधास्त पडायला शिका, सर्व स्नायूंना मोकळे सोडा, कसलाही विचार न करता, कोणताही जप मनात न करता उताणे स्वस्थ पडा. श्वसनात पाठीचा जास्तीत जास्त भाग चटई किंवा सतरंजीला टेकला पाहिजे. झोपण्यात उटंगळपणा नको. तरच शवासनाचा फायदा मिळतो. तुझे आहे तुजपाशी नाटकात स्थितप्रज्ञ

कसा दिसतो? याबद्दल काकाजी, समोर गाढव कसे चरत आहे, बेफिकीर आहे तसा स्थितप्रज्ञ असतो, असे सांगतो. ज्यांना या प्रकारच्या शवासनाचा अभ्यास जमला, त्यांना जीवनात सर्व प्रकारचे टेन्शन सहन करण्याचे, कसलेही वार, प्रहार सहन करण्याचे सामर्थ्य येते. त्यानंतर मूळ कारणाकडे जाऊन अन्य रोगांचे निवारण करता येते. हिप्नॉटिझम किंवा वशीकरण या काही विशेष विद्या आहेत, असे लोक सांगतात. मला वाटते, शवासन करणे किंवा करवून घेणे ज्यांना जमले ते मोठेच हिप्नॉटिस्टट आहेत.

### ताणतणावापासून मुक्ती

अलीकडच्या मानवी जीवनात लहानमोठा, गरीब-श्रीमंत, ग्रामीण वा शहरी भागातील प्रत्येकजण, विविध आरोग्यसमस्यांमुळे खूप चिंता करतो. विशेषत: मधुमेह, रक्तदाबवृद्धी, हृद्रोग व अतिस्थूल व्यक्ती, आपल्या वाढलेल्या प्रचंड टॉमीमुळे हैराण असतात. टॉमी इन, चेस्ट आऊट अशी उत्तम आरोग्याची व्याख्या ! ज्या अतिस्थूल व्यक्तींना एक पैसाही खर्च न करता, आपले पोट कमी करावयाचे आहे, पोटाचे स्नायू स्पष्ट दिसावयास हवे असे वाटते त्यांच्याकरिता पश्चिमोत्तानासन किंवा सीटस् अप यासारखा प्रभावी उपाय दुसरा कोणताच नाही. उताणे झोपून पाय न हलविता, डोके गुडघ्याला लावायचे, पुन्हा उताणे व्हायचे, असा हा आसन प्रकार – पश्चिमोत्तानासन रिकाम्या पोटी करावे. दिवसातून अनेकवेळा हा प्रकार करून नये. हा प्रकार सुरुवातीला करायला लागल्यावर अतिस्थूल व्यक्तींचे पोट, प्रथम खूप दुखते. त्यांनी थोडे अंतर ठेवून फक्त तीन वेळाच हे आसन करावे. रोज एकवेळा या प्रमाणात दहा आसनांपर्यंत वाढवावे. या प्रकारे दहा वेळा पश्चिमोत्तानासन केल्यास लठ्ठ व्यक्तींचे पोट, नितंब यांचे वजन कमी होते. हा व्यायाम सावकाश करावा. यानंतर एकदम घाईने जेवू नये. कंबरेचे व आतड्यांचे दुखणे असणाऱ्यांनी हा व्यायाम करू नये. या व्यायामानंतर कमान व्यायाम करावा व मग काही वेळ शवासनात स्वस्थ पडून राहावे.



**योगशास्त्रातील काही तज्ज्ञ मंडळी आपले डोके शांत राहण्याकरिता शीर्षासनाचा प्रयोग सुचवितात. ज्यांना डोळ्याचे किंवा कानाचे विकार आहेत त्यांनी शीर्षासन टाळावे. त्यांनी सर्वांगासन व विपरीत करणी यांचा वापर करावा. रोजचे ताणतणाव सहन करण्याकरिता ध्यानमुद्रा, ज्ञानमुद्रा यांचीही मदत होते. तज्ज्ञांच्या सल्ल्याने शशांकासन किंवा राशकासन, मकरासन व सर्वांगासनाचे धडे घ्यावेत.**



**प्राणायाममध्ये वायुतत्त्व शुद्ध हवा-ऑक्सिजन, नाक, श्वासनलिका व फुफ्फुसातून खेळविला जातो. नियमितपणे प्राणायामचा अभ्यास केल्याने आपल्या रोजच्या जगण्यातील अनेक लहानमोठ्या मानसिक व्यथांवर-कोणताही ताण सहन करण्याची मनाची उत्तम मशागत होते.**

### वृद्धांसाठी आसने

साठीच्या वयाच्या खूप स्थूल व्यक्तींच्या खूप तणावावर, आणखी एक अक्सर इलाज म्हणजे कमान व्यायाम होय. मान व पाठीत क्रमाक्रमाने सावकाश वर्तुळाकार मागे वाकत जाऊन व शरीराचा तोल सांभाळून केलेला व्यायाम, कंबरेच्या भागाचे दु:ख तत्काळ दूर करतो. जे स्थूल आहेत व कमान करावयाची भीती, धास्ती वाटते त्यांनी कोणाला तरी आपली कंबर पकडून ठेवावयास सांगावे, त्यांचा आधार घेऊन हा व्यायाम करावा. या व्यायामात कंबरेतून वाकून पुन्हा वर येताना सावकाश यावे. कोणतीही कृती हिसक्याने घाईघाईने करू नये. कोनीकल मुव्हमेंट नको.

सर्क्युलर गोलाकार व्यायाम मात्र पाच-सहा वेळा स्लो टाइममध्ये करावा. त्यामुळे कंबर बारीक होते. विशेषत: विशाल, अतिविशाल महिलांकरिता हा उत्तम व्यायाम आहे. घरी उभ्याचा ओटा व ऑफिसमध्ये टेबल यामुळे शरीराच्या मध्य भागाला अजिबात हालचाल, व्यायाम नसतो. मग छाती, कंबर, नितंब वाढतच जातात. काम करणाऱ्यांचे अंग कसे चवळीच्या शेंगेसारखे लवले पाहिजे. तो या कमान आसनात येतो. कमरेचा पट्टा वापरावा लागत नाही. आपण नेहमी पुढे वाकून काम करतो. त्याऐवजी उलटे मागे वाकावे. निदान परिवर्जन किंवा मूळ कारण दूर होते. काही योगी मंडळी या व्यायामाला चक्रासन असे संबोधतात.

**योगेन चित्तस्य पदेन वाचां, मल शरीरस्य च वैद्यकेन !**
**यो पाकरोत्तं प्रवरं मुनीनाम् पतंजलिम् प्राज्जलिरानतोस्मि !!**
**संयमसे स्वास्थ, शुभं भवतु !**

(लेखक हे पुणे येथील ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य आहेत.)
**संपर्क :** ०२०-२४४५९६१८

# स्वप्नांना जोड परिश्रमाची

**IAS are heavenly born people या विधानाला मोडीत काढत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीचा सामना करत यूपीएससीच्या परीक्षेत यश मिळविल्याची अनेक उदाहरणे दरवर्षी पाहायला मिळतात. वाशिम येथील योगेश निरगुडे हे देखील त्यापैकीच एक. परंतु असामान्य स्वप्न पाहणाऱ्या सामान्य उमेदवारांसाठी आज ते आदर्श ठरले आहेत. यूपीएससी परीक्षा काय असते हे कुणाच्या गावी नसलेल्या ठिकाणी दहावी–बारावीत जेमतेम गुणवत्ता असलेल्या श्री. निरगुडे यांनी आयएएस होण्याचे स्वप्न पाहिले आणि ते सत्यात उतरवले. त्यांचे हे यश यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी दीपस्तंभ ठरले आहे. या यशापर्यंतचा प्रवास त्यांच्याच शब्दांत..**



**योगेश निरगुडे**

सहायक जिल्हाधिकारी,
गोध्रा, गुजरात, रँक १३०

अत्यंत कमी खर्चात उत्तुंग यश संपादन करण्याचा राजमार्ग म्हणजे यूपीएससीची नागरी सेवा परीक्षा. कलेक्टर होणे काही साधी गोष्ट नव्हे, त्यासाठी खूप खर्च येतो, चांगले क्लासेस लावावे लागतात आदी नकारात्मक गोष्टींचा आपल्या मनावर खूप मारा झालेला असल्याने ही परीक्षा म्हणजे आपल्याला एक दिव्य वाटू लागते. या ऐकीव गैरसमजांमुळे कितीतरी जण या संधीपासून दूर राहणे सोयीचे समजतात.

अपयशाची भीती त्यांच्या मनात घर करून राहते. परंतु या सर्व गैरसमजुती आपल्या अज्ञानातून आलेल्या आहेत हे आपण प्रथम लक्षात घ्यायला हवे. आयएएस होण्यासाठी खूप पैसा लागतो किंवा लहानपणापासून हुशार किंबहुना पहिला नंबर मिळवणारा विद्यार्थी असावे लागते असेही नाही. अगदी सामान्यातील सामान्य आणि कोणत्याही शाखेचा विद्यार्थी या परीक्षेच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस, आयआरएस, आयएफएस आदी सेवांमध्ये मोठ्या पदावर रुजू होऊ शकतो. अगदी व्यावहारिकपणे सांगायचे झाले तर आपली राहण्याची आणि खाण्याची व्यवस्था असल्यास १० ते १५ हजार रुपये एवढ्या खर्चात आयएएस अधिकारी होणे शक्य आहे. न्यूनगंडाला दूर ठेवा. अथक परिश्रम आणि संयम बाळगून तयारीत सातत्य ठेवा. जिद्द आणि परिश्रम हे यशाच्या मार्गातील सर्वात मोठे भांडवल आहे हे कधीच विसरू नका. अपयश पचवायला शिका आणि यशही पचवायला शिका.

**स्वप्न**

हिवरखेडा (ता. सेनगाव, जि. हिंगोली) या गावी माझे ५ वीपर्यंतचे शिक्षण झाले. वडील शेतकरी. तुटपुंजी जमीन. मोलमजुरीवर गुजराण. घरात परिस्थिती हलाखीची. विजेअभावी दिव्याखाली अभ्यास करावा लागते. परिस्थितीशी समायोजन साधणे मी येथूनच शिकलो. वडील बबनराव निरगुडे सातवी नापास आणि मंगलबाई निरक्षर. परंतु आमच्या शिक्षणाबद्दल ते खूप साक्षर आणि जागरूक होते. ५ वी नंतर गावात शिक्षणाची सोय नसल्याने आई–वडिलांनी मला मामाच्या गावी वाशिमला पाठवले. समृद्ध आणि यशस्वी जीवनाची त्यांची स्वप्ने त्यांनी माझ्या डोळ्यात पाहिली होती. ती पूर्ण करण्याची शिकस्त मला करायची होती. वाशिमला पुढील शिक्षणासाठी मामाकडे आलो.



**...आणि यूपीएससीकडे वळलो**

दहावीत ६० आणि १२ वीत ७० टक्के गुण मिळाले. तेव्हा सर्वसामान्यांचा कल डी.एड करून शिक्षक होण्याचा होता. मीदेखील डी.एड.साठी प्रयत्न के ला. मात्र सुदैवाने प्रवेश मिळाला नाही. दरम्यान बी.ए.ला प्रवेश घेतला. २००५ पर्यंत स्पर्धा परीक्षा मार्ग कल्पनेतही नव्हता. मात्र मित्रांकडून मला स्पर्धा परीक्षांबद्दल माहिती



**प्रेरणा**

मिळाली. पुढे अभ्यास करत असताना एका मासिकात अत्यंत गरिबीचा सामना करत यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या काही उमेदवारांच्या मुलाखती मला वाचायला मिळाल्या. यातील मुलाखती एवढी प्रेरणा देऊन गेल्या की, मी तेव्हाच यूपीएससीची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. दरम्यान बी.ए. पूर्ण केले. २००८ पासून या परीक्षेची जोमाने तयारी सुरू केली. दहा ते बारा तास अभ्यासासाठी दिले. कलेक्टर होण्यासाठी मी परीक्षा देतोय ही कल्पनाच माझ्या अवतीभोवती असलेल्या मागासलेल्या लोकांसाठी विचित्र होती. अनेकजण वेड्यातही काढायचे. पण ते त्यांचे अज्ञान म्हणून मी माझी तयारी करायचो. दरम्यान एमपीएससीच्या एसटीआय पदाची परीक्षा मी पहिल्याच प्रयत्नात पास झालो आणि बहुतेकांची बोलती बंद झाली. नातेवाईक आणि आई-वडिलांना माझ्या तयारीवर पूर्ण विश्वास आला होता. हे माझे पहिले यश होते. यामुळे आर्थिक पाठबळही मिळाले. या योगे आईवडलांची शुश्रूषा चांगली करता आली. दरम्यान यूपीएससी परीक्षेची तयारी जोमाने सुरू ठेवली.

### मार्गदर्शन

ही परीक्षा संयम आणि क्षमतांचा अंत पाहणारी आहे. त्यामुळे तयारीही तेवढ्याच क्षमतेने होणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शन मिळाले तर कमी प्रयत्नात लवकर यश मिळवता येते. परंतु माझ्या मते मार्गदर्शन किंवा कोचिंगचा यशातील वाटा १० ते १५ टक्के एवढाच असतो. बाकी सर्व काही आपल्या परिश्रमावर अवलंबून असते. मला वेळीच योग्य मार्गदर्शन मिळू न शकल्याने सहा प्रयत्न करावे लागले. तरी मी अनुभवातून शिकत गेलो. माझ्या चुका दूर करत गेलो. मात्र तुम्ही थोडेफार मार्गदर्शन मिळवून स्वत: अभ्यास करूनही या परीक्षेत यश संपादन करू शकता.

### लेखनशैली

सध्या प्रेझेंन्टेशनचा जमाना आहे. आपल्याकडील ज्ञानाचे योग्य सादरीकरण होणे गरजेचे आहे. नेमकेपणाने शक्य असल्यास आकृत्या, ठळक मुद्दे आदींच्या माध्यमातून सादर करण्याचा प्रयत्न करावा.

### सल

प्रत्येक टप्प्यावर मी संघर्ष करीत स्वत:ला सिद्ध करत गेलो. २००९ मध्ये विक्रीकर निरीक्षक झालो. दरम्यान वडलांना कॅन्सरने ग्रासले. या नोकरीमुळे त्यांच्यावर योग्य उपचार करू शकलो. मला कलेक्टर झाल्याचे त्यांना पाहायचे होते. परंतु काळाला ते मान्य नव्हते. २०११ मध्ये पूर्व परीक्षेचा निकाल आल्यानंतर त्यांना देवाज्ञा झाली. वडील गेल्याचे दु:ख, आईला सावरणे अशा नाजूक स्थितीमध्ये दोन महिन्यात मला मुख्य परीक्षेची तयारी करावी लागली. ही परीक्षा उत्तीर्ण झालो. मुलाखतही चांगली झाली परंतु यशाने हुलकावणी दिली. प्रयत्न न सोडता पुन्हा २०१२ ला ही परीक्षा दिली. परीक्षा आणि मुलाखतीतही यश संपादन करून आयएएस झालो. हा क्षण पाहण्यासाठी वडील मात्र हयात नव्हते याचे दु:ख सदैव मनी राहिले.

### यशाची सूत्रे

- परीक्षेचा अभ्यासक्रम समजून घ्या.
- परीक्षा प्रणाली आणि मागील प्रश्नपत्रिकांचा तुलनात्मक अभ्यास व सराव करा.
- एका टॉपीकसाठी जास्तीत जास्त दोन पुस्तकांचा वापर करावा.
- दर्जेदार वृत्तपत्रांचे संपादकीय, इंग्रजी वृत्तपत्राचे वाचन आणि चालू घडामोडींसंबंधीचे मासिक अधिक गुण मिळवून देते.
- परीक्षेपूर्वीचे १५ दिवस उजळणीसाठी राखून ठेवावे.

### मुलाखत

**मुलाखतीदरम्यान तुमची भाषा पाहिली जात नाही. ती केवळ संवादाचे साधन आहे. आपल्याला बोलण्यासाठी जी सोपी भाषा असेल त्यातून आपण मुलाखत देऊ शकतो. मुलाखतीदरम्यान वेळप्रसंगी दुसऱ्या भाषेतील पर्यायी शब्दाचा वापर करू शकतो. संवाद योग्य व्हायला हवा बस्स. २०१० मध्ये यूपीएससीची मुख्य परीक्षा पास होऊन मी पहिली मुलाखत दिली. त्यात मात्र ३०० पैकी केवळ १२० गुण मिळाल्याने लेखी परीक्षेत चांगले गुण असूनही आयएएस केडर मिळू शकले नाही. रिव्हर्स लिस्टमध्ये २०१२ मध्ये इंडियन इन्फरमेशन सर्व्हिस मिळाली. शिवाय २०११ मध्ये मुख्य परीक्षा व मुलाखतीत ॲव्हरेज गुण असल्याने केवळ दोन गुणांनी रिव्हर्स लिस्टमध्ये नाव आले. मात्र आधीच २०१० च्या परीक्षेंतर्गत माझ्या हातात आयआयएसची पोस्ट असल्याने मी ही संधी दुसऱ्यास द्यावी असे लिहून दिले. पुन्हा कसून तयारी करून २०१२ मुख्य परीक्षा व मुलाखत दिली. तत्पूर्वी मॉक इंटरव्ह्यू दिले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले. इंग्रजीची बऱ्यापैकी तयारी करून त्यातच आत्मविश्वासाने मुलाखत दिली आणि २०१३ मध्ये आयएएस होण्याचे स्वप्न साकार केले.**

**– राजाराम देवकर**

# नवा विचार नवी दिशा




**दिलखुलास कार्यक्रमात श्रोत्यांच्या भेटीला यावेळी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, योग नियोजन समितीचे निमंत्रक उदय देशपांडे, जादूटोणा विरोधी आणि नरबळी प्रसार आणि प्रसार अंमलबजावणी समितीचे सहअध्यक्ष श्याम मानव आणि वैधमापन शास्त्र विभागाचे नियंत्रक संजय पांडे आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहायक संचालक डॉ. गिरीश चौधरी आले होते. त्यांच्याशी झालेल्या दिलखुलास बातचितीचा सारांश...**

**डॉ. दीपक सावंत, मंत्री, आरोग्य :** ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत सुसूत्रता आणण्यासाठी ऑपरेशन कायापालट ही योजना हाती घेण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये या ठिकाणी रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील सुसंवाद राखण्यासाठी स्वच्छता, रुग्णालयाचे आवार स्वच्छ आणि सुंदर करणे, औषधांच्या उपलब्धतेची माहिती रुग्णांना देणे, आरोग्य केंद्रात सूचना पेटी लावणे या प्राथमिक आरोग्य केंद्राचा कायापालट करण्यासाठी पायाभूत सेवा केंद्रात उपलब्ध करून देण्यासाठी लक्ष देण्यात येत आहे. याबरोबरच आरोग्यवर्धिनी ही योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या समन्वयातून राबवली जात आहे. ही योजना टी.बीच्या रुग्णांसाठी औषधांबरोबर प्रथिनेयुक्त आहार देणे या संदर्भात आहे. पूरक पोषण आहारातून आरोग्यवर्धिनीची संकल्पना राबवण्यात येत आहे. पावसाळ्यातील आजारांच्या जागृतीविषयी सांगताना डॉ. सावंत म्हणाले की, डेंग्यू, मलेरिया, जलजन्य आजार याविषयी आणि स्वाइन फ्ल्यू या संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत.

**श्याम मानव, सहअध्यक्ष, जादूटोणा विरोधी समिती :** राज्यात जादूटोणा नरबळी आणि अनिष्ट रुढी परंपरांना आळा घालण्यासाठी जादूटोणा आणि नरबळी विरोधी प्रचार आणि प्रसार अंमलबजावणी समिती कार्यरत आहे. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, अघोरी प्रथा आणि जादूटोणा विरोधी कायद्याचे स्वरूप आणि राज्यात होत असलेल्या कायद्याची अंमलबजावणी याविषयी त्यांनी माहिती दिली. या कायद्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र राज्य हे प्रथम राज्य असल्याचेही श्री मानव यांनी अधोरेखित केले. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानूष, अनिष्ट प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंध कायद्यानुसार अंधश्रद्धा पसरवणाऱ्या १२ कृती गुन्हापात्र आहेत. यामध्ये गुन्हापात्र कृतींचा प्रसार करणारी व्यक्तीदेखील गुन्हेगार असल्याचे त्यांनी सांगितले.

**उदय देशपांडे, निमंत्रक, योग नियोजन समिती :** २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून जगभर प्रथमच साजरा करण्यात आला. या योगदिनाच्या निमित्ताने राज्याच्या शालेय शिक्षण विभागामार्फत योग नियोजन समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचे निमंत्रक योगतज्ज्ञ उदय देशपांडे यांनी योगदिन साजरा करण्यामागची शासनाची भूमिका, योग करण्याच्या पद्धती, योगाची उपयोगिता त्याचे परिणाम याविषयी उदय देशपांडे यांनी माहिती दिली.

**संजय पांडे, नियंत्रक, वैधमापनशास्त्र विभाग :** वैधमापनशास्त्र विभागाच्या कार्यकक्षेत कोणतीही वस्तू, वजन आणि मापाने विक्री होत असेल अशा सर्व वस्तू आणि सेवा येतात. व्यापारी, दुकानदार यांनी या विभागामार्फत वजन आणि मापाची पडताळणी करून घेणे व्यावसायिकांना बंधनकारक असते, अशी माहिती वैधमापनशास्त्र विभागाचे नियंत्रक संजय पांडे यांनी दिली. संपर्क ०२२ -२२८८६६६ या क्रमांकावर आणि व्हाट्सअपसाठी ९८६९६९१६६६ या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा www.ligalmetrology.maharashtra.gov.in या वेबसाईटवर तक्रार करावी, असे आवाहन श्री. पांडे यांनी केले आहे.


**डॉ. गिरीश चौधरी, साहाय्यक संचालक, महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद :** जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त थॅलेसेमियाविषयीची जागृती करण्यात आली. रक्तातील लाल पेशी कमकुवत होणे किंवा नष्ट होणे म्हणजे थॅलेसेमिया. हा जेनेटिक डिसऑर्डर अर्थात गुणसूत्रांमधील दोषामुळे निर्माण झालेला विकार आहे. दिवसेंदिवस उग्र रूप धारण करीत असलेला या आजाराविषयी व उपचारांविषयी डॉ. गिरीश चौधरी यांनी सविस्तर माहिती दिली.


**– मीरा ढास**

❐ ❐


**डॉ. दीपक सावंत,**
मंत्री, आरोग्य विभाग


**श्याम मानव,**
सहअध्यक्ष,
जादूटोणा विरोधी समिती


**उदय देशपांडे,**
निमंत्रक,
योग नियोजन समिती


**संजय पांडे**
नियंत्रक, वैधमापन शास्त्र


**डॉ. गिरीश चौधरी**
साहाय्यक संचालक, महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद

# विचार स्पंदने

## सात शतके लोकप्रियतेची...

जय महाराष्ट्र

**जय महाराष्ट्र कार्यक्रमात गेल्या महिन्यात परिवहन मंत्री दिवाकर रावते, कृषी राज्यमंत्री प्रा. राम शिंदे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व्ही. एन. मोरे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, वैधमापनशास्त्र विभागाचे नियंत्रक संजय पांडे, आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त उदय देशपांडे आदींना निमंत्रित करण्यात आले होते. या मुलाखतींचा हा थोडक्यात सारांश ...**

**दिवाकर रावते (परिवहन मंत्री)** – सामान्य जनतेशी संबंधित असणारा परिवहन विभाग कायम जनतेच्या हिताचे निर्णय घेत असतो. अलीकडेच परिवहन विभागाने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना विभागामध्ये नोकरी देताना शासनाच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. या व अशा अनेक निर्णयाची माहिती परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी दिली.

**प्रा. राम शिंदे – (राज्यमंत्री, गृह, पणन)** – शेतीच्या उन्नतीसाठी शासन राबवत असलेल्या योजनांविषयी राज्याचे कृषी राज्यमंत्री मा. प्रा. राम शिंदे यांनी माहिती दिली. राज्यातील कृषिक्षेत्राची सद्य:परिस्थिती, खरीप हंगामाची पूर्वतयारी, पीक विमा योजनेच्या सद्य:स्थितीविषयीचे अभ्यासपूर्ण विवेचन त्यांनी केले.

**सप्तपदी स्वच्छतेची कार्यशाळा** – स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाच्या वतीने अलीकडेच 'संकल्प स्वच्छतेचा' या कोकण विभागाच्या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन मुंबईत करण्यात आले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्वच्छ भारत अभियानाचा ब्रँड ॲम्बॅसिडर आमीर खान, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे, नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर–म्हैसकर, कोकण विभागाचे आयुक्त राधेश्याम मोपलवार आदींची या कार्यशाळेला उपस्थिती होती.

मुख्यमंत्र्यांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगून उपस्थितांना स्वच्छतेच्या सप्तपदीची शपथ दिली. त्याचे प्रसारण जय महाराष्ट्र कार्यक्रमातून करण्यात आले.

**व्ही. एन. मोरे (अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग)** – अलीकडच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगची अर्ज करण्याची पद्धत ते परीक्षेच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे. या बदलाविषयी तसेच आयोगाच्या कामकाजाविषयी माहिती श्री. मोरे यांनी दिली.

**संजय पांडे ( नियंत्रक, वैधमापनशास्त्र)** – दूध, धान्य, टॅक्सी–रिक्षा प्रवास, वस्तूंची खरेदी, घरखरेदी या संदर्भात ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांवर उपाय म्हणजे वैधमापनशास्त्र विभाग. शासनाच्या या विभागाची माहिती वैधमापनशास्त्र विभागाचे नियंत्रक संजय पांडे यांनी दिली.

**डॉ. हर्षदीप कांबळे (आयुक्त, अन्न व औषध प्रशासन)** – अन्न व औषध प्रशासनाने अलीकडेच बेकादेशीररीत्या विक्री होत असलेल्या कार्डियाक स्टेण्ट तसेच ऑनलाईन कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयामागची शासन भूमिका तसेच अन्न व औषध प्रशासनाची एकूणच कार्यपद्धती, रचना याविषयी डॉ. हर्षदीप कांबळे यांनी विस्तृत माहिती दिली.

**डॉ. रागिणी पारेख** – अवयव दान हेच श्रेष्ठ दान असा संदेश देत जनजागृती केली जात असली तरी अजूनही नेत्रदानाचे प्रमाण कमी आहे. यामागची कारणे काय आहेत आणि यावर काय उपाय केले गेले पाहिजेत याविषयी जय महाराष्ट्र कार्यक्रमात सर जे. जे. समूह रुग्णालयातील नेत्रशल्य विभागाच्या विभागप्रमुख डॉ. रागिणी पारेख यांनी आपले विचार मांडले.

**उदय देशपांडे** – देशाला योगाची वैभवी परंपरा लाभली आहे. तन, मन सुदृढ राखण्यासाठी योगाचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या योगाच्या प्रस्तावावर सुमारे दीडशेच्या वर राष्ट्रांनी सहमती दर्शवली. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून घोषित केला आहे. या दिनामागची शासनाची नेमकी भूमिका काय, आपल्या जीवनातील योगाचे महत्त्व, आसने, प्राणायाम याविषयी शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या योग नियंत्रक समितीचे निमंत्रक उदय देशपांडे यांनी विस्तृत माहिती दिली.

**– अतुल पांडे**



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री



**प्रा. राम शिंदे**
राज्यमंत्री, गृह, पणन



**व्ही. एन. मोरे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग



**डॉ. रागिणी पारेख**
विभागप्रमुख,
जे.जे. नेत्रशल्य विभाग



**डॉ. हर्षदीप कांबळे**
आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन




# विद्यापीठांवर दृष्टिक्षेप

महान्यूज वेबपोर्टल हे शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकृत वेब पोर्टल आहे. राज्य शासनाचे निर्णय, योजना, उपक्रम, कार्यक्रम यांची तत्काळ माहिती जनता आणि माध्यमांपर्यंत पोहोचविण्याचे काम महान्यूज हे वेब पोर्टल २००८ पासून अखंडपणे करत आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली महान्यूजने बदल स्वीकारला आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू झाले की उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांची विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी धावपळ असते. नेमका कोणता अभ्यासक्रम निवडायचा...कोणत्या विद्यापीठात..... कोणते अभ्यासक्रम...



याची माहिती बऱ्याच विद्यार्थ्यांकडे नसते. अन् कोणाला विचारावे याबद्दलही फारशी माहिती नसते. मित्राने हा अभ्यासक्रम निवडला म्हणून मीही 'तोच' निवडला....अशी अनेकांची गत होते...हे आमच्या माहितीसंचालक (प्रशासन) देवेंद्र भुजबळ यांनी हेरले अन् त्यांनी त्यातूनच 'विद्यापीठे' हे नवीन उपयुक्त सदर नावारूपाला आले.

राज्यातील विद्यापीठांशी संलग्न जिल्हे कोणते...कोणत्या विद्यापीठांमध्ये कोणकोणते अभ्यासक्रम शिकविले जातात... त्यांची वैशिष्ट्ये काय आहेत.. आदींबाबत एकत्रित अन् अत्यंत उपयुक्त माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना 'महान्यूज' देत आहे. याची सुरुवात मुंबई विद्यापीठापासून करण्यात आली.

महान्यूजवर विद्यापीठे हे दालन उघडल्याबरोबर एका 'क्लिक'वर राज्यातील सर्व विद्यापीठांची माहिती आपण पाहू शकतो. यामध्ये विद्यापीठांची स्थापना, वाटचाल, नवीन व बदललेले अभ्यासक्रम, गुणवैशिष्ट्ये, ग्रंथालय, अभ्यासकेंद्र, सामाजिक बांधिलकी, संपर्क यांची परिपूर्ण माहिती देण्यात आली आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना प्रेरणा व स्फूर्ती मिळण्यासाठी आजपर्यंतचे यशस्वी विद्यार्थी, विद्यापीठाला मिळालेल्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पुरस्कारांची माहिती देण्यात आली आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदतगार ठरलेली 'कमवा व शिका' योजना, अनुसूचित जाती- जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती,

**महान्यूज हे केवळ मीडियासाठीच उपयोगी न पडता यात सर्वांचाच सहभाग वाढविण्यासाठी काम करीत आहे. महान्यूजवरील 'नोकरी शोधा' हे सदर बेरोजगारांसाठी आशेचा किरण बनला आहेच.... याचबरोबर 'महाभ्रमंती' व 'विद्यापीठे' या सदरातून महाविद्यालयीन विद्यार्थी, पर्यटक, बेरोजगार युवकांच्यासाठीही एक 'सारथी' म्हणून काम करीत असल्याचे सिद्ध होऊ लागले आहे.**

इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना असणाऱ्या सोयी-सुविधा, शिष्यवृत्तीची माहिती, फेलोशिप, आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती यांची उपयुक्त माहिती विद्यापीठनिहाय देण्यात आली आहे. गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह वसतिगृहाचीही सोय, आजारी विद्यार्थ्यांसाठी आरोग्य केंद्र, क्रीडा संकुले आणि त्यातील सोयी-सुविधा, रोजगार माहिती व नोंदणी केंद्र, मानसिक रुग्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मानसिक समुपदेशन केंद्र यांची माहिती 'महान्यूज' वेबपोर्टलवर 'विद्यापीठे' या सदरात देण्यात आली आहे. यामुळे 'महान्यूज' हे विद्यार्थ्यांसाठी जणू 'सारथी'च बनले आहे.

याशिवाय सुटीच्या कालावधीसाठी पर्यटकांना 'महाभ्रमंती' या सदराद्वारे राज्यातील गडकिल्ले, अभयारण्ये, प्रेक्षणीय स्थळे, धार्मिक व सांस्कृतिक ठिकाणांची माहिती देण्यात आली आहे. यामुळे नवीन पर्यटन करणाऱ्यांना याचा लाभ झाला. सोशल व इतर मीडियाच्या तोडीस-तोड म्हणून महान्यूजही मागे नाही. महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक आणि सध्याच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी विविध संकल्पनांना वाव देऊन सातत्याने मार्गदर्शन केले आहे. यातूनच विविध दिनविशेषविषयी तज्ज्ञांचे लेख, केंद्र सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त विविध योजनांची माहिती, जलयुक्त शिवार योजना, स्वच्छ भारत अभियान, वृक्ष संवर्धनाला 'महान्यूज'द्वारे प्राधान्याने प्रसिद्धी देण्यात आली.

**- धोंडिराम अर्जुन**

# माध्यमे सुसंवादाची

**महाराष्ट्र शासनाच्या व्यापक जनसंपर्काची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची वेगळी ओळख राज्यपाल सी. विद्यासागरराव यांना करुन देण्याची संधी नुकतीच प्राप्त झाली. निमित्त होते, राज्यपाल महोदयांसोबतच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या बैठकीचे. या बैठकीमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी या विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. यावेळी महासंचालनालयाच्या कामकाजाचा आढावा देताना त्यांनी संवादाच्या विविध माध्यमांची माहिती दिली.**

महाराष्ट्र शासन व राज्यातील जनता यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हे राज्य शासनाच्या सकारात्मक प्रतिमा निर्मिती आणि प्रतिमा संवर्धनासाठी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा कशाप्रकारे प्रभावीपणे वापर करीत आहे, याबद्दल त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या विविध योजना, निर्णय, धोरण जनतेपर्यत पोहचावे यासाठी महासंचालनालय प्रसिद्धी आणि प्रसारणाच्या विविध आयुधांचा वापर करते. राज्यातील माध्यमांना पूरक माहिती देणे, त्यांना प्रसिद्धीसाठी आनुषंगिक मदत करणे, पत्रकारांना सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्यापर्यंत माहिती पुरविणे, त्यांना पुरस्कार आणि प्रशिक्षण देणे आदी महत्त्वाची कार्य अव्याहतपणे महासंचालनालयामार्फत केली जातात.

महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांत असणारी प्रसिद्धीची यंत्रणा आणि यादीवर असणाऱ्या हजारों दैनिकांच्या माध्यमातून, महाराष्ट्रात सर्वदूर असणाऱ्या जाहिरात फलकांद्वारे राज्य शासनाच्या विविध कामांना प्रसिद्धी दिली जाते. या शिवाय मुद्रित माध्यमांमध्ये लोकराज्य (मराठी) लोकराज्य (उर्दू),महाराष्ट्र अहेड (इंग्रजी) यांनी जनमानसात वेगळा ठसा उमटवला असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांमध्ये दिलखुलास संवाद (आकाशवाणी) जय महाराष्ट्र (सह्याद्री वाहिनी) यांनी प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. महान्यूज वेबपोर्टलने जगभरातील लाखो नेटीझन्सना आकर्षित केले आहे.

राज्यपाल महोदयांना यावेळी लोकराज्य, महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्य अंक महासंचालकांनी दिले. या मासिकाचा सुमारे ४ लाख ४० हजारांवर खप असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाणारे अशा प्रकारचे हे राज्यातील एकमेव मासिक असून त्याची वाचकसंख्या सुमारे चाळीस लाख इतकी आहे.

या विभागाच्या सचिव तथा या मासिकाच्या अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकराज्य या लोकप्रिय प्रकाशनाची घोडदौड सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. लोकराज्य मासिक हे महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाचे मासिक असल्याचे त्यांच्या लक्षात आणून दिले. गेल्या काही महिन्यांमध्ये लोकराज्य मासिकाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार, मेक इन महाराष्ट्र, स्वच्छता मोहिम, आपले सरकार आदी पथदर्शी प्रकल्पांना व्यापक प्रसिद्धी देण्यात आली. राज्यपाल महोदयांच्या अनेक महत्त्वाच्या कार्यक्रमांची प्रसिद्धी लोकराज्य, महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्यमधून देण्यात आल्याची माहिती श्री. ओक यांनी राज्यपालांना दिली.

महाराष्ट्र अहेडचा उद्देश राज्याची प्रतिमा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर तयार करणे हा आहे. तसेच राज्यातील अमराठी वाचकांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचवण्याचे कार्य महाराष्ट्र



**मा. राज्यपाल सी विद्यासागर राव यांना लोकराज्य अंक दाखवताना महासंचालक चंद्रशेखर ओक**

अहेड करत आहे. मासिकाद्वारे महाराष्ट्रातील पर्यटन, सांस्कृतिक वैशिष्ट्य, उद्योगाच्या संधी, जैविक संपदा, महाराष्ट्राची विविध क्षेत्रातील घोडदौड प्रतिबिंबित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांचा प्रभावी उपयोग करून घेत असल्याचे स्पष्ट केले. आकाशवाणी या माध्यमाद्वारे शासकीय योजना, उपक्रम, यशकथा कोट्यवधी जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे कार्य महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' या कार्यक्रमाद्वारे केले जाते. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरुन 'जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम प्रसारित केला जातो. महासंचालनालयाच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांपैकी महान्यूज हे बातम्यांचे वेबपोर्टल आहे. महान्यूजच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाचे धोरण आणि विविध कार्यक्रमांना जगभर पोहोचविण्याचे काम केले जाते. यावेळी महासंचालनालयाचे संचालकद्वय श्री. देवेंद्र भुजबळ व श्री. शिवाजी मानकर उपस्थित होते.

**– प्रवीण टाके**

**लोकराज्य या मराठी अंकाचे मूल्य १० रुपये असून वार्षिक वर्गणी १०० रुपये आहे, तर 'महाराष्ट्र अहेड' या इंग्रजी अंकाचे मूल्य ५० रुपये असून वार्षिक वर्गणी ५०० रुपये आहे. वार्षिक वर्गणी वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय बरेक क्र. १९ फ्री प्रेस जरनल मार्ग, मुंबई – ४०० ०२१ या पत्त्यावर मनिऑर्डरने पाठवावी किंवा लेखाधिकारी, मा. व ज. स., मंत्रालय, मुंबई यांचे नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा.**




**‘ट्विटर’ हे प्रभावी समाजमाध्यम असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या माध्यमाचा नियमित वापर करतात. त्याद्वारे दिवसभरातील महत्त्वाच्या घटना, कार्यक्रम, बैठका, सभा यांची माहिती ते देतात. तसेच नागरिकांना अनेक महत्त्वाचे निर्णय योजना यांची माहिती तातडीने कळवत असतात.**

**मेळघाटाच्या विकासासंदर्भात...**

Directed to make an infrastructure plan for Melghat including communication towers which should be the top priority.

**लोकशाही दिनी जनसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध विभागांना सूचना देताना...**

Gave instructions for more communication among the departments to reduce the problems of common man.

**अहमदनगर-बीड-परळी मार्गासाठी निधी मंजूर केल्यानंतर...**


Maharashtra Cabinet decides to give Rs. 1413 crore i.e 50% fund for Munde Saheb's dream project of Ahmednagar - Beed - Parli Vaijnath new railway line

**जलयुक्त शिवारातील नागरिकांच्या सहभागाबद्दल....**

Overwhelmed by the way people are tremendously participating in #JalYuktaShivar movement for drought free Maharashtra.

Planted a tree with Minister @Pankaja Munde in the memory of our beloved leader Munde Saheb, at Pali village in Beed.

**सार्वजनिक आरोग्याची विशेष काळजी घेण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे निवृत्ती वय ५८ वरून ६० वर केल्यानंतर...**



**सेल्फी वुइथ डॉटर...**

**पंतप्रधानांनी #सेल्फी वुइथ डॉटरवर मुलीसोबत सेल्फी टाकण्याचे आवाहन केल्यानंतर...**

And here's my #SelfieWithDaughter. My Daughter, My Pride!

Retirement age extended from 58 to 60 yrs for Govt. doctors who were to retire on 31st May 15 to enable health services especially for approaching monsoon

**अंतर्गत मुंबई शहर परिवहन प्रकल्प-३च्या शुभारंभानंतर...**

Our plan is to integrate entire transport system & an end to end solution for Mumbai passengers. A single platform & single window ticketing.

**सिंहस्थाच्या तयारीबाबत...**

Preparation work for Simhasta #MahaKumbhMela satisfactory. We will make it a success with the support of Sadhus & Mahants.

**बँकांना आवाहन करताना...**

Banks should prepare a policy for crop loan to farmers, with sensitivity.

**केंद्र सरकारच्या तीन महत्त्वपूर्ण योजनांच्या उद्घाटनानंतर...**

Today's launch of Missions by Hon@narendramodiji is yet another milestone in our nation's journey towards development.

**मराठी विश्वकोशच्या संहिता खंड २०चे प्रकाशन केले. आपली संस्कृती भावी पिढ्यांपर्यंत जतन करण्याचा हा स्तुत्य प्रयत्न!**

Yoga can change one's life. Appealed to become Yoga Gurus from Yoga practitioners. Hon @narendramodi ji's initiative has brought the entire world together on this #YogaDay.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक
لوک راجیہ
उर्दू लोकराज्य
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२३१६
जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...७६७ भाग
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ६४ लाख
MAHARASHTRA
Ahead
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
सर्वांसाठी...
https://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th July 2015
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य

























सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक